# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹


## इराणमध्ये जनता रस्त्यावर

**इराण :** इराणमध्ये गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात विरोधी निदर्शने पाहायला मिळत आहेत. हे आंदोलन सरकारच्या एका निर्णयाविरोधात आहे. ज्याला लोकांनी प्रचंड विरोध केला आहे. त्यामुळे बहुतांश ठिकाणी काम ठप्प झालं आहे. या आंदोलनात अनेक ठिकाणी आंदोलक आणि इराणच्या सुरक्षा रक्षकांमध्ये झटापटी झाल्या. त्यात सुरक्षा दलाचे सदस्य मारले गेलेत. परिस्थिती पाहता अधिकाऱ्यांनी अचानक सार्वजनिक सुट्टी घोषित केली आहे. त्यामुळे ३१ मधील २१ प्रांतात व्यवसाय, यूनिवर्सिटी, सरकारी कार्यालये बंद झाली आहेत.

## आरे कॉलनीत बस-ट्रकचा अपघात

**मुंबई :** मुंबईतील आरे कॉलनी गेट क्रमांक ५ येथे गुरुवारी (दि.१) सकाळी वेट लीज इलेक्ट्रिक बस आणि खासगी ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातात ट्रक चालकाचा मृत्यू झाला. पावसामुळे रस्ता निसरडा झाल्याने हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती आहे. विक्रोळी डेपोशी संलग्न असलेली बस विक्रोळी डेपो येथून बोरीवली स्टेशन (पूर्व) दिशेने जात असताना आरे कॉलनी मार्केटजवळ हा अपघात झाला. समोरून येणाऱ्या खासगी ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बसच्या चालक केबिनजवळील उजव्या बाजूला जोरात धडकला. पान २ वर

**वे|ध|क**

## सोने, चांदीच्या दरात घसरण

**मुंबई :** नववर्षाच्या पहिल्याच दिवशी सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आहे. चांदीचे दर २५२० रुपयांनी कमी होऊन २२७९०० रुपयांवर आले आहेत. सोन्याच्या दरात ४४ रुपयांची घसरण झाली आहे. जीएसटीसह चांदीचा दर २३४७३७ रुपये किलोवर आली आहे. जीएसटीसह २४ कॅरेट सोन्याचा दर १३७१४५ रुपयांवर आला आहे. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आहे. चांदीचे दर २५२० रुपयांनी कमी होऊन २२७९०० रुपयांवर आले आहेत. सोन्याच्या दरात ४४ रुपयांची घसरण झाली आहे.

## वंदेभारत स्लिपर एक्स्प्रेस लवकरच

**मुंबई :** देशातील पहिली वंदेभारत स्लिपर एक्स्प्रेसचा मार्ग अखेर ठरला आहे. या ट्रेनचे भाडे विमानाच्या भाड्यापेक्षा किफायती असल्याचे म्हटले जात आहे. नुकतीच या ट्रेनची ट्रायल रन कोटा-नागदा सेक्शनमध्ये झाली होती. देशातील पहिल्या वंदेभारत स्लिपर ट्रेनच्या मार्गाची घोषणा अखेर रेल्वे मंत्र्यांनी केली आहे. केंद्र सरकारने पूर्वे कडील राज्ये आणि पूर्व भारताला जोडणाऱ्या रेल्वे योजनेची घोषणा केली आहे. भारतीय रेल्वे लवकरच देशाची पहिली वंदेभारत स्लीपर ट्रेन गुवाहाटी आणि कोलकाताच्या दरम्यान सुरु करत आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की पंतप्रधान नरेंद्र मोदी लवकरच सेमी हायस्पीड ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील.

## नालासोपाऱ्यात पिस्तुल चोरीला

**विरार :** ऐन निवडणुकीच्या तोंडावर आमदाराच्या अंगरक्षकांचे पिस्तुल चोरीला गेल्याने कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. आमदार राजन नाईक यांचे अंगररक्षक सचिन शेंबाडे यांचे पिस्तुल २६ डिसेंबरला चोरीला गेल्याची घटना घडली असून गुरुवारी (दि.१) ती घटना समोर आली आहे. याबाबत मिळलेल्या महितीनुसार, सचिन शेंबाडे मित्रांसमवेत पार्टी करत होता. नालासोपाऱ्याच्या यशवंत गौरव येथे पार्टी सुरू होती. त्यावेळी कुणीतरी त्याच्या कमरेला लावलेले पिस्तुल लंपास केले. याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात चोरीप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. नंतर गुन्हे शाखा ३ च्या पथकाने तपास करून आरोपी प्रज्ञेश पवार याला अटक केली.

# नववर्षात नौदलाचे सामर्थ्य वाढणार

### तारागिरी, अंजदीप युद्धनौका लवकरच सेवेत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नववर्षाच्या सुरुवातीलाच नौदलाच्या सामर्थ्यात लक्षणीय वाढ होणार आहे. अत्याधुनिक तारागिरी स्टेल्थ फ्रिगेट आणि अंजदीप अँटी सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट या युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात दाखल होण्याची शक्यता आहे.

तारागिरी ही नीलगिरी वर्गातील चौथी स्टेल्थ फ्रिगेट असून या मालिकेतील एकूण सात युद्धनौका नौदलात दाखल होणार आहेत. अंजदीप ही नौदलाला मिळणारी चौथी अँटी सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट येणार आहेत.

तारागिरी फ्रिगेट दीर्घ पल्ल्याच्या ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रांनी सुसज्ज आहे. स्वदेशी रॉकेट लॉन्चर, अत्याधुनिक कॉम्बॅट मॅनेजमेंट सिस्टीम, फायर कंट्रोल सिस्टीम, एमएफ-स्टार सर्व्हिलन्स रडार आणि बराक-८ पृष्ठभाग ते आकाश क्षेपणास्त्र प्रणाली यामध्ये आहेत. प्रोजेक्ट १७ ए अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या युद्धनौका समजल्या जातात. नव्या संरचनेमुळे रडार, इन्फ्रारेड, ध्वनी आणि चुंबकीय ठसा कमी झाला आहे.

### नीलगिरी वर्गाची पुढची झेप

नीलगिरी वर्गातील युद्धनौकांमध्ये आक्रमक क्षमता, स्टेल्थ तंत्रज्ञान, ऑटोमेशन, टिकाऊ रचना आणि मॉड्युलर बांधकाम पद्धतीत मोठ्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. सुमारे ६,६७० टन वजनाच्या या फ्रिगेट्स अत्याधुनिक शस्त्रे, सेन्सर आणि इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर प्रणालींनी सज्ज असून भारतीय नौदलाच्या आणखी सक्षम करणार आहेत

### अंजदीप घेणार पाणबुड्यांचा शोध

नौदलाला मिळणाऱ्या १६ शॅलो वॉटर क्राफ्टपैकी आतापर्यंत तीन युद्धनौका ताफ्यात दाखल झाल्या आहेत. जानेवारीत अंजदीप या आणखी एका युद्धनौकेचा समावेश होणार आहे. पाणबुडीचा शोध, समुद्री गस्त, शोध व बचावकार्य तसेच कमी तीव्रतेच्या समुद्री मोहिमांसाठी ही अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. सुमारे ७७ मीटर लांबीच्या अंजदीप या नौकेत अत्याधुनिक टॉर्पीडो, स्वदेशी अँटी सबमरीन रॉकेट तसेच उथळ पाण्यात कार्यक्षम सोनार प्रणाली बसवण्यात आली आहे.



# नववर्षाच्या पहिल्याच दिवशी बरसला पाऊस



### पनवेल, उरणमध्ये पावसाची हजेरी; रस्त्यांवर पाण्याचे लोट

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवसाची सुरुवात पावसाने झाली. पनवेल आणि उरणमध्ये गुरुवारी (दि.१) पहाटे पावसाने हजेरी लावली. हवेत गारठा वाढलेला असतानाच अचानक आलेल्या पावसाने नववर्षानिमित्त फिरायला आणि कामासाठी घराबाहेर पडलेल्या रायगडकरांची तारांबळ उडाली.

दिवसभरात पुन्हा पाऊस आलाच तर बचाव व्हावा, यासाठी अनेकांनी घराबाहेर पडताना छत्री, रेनकोटही सोबत घेतला. हवामान केंद्राच्या कुलाबा केंद्रात ९.२ मिमी, तर सांताक्रूझ केंद्रात ६.७ मिमी पावसाची नोंद झाली. रायगडात डिसेंबर महिन्यापासून किमान तापमानात घट झाली होती. हवेतील गारठा कायम असतानाच गुरुवारी पहाटे पनवेल आणि उरणमध्ये पावसाने हजेरी लावली.

पनवेल आणि उरण तालुक्यात नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी पावसाने आपली हजेरी लावली खासकरून पनवेल शहर, कळंबोली, कामोठे, खारघर, उलवे, पळस्पे या परिसरात पावसाने जोरदार सुरुवात केली होती. उरण तालुक्यात देखील चिरनेर, जासई, खोपटा, कोपर, जेएनपीए आणि उरण शहरात पावसाने पहाटेच्या सुमारास हजेरी लावली. पावसाच्या सरींनी रस्त्यांवर पाण्याचे लॉट वाहून लागले होते. रस्त्यांवरपडलेल्या खड्ड्यांमध्ये पाणी साचले होते. यामुळे सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी सुरु असलेल्या पार्ट्यांमध्ये धमाल उडाली होती. परतीच्या प्रवासाला लागलेल्या पर्यटकांना पहाटे पनवेल आणि उरणमध्ये पोहोचताना पावसाच्या सरींचा सामना करावा लागला. पहाटे झालेल्या पावसाने रब्बी पिकांना फटका बसला असून वीटभट्टी व्यावसायिकांवर आर्थिक संकट कोसळले आहे. मच्छिमार बांधवांना देखील आपल्या होड्या बदललेल्या वातावरणामुळे किनाऱ्यावरच नांगरून ठेवव्या लागल्या आहेत.पावसामुळे काही भागातील सखल भागात पाणी साचल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला. उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यामुळे रायगड जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात किमान तापमानात चढ-उतार होत होता. पावसामुळे हवेतील गारव्यात आणखी वाढ झाली. थंड वारे आणि ढगाळ वातावरणामुळे रायगडात किमान तापमानातही घट झाली.

### हवेच्या गुणवत्तेत सुधारणा

उरण आणि पनवेलमध्ये पहाटे पडलेल्या पावसामुळे हवा प्रदूषणात काही प्रमाणात सुधारणा झाली. पावसामुळे हवेतील प्रदूषके, सूक्ष्म कण स्वच्छ होण्यास मदत होते. मागील दोन महिन्यांपासून रायगडातील हवा प्रदूषणात सातत्याने वाढ होत होती. यामुळे शहरवासियांना त्रास सहन करावा लागत होता. मात्र, नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी पडलेल्या पावसाने हवा प्रदूषणात काही प्रमाणात सुधारणा झाल्याचे दिसून येत आहे.

### एसटीचे रस्ता सुरक्षा अभियान दिखावा

# अलिबाग - पिंपळभाट रस्त्यावर एसटीत बिघाड

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सडक सुरक्षा- जीवन रक्षा या संकल्पनेवर अधारित एसटी महामंडळ रायगड विभागाने जिल्ह्यात रस्ता सुरक्षा अभियान सुरू केला आहे. मात्र हे अभियान दिखावा असल्याची चर्चा सुरु आहे. अलिबाग आगारातून पनवेलकडे जाणाऱ्या एसटी बसचा गुरुवारी (दि.१) सायंकाळी बिघाड झाला. त्यामुळे ही बस पिंपळभाट जवळ बंद पडली. त्याचा नाहक त्रास प्रवाशांसह पर्यटकांना झाला. त्यामुळे एसटीचे हे अभियान फक्त कार्यक्रमापुरताच मर्यादीत असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे.



● (छायाचित्र : समीर मालोदे)

अपघात कमी करण्याबरोबरच प्रवासी व कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी नव्या वर्षात एक ते ३१ जानेवारी या कालावधीत एसटी महामंडळामार्फत रस्ता सुरक्षा अभियान राबविले जाते. यावर्षीदेखील रायगड विभागामार्फत हे अभियान गुरुवारी(दि.१)पासून सुरू करण्यात आले. अलिबाग एसटी बस आगारात थाटामाटात कार्यक्रम घेण्यात आला. वेगवेगळे तज्ज्ञ मंडळींमार्फत मार्गदर्शन ठेवण्यात आले. चालक व वाहकांना सुचना देण्यात आल्या. अभियांत्रिकी विभागालाही यावेळी सुसज्ज बस रस्त्यावर देण्याची सुचना अनेकांकडून करण्यात आली आहे. मात्र एसटी महामंडळ रायगड विभागाचा हा कार्यक्रम पुर्णतः फेल ठरला.

दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास हा कार्यक्रम झाला. हा कार्यक्रम होऊनकित्येक तास उलटून गेल्यानंतर रस्ता सुरक्षेची अपेक्षा होती. मात्र प्रवाशांसह एसटी कर्मचाऱ्यांची घोर निराशा झाल्याचे दिसून आले. अलिबाग आगारातून एम. एच. २०.बी. एल. ३८३० या क्रमांकाची एसटी बस सायंकाळी पनवेलकडे निघाली. थर्टी फर्स्ट साजरा केल्यानंतर परतीच्या मार्गावर निघालेले पर्यटक व नियमित प्रवास करणारे प्रवासी या पान २ वर

### अलिबाग आगारात जुन्याच गाड्या

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. या आगारातून ६०हून अधिक एसटी बसेस आहेत. यामध्ये फक्त मागील वर्षी पाच नव्या बसेस आहेत. अन्य बसेस जून्या आहेत. या जून्या गाड्यांवर अलिबाग बस आगाराचा कारभार चालत आहे. अलिबागमध्ये वेगवेगळी सरकारी कार्यालये आहेत. पर्यटकांचादेखील ओघ प्रचंड आहे. तरीदेखील जून्याच बस रस्त्यांवर पाठवून प्रवाशांच्या जीवाशी खेळ करीत असल्याची चर्चा जोरात सुरु आहे.

# शिक्षक भरती आता परीक्षा परिषदेकडे

**। छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी ।**

राज्यातील शिक्षक पदभरतीची प्रक्रिया महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदकडून केली जाणार आहे. शिक्षण आयुक्त कार्यालयाद्वारे पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक भरती प्रक्रिया होत होती. राज्य सरकारने आता सुकाणू समितीची स्थापना करत कामकाज परिषदेकडे सोपविण्याचा निर्णय घेतला. तर परिषदेमार्फत होणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेतील अनियमितता, पेपरफुटी प्रकरणांची चर्चांमुळे सरकारच्या या निर्णयावर पात्रताधारकांमध्ये तर्क-वितर्क लावले जात आहेत.

राज्यातील शिक्षक भरतीची प्रक्रिया २०१७ पासून पवित्र पोर्टलद्वारे राबविली जाते. शिक्षण आयुक्त कार्यालयाच्या नियंत्रणात प्रक्रियेचे कामकाज होते. परंतु, आता सरकारने ही जबाबदारी परिषदेवर सोपविण्याचा निर्णय मंगळवारी (३० डिसेंबर) घेतला. पदभरतीची कार्यवाही निरंतर चालणारी काहीशी वेळखाऊ प्रक्रिया आहे. त्यात शिक्षण आयुक्त कार्यालयाचा बहुतांशी वेळ खर्च होत असून महत्वांच्या धोरणांच्या व निर्णयांच्या अंमलबजावणीवर त्याचा विपरित परिणाम होत असल्याचे सरकारने म्हटले आहे.

शिक्षक पदभरतीशी संबंधित परीक्षेचे आयोजन व निवड प्रक्रिया एकाच संस्थेकडे असणे आवश्यक असल्याचे सांगत सरकारने परिषदेकडे पदभरतीशी संबंधित सर्व कामकाज सोपविण्यात येत असल्याचे जाहीर केले. त्यासह कामकाजाचे कार्यालयनिहाय वाटप त्याअनुषंगाने जबाबदारी निश्चितीसाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे.

### गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर निर्णय

### पात्रताधारकांमध्ये निर्णयाची चर्चा

राज्यात शिक्षक भरतीसाठी परीक्षा परिषदेकडून शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी), अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा घेण्यात येते. २०१८ आणि २०१९-२०२० मध्ये झालेल्या टीईटी परीक्षेतील अनियमितता राज्यभर चर्चेत आली. गैरप्रकार समोर आल्यानंतर मोठ्या प्रमाणात कारवाईही करण्यात आली. त्यात नुकत्याच झालेल्या परीक्षेत पेपरफुटीची चर्चाही झाली. अशा प्रकारांमुळे निवड प्रक्रिया परिषदेकडे गेल्यास पारदर्शकता राहिल काय? असा प्रश्न पात्रताधारकांमधून उपस्थित केला जात आहे.

# शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या रील करणे पडणार महागात

### शिक्षण विभागाची नवी नियमावली; संबंधित शाळांवर होणार कठोर कारवाई

**। रायगड । प्रतिनिधी ।**

प्रसिद्धीच्या झोतात कायम राहण्याचा ट्रेंड सर्वत्र वाढत आहे. असे असताना शिक्षकदेखील या रिल्स फीव्हरमधून चुकलेले नाहीत. काही शिक्षक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या रील तयार करून सोशल मीडियावर अपलोड करतात, पण, आता त्यांना यासाठी पालक किंवा सक्षम प्राधिकरणांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. शिवाय विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा, मानसिक छळ, शाब्दिक अपमान किंवा कोणत्याही प्रकारचा भेदभाव केल्यास संबंधित शाळांवर कठोर कारवाई होणार आहे.

बालकांच्या हक्कांचे उल्लंघन रोखण्यासाठी कोणत्याही प्रकारची शारीरिक शिक्षा, धमकावणे, अवहेलना तसेच जात, धर्म, लिंग, अपंगत्व, भाषा किंवा शैक्षणिक काम गिरीच्या आधारे भेदभाव करण्यास सक्त मनाई करण्यात आली. शिक्षण हक्क कायद्याची आठवण करून देत विद्यार्थ्यांशी आदरयुक्त संवाद राखणे आणि शिस्तबद्ध पण बालमैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करण्याचे निर्देश शाळांना देण्यात आले. विद्यार्थ्यांशी संदेश किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून कोणत्याही वैध कारणांशिवाय संवाद साधण्यास शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना मनाई करण्यात आली आहे. तसेच पालक व सक्षम प्राधिकरणांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांचे फोटो किंवा व्हिडिओ काढणे, वापरणे अथवा प्रसारित करण्यावर बंदी घालण्यात आली. तसेच गुणपत्रिका, मूल्यमापन अहवाल यासारखी संवेदनशील शैक्षणिक माहिती गोपनीय ठेवण्याची सक्ती करण्यात आली असून, कमी गुण मिळाल्याने कोणत्याही विद्यार्थ्याला मानसिक त्रास होणार नाही याची विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### अधिकाऱ्यांना मिळाला अधिकार

तक्रारी किंवा वर्तमानपत्रातील बातम्यांआधारे शिक्षण अधिकाऱ्यांना स्वतःहून (सुओमोटो) चौकशी सुरू करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. एखाद्या शाळेने घटना नोंदवण्यात अपयश, माहिती दडपणे किंवा खोटे अहवाल सादर केल्यास संबंधित मुख्याध्यापक, शिक्षण अधिकारी आणि व्यवस्थापनावर कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे.

### विद्यार्थी सुरक्षेसाठी उपाय अनिवार्य

शाळांमध्ये वेळबद्ध तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करणे, उल्लंघनाच्या घटना त्वरित नोंदवणे आणि सीसीटीव्ही फुटेजसह पुरावे जतन करणे मुख्याध्यापक व व्यवस्थापनास बंधनकारक करण्यात आले आहे. कोणत्याही तक्रारीबाबत दोन दिवसांच्या आत प्राथमिक चौकशी अहवाल शिक्षण अधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक असेल. लैंगिक गुन्हे किंवा बालछळासारख्या गंभीर प्रकरणांमध्ये २४ तासांत पोलीस तक्रार दाखल करणे अनिवार्य असून, पोक्सो कायदा व बाल न्याय कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाणार आहे.

### वाहतूक कोंडी सोडविण्यात यश | होमगार्ड जवानदेखील पॉईंटवर तैनात

# प्रवाशांच्या सुखकर प्रवासासाठी पोलिसांनी कसली कंबर

**प्रमोद जाधव**

**। रायगड ।**

सरत्या वर्षाला निरोप देत २०२६ या नवीन वर्षाचे बुधवारी जल्लोषात स्वागत करण्यात आले. डिजेच्या ठेक्यावर नाचत, आनंदोत्सव साजरा करण्यात आला. नवी आशा, नवे स्वप्न घेत गुरुवारी सकाळी पर्यटक त्यांच्या परतीच्या मार्गावर निघाले. पर्यटकांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी नाक्या-नाक्यावर पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला. अलिबाग रोहा मार्गावरील बेलकडे-कुरुळ रस्त्यावर तसेच पोयनाड-पेझारी रस्त्यावर वाहनांच्या रांगाच रांगा दिसून आल्या.



गतवर्षीप्रमाणे यंदाही पर्यटकांनी नव्या वर्षाच्या स्वागतासाठी अलिबागसह संपूर्ण रायगड जिल्ह्याला पसंती दर्शविली. याही लाखो पर्यटक जिल्ह्यात दाखल झाले. समुद्रकिनाऱ्यांसह हॉटेल, रेस्टॉरन्ट पर्यटकांनी फुल्ल झाले होते. किनारे पर्यटकांनी फुलून गेले होते. रात्री बाराचा ठोका झाल्यावर प्रत्येकाने हॅप्पी न्यू इअर असे बोलत नवीन वर्षाच्या शुभेच्छा अनेकांना दिल्या. रात्री बारा वाजेपर्यंत अनेकजण डिजेच्य ठेक्यावर नाचत होते. नव्या वर्षाचे स्वागत झाल्यावर पर्यटक त्यांच्या परतीच्या मार्गावर गुरुवारी सकाळी निघाले. पर्यटकांना त्यांच्या निश्चित स्थळी वेळेवर पोहचता यावे, यासाठी अलिबाग एसटी बस आगारातून नियमित बसेस बरोबरच अलिबाग-पनवेल विना थांबा ज्यादा बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात आले. स्थानकात विना थांबाचे तिकीट घेण्यासाठी पर्यटकांची रांग दिसून आली. मुंबई- गोवा, मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग, जिल्हा मार्ग, अलिबाग-मुरुड अलिबाग-पेण मार्गावर वाहतूक कोंडी निर्माण होऊ नये यासाठी जिल्हा वाहतूक शाखेचे ९० हून अधिक वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले होते. त्यांच्या मदतीला होमगार्ड जवानदेखील घेण्यात आले होते. पान २ वर

> “सरत्या वर्षाला निरोप देऊन नव्या वर्षाचे स्वागत झाल्यानंतर पर्यटक बुधवारी सकाळी परतीच्या मार्गावर निघाले. पर्यटकांना त्यांच्या निश्चितस्थळी सुखरूप पोहचता यावे, यासाठी वाहतूक पोलिस तैनात केले आहेत. सर्व पर्यटक एकत्र निघाल्याने वाहतुकीवर त्याचा परिणाम झाला. कर्जतमध्ये वाहतूक कोंडी झाली. पोयनाड - पेझारी तसेच कुरुळ बेलकडे रस्त्यावर वाहनांची वर्दळ प्रचंड होती. ही कोंडी सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला.”
>
> - अभिजीत भुजबळ, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा,रायगड

# भाजपा फुटीच्या उंबरठ्यावर : सुषमा अंधारे

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

उमेदवारांना उमेदवारी अर्ज देण्याच्या निमित्ताने राजकारणाची हास्यजत्रा सुरू आहे, ती अत्यंत रंजक आहे. कुणी आत्मदहनाचा प्रयत्न करत आहे, कुणी उपोषणाला बसले आहे, तर कुणी एबी फॉर्मच खाऊन टाकत आहे.

तर कुणी भाजपाच्या नेत्याच्या कानशिलात लगावत आहे. हे सर्व बघितल्यानंतर एकच दिसत आहे की, भाजपा फुटीच्या उंबरठ्यावर आहे. कारण काँग्रेस खूप शक्तीशाली झाली आणि त्यांच्या महत्वाकांक्षेला धुमारे फुटायला लागले तेव्हा काँग्रेसमधूनच अनेक पक्ष बाहेर पडले. भाजपाच्या फुटीची पहिली लक्षणे या निवडणुकीत दिसली असल्याचे शिवसेनेच्या (ठाकरे) नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या.



भाजपाच्या फुटीची लक्षणे सांगत असताना सुषमा अंधारे यांनी नाशिकच्या देवयानी फरांदे, सुधीर मुनगंटीवार यांच्या नाराजीचे उदाहरण दिले. ठिकठिकाणच्या निष्ठावंताना डावलून जुने विरुद्ध नवे, असा वाद निर्माण होत आहे, यावरून भाजपात काही आलबेल नसल्याचे दिसत आहे, असे सुषमा अंधारे म्हणाल्या.

भाजपाची भूक इतकी मोठी आहे की, त्यांनी खूप लोकांना घरात घेतले. आता घरात जागा करण्यासाठी ज्यांनी घर बांधले, त्यांनाच घराबाहेर काढण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे उमेदवारी देण्यात निश्चितच अनेकांचा बळी दिला आहे.

पण उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेवर अशी वेळ आली नाही. आम्ही पुण्यात ८० ते ८५ जागांवर लढत आहोत. ज्याठिकाणी एकापेक्षा अधिक उमेदवार होते, त्यांना मातोश्रीवर बोलवून त्यांची समजूत काढून मार्ग काढला, असेही सुषमा अंधारे म्हणाल्या.

अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना तिकीट दिले आहे. याबद्दल प्रश्न विचारला असता सुषमा अंधारे म्हणाल्या, लोकांच्या मताचा आदर न करता राजकारणाचे गुन्हेगारीकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे, तो निश्चितच निषेधार्ह आहे, अशीही टीका सुषमा अंधारे यांनी केली.

# मशाल फेरीतून स्वातंत्र्यक्रांतीची माहिती

## खांडस येथून निघाली पायी मशाल फेरी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचा बलिदान दिवस उद्या साजरा होत आहे.त्यानिमित्ताने या दोन्ही हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी खांडस गाव आणि परिसर यांच्या हुतात्मा प्रतिष्ठान कडून खांडस ते सिद्धगड अशी पायी रॅली घेऊन मशाल फेरी निघाली.

सिद्धगड येथे दोन जानेवारी रोजी १९४३ रोजी या दोन्ही हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी रायगड आणि ठाणे जिल्ह्यातून अनेक गावातून मशाल फेरी निघत असतात.तशी पायी मशाल फेरी खांडस गावातून निघाली आणि मध्यरात्री सिद्धगड मुरबाड येथे पोहोचणार आहे.




कर्जत तालुक्यातील खांडस येथे स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतिकारक हुतात्मा भाई लक्ष्मण विठ्ठल कोतवाल आणि हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक जानेवारी रोजी खांडस आणि परिसर हुतात्मा प्रतिष्ठानच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी निघणाऱ्या मशाल फेरीची सुरुवात खांडस गावातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास पुष्पमाला अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी इतिहास अभ्यासक वसंत कोळंबे तसेच संतोष पेरणे (अध्यक्ष, कर्जत तालुका आगरी समाज संघटना) आणि डॉ.रवींद्र मर्दाने (प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र) यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण झाली,त्यावेळी विजय कोंडीलकर, श्रीकांत हावरे, सुधीर सोनावळे आणि सुभाष मेहतर यांसारख्या मान्यवरांचा सहभाग होता. ही रॅली प्रथम खांडस गावात फिरली आणि त्यानंतर खांडस येथून सिद्धगड अशी निघाली. खांडस ते सिद्धगड अशी काढण्यात आलेली क्रांती ज्योत पदयात्रा. हुतात्म्यांचे बलिदान व्यर्थ जाऊ नये आणि त्यांच्या विचारांचा वारसा तरुण पिढीपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. केवळ औपचारिकता न ठेवता विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते.

निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा या संपूर्ण कार्यक्रमासाठी खांडस ग्रामस्थांनी मोलाचे योगदान दिले आहे. पदयात्रेतील सहभागींसाठी दशरथ ऐनकर, तातू हिंदुळा, भूषण आसवळे,चंद्रकांत शेळके दिलीप आणि बळीराम ऐनकर यांनी केली.

हुतात्मा प्रतिष्ठान खांडस व परिसर' यांच्या या उपक्रमामुळे परिसरात देशप्रेमाचे वातावरण निर्माण झाले असून, मोठ्या संख्येने नागरिक या सोहळ्याला उपस्थित आहेत.

# कर्जत आगारात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा उपक्रम

**| कर्जत | प्रतिनिधी |**



महाराष्ट्रात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना आयोजित केला जातो. कर्जत एसटी आगारात हा उपक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी कर्जत पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिषा लटपटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना वाहतूक सुरक्षेचे धडे दिले.

कर्जत एसटी आगारात राष्ट्रीय सुरक्षा उपक्रमाचे आयोजन केले होते. कर्जत पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक मनीषा लटपटे यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी विजय मांडे, आगार व्यवस्थापक दयानंद मोरे, लेखाकार अंकुश राठोड, सहाय्यक वाहतूक निरीक्षक महादेव पालवे, रवींद्र लोहकरे, भरत महाजन आदी उपस्थित होते. विलास बागुल यांनी उपस्थितांचे स्वागत केले. दीपक देशमुख यांनी प्रस्ताविकात आगाराची माहिती दिली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिषा लटपटे यांनी एसटी किंवा कोणतेही वाहन चालवताना व्यसन करू नये कारण तुमच्या जीवावर प्रवासी प्रवास करीत असतात. जुने चालक जबाबदारीने एसटी चालवत असत.

आता वाहनांची संख्या वाढत असल्याने युवा चालक असल्याने त्यांनी एसटी चालवताना स्पर्धा करू नये. काही अपघात झाल्यास घाबरून न जाता ११२ क्रमांक डायल करून मदत घ्यावी म्हणजे पुढील अनर्थ टळतील, असे सांगितले.

मांडे यांनी सर्व राज्यात राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात येतो मात्र महाराष्ट्रात राष्ट्रीय सुरक्षा महिना साजरा करण्यात येतो. तरीही एक महिना हा उपक्रम न राबवता वर्षाचे ३६५ दिवस आपण व प्रवासी सुरक्षित राहतील असे एसटी वाहन चालवावे. विशेष म्हणजे जिल्ह्यात सर्वात कमी तोटा असलेले हे आगार आहे. याचे नूतनीकरण होणे गरजेचे आहे, असे सूचित केले.

अध्यक्षीय मनोगतात मोरे यांनी चालकांनी जबाबदारीने एसटी चालवून अपघात होऊ नये याची काळजी घ्यावी. आपल्या विभागात अपघाताचे प्रमाण कमी आहे. ते कमी करण्यासाठी सर्वांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत, असे सूचित केले. सूत्रसंचालन दीपक देशमुख यांनी केले.

# श्रीवर्धनमध्ये पक्षपात करणार नाही

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहराचा विकास करण्यासाठी महाराष्ट्रातील कुठल्याही मंत्र्याला, नेत्याला भेटाव लागले तरी चालेल.पण मी इथला विकास करणारच. विकासकामे करताना मी कुठलाही पक्षपात करणार नाही.मला साडेचार हजार मतदारांनी निवडून दिले असले तरी मी अठरा हजार जनतेचा नगराध्यक्ष आहे, असे प्रतिपादन श्रीवर्धन नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष ॲड. अतुल चौगुले यांनी केले.



## ■ ॲड.अतुल चौगुले यांचे प्रतिपादन

उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष ॲड.अतुल अरविंद चौगुले यांनी गुरुवार दिनांक ०१ जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजता श्रीवर्धन नगरपरिषदेचा कार्यभार स्वीकारला.या वेळी शिवसैनिकांनी सोमजादेवी मंदिर ते नगरपरिषद इमारती पर्यंत भव्य मिरवणूक काढीत जल्लोष साजरा केला तसेच कार्यकर्त्यांनी सत्कार समारंभ आयोजित केला होता.

यावेळी , राजकारण हे नगरपरिषदेचा निकाल जाहीर झाला तेव्हाच संपल.आता सुरुवात करायची आहे ती विकासकामांची.अद्याप पर्यंत माझी दोन कुटुंब होती , माझं घर दुसर न्यायालय आणि आता तिसर म्हणजे संपूर्ण श्रीवर्धन.जे काही आहे ते मी कार्यातून करून दाखवीन.असे चौगुले म्हणाले.

निष्ठावंत शिवसैनिक अशी ओळख असलेले चौगुले यांना २०१६ रोजी झालेल्या थेट नगराध्यक्ष निवडणुकीत किरकोळ मतांनी पराभव स्वीकारावा लागला होता.भारतीय विद्यार्थी सेना अध्यक्ष,युवासेना शहर अधिकारी आणि दक्षिण रायगड उपजिल्हाप्रमुख असा राजकीय प्रवास चौगुले यांचा आहे. श्रीवर्धन नगरपरिषदेचा कार्यभार स्वीकारल्यानंतर नगरपरिषद प्रांगणात चौगुले यांचा सत्कार करण्यात आला.हा सत्कार शिवसेना , राष्ट्रीय कॉंग्रेस युतीच्या कार्यकर्त्यांनी आयोजित केला होता.या वेळी महाविकास आघाडीचे कोणतेही ज्येष्ठ, वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित नव्हते , ही अत्यंत खेदाची बाब आहे.

### राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, भारतीय जनता पार्टी युतीच्या नगरसेवकांची अनुपस्थिती

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पंधरा आणि भारतीय जनता पक्षाचे दोन अशा युतीच्या सतरा नगरसेवकांनी साधी सदिच्छा भेट घेण्याची दखल घेतली नाही.फक्त शिंदे यांच्या शिवसेनेचे तीन नगरसेवक चौगुले यांना शुभेच्छा देण्यासाठी नगरपरिषदेत हजर होते.

सत्कार समारंभावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय कॉंग्रेस जिल्हा उपाध्यक्ष राजा ठाकूर, श्रीवर्धन तालुका प्रमुख अरूण शिगवण, शिवसेना आणि राष्ट्रीय कॉंग्रेस युतीचे कार्यकर्ते तसेच प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हा कारागृहातील बंद्यांनी केले कौशल्य प्रशिक्षण पूर्ण

## • जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम

**| रायगड | प्रतिनिधी |**

कारागृहातील बंदी सुटून गेल्यानंतर गुन्हेगारी क्षेत्रातून बाहेर पडून त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, त्यांचा व त्यांचे कुटुंबाचा उदरनिर्वाह व्हावा, याउद्देशाने अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व विषेश कारागृह महानिरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जास्तीत जास्त बंद्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी कारागृह प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता कौशल्य विकास कार्यक्रम, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अलिबाग, जिल्हा उद्योग केंद्र, अलिबाग यांच्यामार्फत पुरुष बंद्यांना दुचाकी मोटार सायकल दुरुस्ती व महिला बंद्यांकरीता ब्युटीपार्लर बेसीक व ॲडव्हांन्स कोर्सचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

यावेळी तेजस्विनी निराळे, सहायक आयुक्त अमिता पवार, विशाल बांदल यांच्यासह जिल्हा उद्योग केंद्रांचे प्रतिनिधी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, कारागृह विभागाच्या सुधारणा व पुनर्वसन या ब्रिद वाक्याचा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने किमान कौशल्य विकास डिपीसी अंतर्गत अलिबाग जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. कारागृहातील बंदी सुटून गेल्यानंतर गुन्हेगारी क्षेत्रातून बाहेर पडून रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी. बंद्यांचा, स्वत:चा व त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह व्हावा या उद्देशाने जास्तीत जास्त बंद्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा कारागृह प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहे.

या प्रशिक्षणातून बंद्यानी चांगले प्रशिक्षण घेवून आपले जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करावा. तसेच प्रत्येक बंद्यांनी आपल्या आरोग्याच्या सोयी-सुविधांसाठी आयुष्यमान कार्ड काढून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

सचिव जिल्हा विधीसेवा प्राधिकरण,रायगड-अलिबाग तेजस्विनी निराळे यांनी सांगितले की, जीवन जगताना कायदा खूप महत्वाचा असतो. ज्या बंद्यांनी प्रशिक्षण पूर्ण करुन प्रमाणपत्र मिळविले आहे त्यांची प्रेरणा घेवून इतर जास्तीत जास्त बंद्यांनी घेवून हे प्रशिक्षण पूर्ण करावे. बंद्यांनी जागरुकतेने आपल्याला असलेल्या सोयी-सुविधा मिळविण्याचा प्रयत्न करावा. रोजगाराच्या वेगवेगळया संधी उपलब्ध असल्याने हे प्रशिक्षण बंद्यांनी घेतल्यास बंदी आत्मनिर्भर होवून त्यांना रोजगार उपलब्ध होईल.

# अटकावून ठेवलेल्या जप्त वाहनांचा ई-लिलाव

**| रायगड | प्रतिनिधी |**

मोटार वाहन कर न भरलेल्या वाहनांवर मुंबई मोटार वाहन कर अधिनियमांतर्गत कारवाई करत प्रादेशिक परिवहन विभागाने एकूण ३३ वाहने अटकावून जप्त केली आहेत. संबंधित वाहन मालकांना थकित कर भरण्याबाबत वारंवार कळविण्यात आले असतानाही कर न भरल्याने या वाहनांचा जाहीर ई-लिलाव २ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे असे कराधान प्राधिकारी तथा सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल हरिभाऊ जेजुरकर यांनी कळविले आहे.

जप्त वाहनांमध्ये थ्री व्हीलर (प्रवासी), मोटार कॅब, मॅक्सी कॅब, मालवाहू वाहने, बस, एचजीव्ही डम्पर तसेच दुचाकी यांचा समावेश आहे.

ही वाहने सध्या अण्णा पार्किंग, स्टील मार्केट, खिडकपाडा गाव, पनवेल येथे ठेवण्यात आली आहेत.

# ५ जानेवारी रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन साजरा होतो. माहे जानेवारी २०२६ चा लोकशाही दिन ५ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी १ वा. जिल्हाधिकारी कार्याकायच्या राजस्व सभागृहात आयोजित केला आहे.

लोकशाही दिनाकरिता नागरिकांनी प्रथम तालुका लोकशाही दिनात अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. तालुका लोकशाही दिनातील उत्तराने समाधान न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनात अर्जदार अर्ज सदर करु शकतात, असे उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके यांनी कळविले आहे.

पान १ वरून

# आरे कॉलनीत बस-ट्रकचा अपघात

या अपघातात ट्रक चालक चेहराज ठाकूर (वय ३०, रा. गुजरात) यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने जोगेश्वरी पूर्व येथील ट्रॉमा केअर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.अपघातात बस चालक मोहम्मद रफीक शेख (वय ४८) यांना डोक्याला, उजव्या पायाला व गुडघ्याला दुखापत झाली असून काच फुटल्याने ते जखमी झाले. बस वाहक रवींद्र पांडुरंग शेंबडकर (वय ५६) यांना हाताला व पायाला किरकोळ दुखापत झाली. दोघांवर उपचार सुरू असून बस चालकाची प्रकृती स्थिर असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. हा अपघात मुसळधार पावसामुळे रस्ता निसरडा झाल्याने घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# अलिबाग - पिंपळभाट रस्त्यावर एसटीत बिघाड

एसटीत होते. निश्चित स्थळी वेळेवर पोहचणार अशी अशा प्रवाशांना होती. परंतु अलिबाग आगारापासून सुमारे तीन किलो मीटर अंतरावर असलेल्या पिंपळभाट जवळ अचानक एसटी बस बंद पडली. रस्त्यातच एसटी बंद पडल्याने काही वेळ या मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. प्रवाशीदेखील हैराण झाले. एसटीच्या बिघाडाचा फटका प्रवाशांसह पर्यटकांना मोठ्या प्रमाणात बसला. त्यामुळे एसटीच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

एसटी महांडळ रायगड विभागाने मोठ्या थाटामाटात रस्ता सुरक्षा अभियान गुरुवारी राबविला. मात्र हा अभियान फक्त कार्यक्रमापुरता सुरक्षीत दिसून आला. अन्य वेळेला पर्यटकांसह प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न कायमच असल्याचे अनेकवेळा एसटीच्या बिघाडातून दिसून आले आहे.

# प्रवाशांच्या सुखकर प्रवासासाठी पोलिसांनी कसली कंबर

अलिबाग-रेवदंडा, अलिबाग-पेण, मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. प्रवाशांच्या सुरक्षेबरोबरच त्यांना त्यांच्या निश्चित स्थळी पोहचता यावे, यासाठी वाहतूक पोलिसांनी कंबर कसली.

**पर्यटकांनी मारला, चिकन, मासळीवर ताव**

थर्टी फर्स्ट निमित्ताने पर्यटक रायगड जिल्ह्यात दाखल झाले होते. ३१ डिसेंबरला बुधवार असल्याने मटण, चिकनसह मासळीवर ताव मारण्यात आला. मात्र एक जानेवारीला गुरुवार तसेच थर्टी फर्स्टच्या दिवशी एकादशी असल्याने मटण खरेदीवर त्याचा परिणाम झाला. फक्त ३० टक्केच व्यवसाय झाल्याचे मटण विक्रेते यांनी सांगितले. यावेळेला पर्यटकांनी मटणापेक्षा चिकन व मासळीला अधिक मागणी होती, असे सांगण्यात आले.

# रोहा उरूस कमिटी अध्यक्षपदी तय्यबअली मुमेरे

**| रोहा | प्रतिनिधी |**

हिंदू-मुस्लिम एक्याचे प्रतीक असलेल्या रोह्यातील प्रसिद्ध गाझी शेख सलाउद्दीन शाहा बाबा उरूस कमिटीची पुढील ३ वर्षाकरिता नूतन कार्यकारिणी गठीत करण्यात आली.यात उरूस कमिटी अध्यक्षपदी तय्यबअली मुमेरे तर उपाध्यक्षपदी नदीम सिद्दीक यांची बहुमताने निवड करण्यात आली.



रोहा उरूस कमिटीची वार्षिक सर्वसाधारण आम सभा गुरुवारी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.या सभेत नव्याने निवड करण्यात आलेल्या कमिटीत अध्यक्षपदी तय्यबअली मुमेरे, उपाध्यक्षपदी नदीम सिद्दीक, सचिव समीर दाखवे, सह सचिव मुनवर शेटे, खजिनदार मुजीब सिद्दीक तर हबीब डावरे, नाझीम मुमेरे, अल्ली तव्वर, शहबाज शेटे, रफिक खोपटकर यांची कार्यकारणी सदस्यपदी त्याचप्रमाणे अलीम मुमेरे, नसीम महाडकर,आशिक सवाल, हुसेन नुराजी,याकूब शेख यांची सल्लागारपदी निवड करण्यात आली. या बैठकीत मोहल्ला व बाजार पेठेत ३० मार्च रोजी संदल रातीब मिरवणूक काढण्यात येईल तर ३१ मार्च रोजी रात्री उरूस मैदानावर कव्वालीला जंगी सामना रंगणार आहे अशी माहिती अध्यक्ष तय्यबअली मुमेरे यांनी दिली.

यावेळी मजहर सिद्दीक, अमीन सिद्दीक,किफायत जंजीरकर, अजीज महाडकर, समीर बडे,साजिद आलेकर, अबरार शेटे, जावेद महाडकर, अम्मार कलाब, सूफयान मुकरी, दानिश तुळवे,नौफिल येरुणकर आदी सभासद उपस्थित होते.

# शिवकृपाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**म्हसळा :** शिवकृपा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची यंदाची दिनदर्शिका संस्थेचे चेअरमन तथा माजी नगराध्यक्ष दिलीप कांबळे यांच्या शुभहस्ते नुकतीच प्रकाशित करण्यात आली.या दिनदर्शिका प्रकाशन सोहळ्यासोबतच संस्थेच्या प्रतिनिधींच्या माध्यमातून ग्राहकांना दिनदर्शिका वितरित करण्याचा कार्यक्रमही उत्साहात पार पडला.यावेळी संस्थेचे संचालक महेंद्र पारेख,अनंत येलवे,विलास खेडेकर,सहाय्यक व्यवस्थापक सुजित बोरकर तसेच कर्मचारी ज्योती करडे,राजेंद्र मोहिते, महादेव भुवड यांच्यासह मोठ्या संख्येने ग्राहक वर्ग उपस्थित होता. म्हसळा तालुक्यात शिवकृपा पतसंस्थेच्या आंबेत, खामगाव,पाभरे, खरसई,मेंदडी आणि तुरुंबाडी अशा सहा शाखा कार्यरत असून या सर्व केंद्रांतील स्वल्प बचत प्रतिनिधीही या कार्यक्रमास उपस्थित होते.

# वीज कनेक्शन मिळण्यासाठी नवी व्यवस्था

**| मुंबई | प्रतिनिधी |**

ग्राहकाने अर्ज केल्यानंतर महानगरांमध्ये तीन दिवसात, शहरांमध्ये सात दिवसात आणि ग्रामीण भागात १५ दिवसात नवे वीज कनेक्शन देण्याच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कालमर्यादेची तंतोतंत अंमलबजावणी करण्यासाठी महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यपद्धतीत बदल केला आहे. त्यामुळे ग्राहकांना वीज कनेक्शनसाठी वाट पहावी लागणार नाही, असा विश्वास महावितरणच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

महावितरणकडून मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्यात वीज पुरवठा सेवा दिली जाते. ग्राहकांना नव्या वीज कनेक्शनसाठी ऑनलाईन अर्ज करता येतो. अर्जासोबत दाखलेही जोडता येतात. महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून अर्जाची व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर ग्राहकाला शुल्क भरण्याची सूचना दिली जाते. ग्राहकाने पैसे भरले की, नवा मीटर जोडून ग्राहकाला वीज कनेक्शन दिले जाते.

सध्याची ही पद्धती अर्ज केल्यापासून नवे कनेक्शन दिल्याची यंत्रणेत नोंद होण्यापर्यंत पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख करण्यात येत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना हमखास आयोगाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत नवी जोडणी मिळण्याचा विश्वास महावितरणच्या प्रशासनाला वाटतो.

# पोटासाठी चिमुकलीची तारेवरची कसरत

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**



शहरातील तवसाळकर लॉज समोरील एका रस्त्याच्या कडेला गुणिले आकाराचे दोन खांब एकमेकांसमोर उभे केलेले आणि त्याला जोडणारा एक दणकट दोरखंड बांधुन जमिनीपासून तब्बल पाच ते सहा फूट उंचीवर असलेल्या दोरीच्या एका टोकावरून दुसऱ्या टोकावर तोल संभाळत गाण्याच्या तालावर चिमुकली कवायतीचे प्रकार दाखवत होती. आणि या रस्त्यावरून येणारे जाणारे नागरिक हे सर्व पाहून भावुक होत होते.एवढ्या लहान वयात पोटापाण्यासाठी या चिमुकल्याना हे करावं लागत आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही जगण्यासाठी सुरू असलेली गरीबाची धडपड पाहून अद्याप गरिबी हटलेली नाही या साहसी खेळांच्या माध्यमातून दिसून येत होत.

समिर नाट छत्तीसगड विलासपुरमधून माझ्या परिवारासह पोटासाठी शहरात आलो असून पोटासाठी माझी बहिण मंजु नाट रशीवर चालुन नागरिकांचे मनोरंजन करीत आहे. नागरिक हे पाहून पैसे देतात.त्या पैशातुन आमचा गुजारा होतो, अशी प्रतिक्रिया समिर नाट यांनी दिली.

**महाराष्ट्र शासन**
**वन विभाग**
**उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग रोहा यांचे कार्यालय,**
वन भवन, रोहा चणेरा रोड, रोहा, जि. रायगड, पिन - ४०२१०९
दूरध्वनी क्र :- ०२१९४ २३५७५५ Email ID: dycfroha@mahaforest.gov.in

**ई निविदा सूचना क्रमांक ३/२०२५-२६**

उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग रोहा हे महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता बी-१ नमुन्यातील दुसऱ्या फेरीची निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उप वनसंरक्षक, रोहा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
कामाचे नाव :- डॉ. सी. डी. देशमुख जैवविविधता उदयान अंतर्गत मौजे जामगाव कं.नं. ३७९ पार्ट येथे जांभा दगडातील नैसर्गिक पदपथ तयार करणे, वनक्षेत्र : रोहा, ता. रोहा, जि. रायगड
अंदाजित किंमत रुपये :- १,७९,९५,७७४/-
ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ०२/०१/२०२६ ते दिनांक ०९/०१/२०२६
ई-निविदा उघडणे :- दिनांक १२/०१/२०२६ रोजी कार्यालयीन कामकाज वेळेत (शक्य झाल्यास)
खालील संकेतस्थळावर ई-निविदेबाबतची सर्व सविस्तर माहिती उपलब्ध आहे.
१) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) उप वनसंरक्षक, रोहा यांचे कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र.ब/३०/योजना/ईनिविदा/४००२/२०२५-२६
रोहा ४०२ १०९, दिनांक २३/१२/२०२५
**उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग यांचे कार्यालय**

सही/-
**उप वनसंरक्षक**
**रोहा वनविभाग, रोहा**

# जिल्ह्यात नववर्षाचा उत्साह शिगेला



## मुरुड समुद्रकिनारी महोत्सवाचे आयोजन

■ नवीन वर्षाच्या स्वागतासाठी आतषबाजी
■ सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी ऑर्केस्ट्रा

**। मुरुड-जंजिरा/आगरदंडा । प्रतिनिधी ।**

मुरुड शहर हे ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले शहर आहे. येथील निसर्ग सौंदर्य व निळाशार समुद्र पर्यटकांना नेहमी आकर्षित करतो. मुरुड शहरातील व आजुबाजूच्या परिसरातील काही पर्यटकांना लुभवणारी स्थळे व समुद्रकिनारा अधिक सुंदर आणि पर्यटकांनाभावेल अशा पद्धतीने विकास करण्यासाठी आगामी काळात राज्य व केंद्र शासनाचा मोठा निधी येथे देण्याची लवकरच तरतूद केली जाईल. जगभरातील पर्यटक मुरुड शहरात येण्यासाठी व पर्यटकांचा ओघ वाढण्यासाठी मुरुड समुद्रकिनाऱ्याला ब्लू फ्लॅगचे नामांकन मिळवून देण्याचा आमचा पहिला प्रयत्न राहणार आहे. पुढील काळात मुरुड शहराच्या सर्वांगीण विकासावर भर देणार असल्याचे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी केले.

यंदा खास लोकाग्रहास्तव मुरुड समुद्रकिनारी सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने मुरुड महोत्सव आयोजित करण्यात आला. त्यानिमित्ताने ३१ डिसेंबर रोजी सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी मुरुड समुद्रकिनारी जमलेल्या हजारो पर्यटक व स्थानिकांच्या उपस्थितीत मुंबईच्या संगीता मेळेकर यांच्या वाद्यवृंदाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अध्यक्ष म्हणून ते बोलत होते.

मुरुड समुद्रकिनारी नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी संगीता मेळेकर प्रस्तुत 'गाता रहे मेरा दिल' हा म्युशिकल ऑर्केस्ट्रा ठेवण्यात आला होता. हा कार्यक्रम पहाण्यासाठी हजारोच्या संख्येने स्थानिक नागरिक व पर्यटक मोठ्या संखेने उपस्थित होते. या संगीतमय ऑर्केस्ट्राचा आनंद स्वतः खासदार तटकरे यांनी उपस्थित राहून घेतला.

त्यानंतर मध्यरात्री फटाक्याची मोठी आतिषबाजी करून नवीन वर्षाचे स्वागत करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष फैरोज घलटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन मनोज भगत, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दांडेकर, सुबोध महाडिक, हसमुख जैन, भाई सुर्वे, शाम कोतवाल, अजित कासार, नम्रता कासार, नगरसेवक रुपेश पाटील, नगरसेवक प्रांजली मकू, प्रीता चौलकर, प्रमिला माळी, आदेश दांडेकर, श्रद्धा अपराध आदींसह असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.







● नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पर्यटक आणि स्थानिकांनी अलिबाग समुद्रकिनारी गर्दी केली होती. यावेळी तरुणांनी फटाक्यांची आतशबाजी करत, डीजेच्या तालावर थिरकत जल्लोष करीत नवीन वर्षाचे स्वागत केले. (छायाचित्र : समीर मालोदे)

## नववर्ष स्वागतानिमित्ताने पालखी सोहळा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नववर्ष स्वागताच्या निमित्ताने व मंदिराच्या ४३व्या वर्धापन दिनानिमित्त पनवेलमध्ये श्री भगवती साई संस्थानच्यावतीने पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ही पालखी मिरवणूक गुरूवारी (दि.१) सकाळी श्री साईबाबा मंदिरातून काढण्यात आली. या पालखी सोहळ्यात रथामध्ये साईबाबा व नारायण बाबा यांच्या मुर्त्या



स्थापित करण्यात आला होत्या. ही पालखी पनवेल रेल्वे स्थानक, बस स्थानक, लाईन आळी, छत्रपती शिवाजी महाराज अश्वारुढ पुतळा, करत सोसायटीमार्गे पुन्हा श्री साईबाबा मंदिर अशी वाजत गाजत ओम साईच्या गजरात काढण्यात आली. यावेळी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याचा लाभ शेकडो भक्तांनी घेतला. या मिरवणुकीत श्री नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष खेमचंद गोपलाणी, सेक्रेटरी रामलाल चौधरी, राम थडानी, डॉ. शकुंतला भटिजा तसेच श्री साईबाबा नारायणचे भक्त मोठ्या संख्येने सहभागी होते.

## थर्टी फस्टसाठी खालापूर फुल्ल

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यात बऱ्यापैकी फार्म हाऊस आहेत. थर्टी फस्टचा आनंद लुटण्यासाठी येथील फार्म हाऊसवर त्यांचे मालक आले आहेत. तसेच, काही ठिकाणी पर्यटकांनी अगोदरच बुकिंग करून ठेवल्याने नववर्षाच्या पुर्वसंध्येला खालापूरातील फार्म हाऊसवर मोठी गर्दी केली होती. यादरम्यान, पर्यटकांकडून अनुचित प्रकार, अपघात तसेच अधिकची संकटे टाळण्यासाठी खालापूर पोलिसांनी रिसार्ट आणि फार्महाऊसवर पोलीस बंदोबस्त ठेवला होता. याची माहिती खालापूरचे पोलीस निरिक्षक सचिन पवार यांनी दिली आहे.



खालापूर तालुक्यातील चौक, बीड जांबरूग, केळवली माणकीवळी तसेच खोपोली शहरापासून काही अंतरावर गारमाळ परिसरात ठाकरे बंधुंबरोबरच अनेक सेलिब्रिटींची, राजकारणी, विविध क्षेत्रातील व्यावसायिक, बिल्डर, उच्चपदस्थ अधिकारी यांनी फार्म हाऊस बांधले आहेत. तसेच, अँडलँब इमिजिका, कँममँक्स, मँटेरिया या ठिकाणी थर्टी फस्टची पार्टी सेलिब्रेट करण्यासाठी मुंबईकरांनी मोठी गर्दी केली होती. यादरम्यान, पोलिसांचा फौज फाटा रस्त्यावर ठिकठिकाणी होता. यावेळी नाकाबंदी करून वाहनांची, चालकांची कसून तपासणी करण्यात आली. यामध्ये मद्य प्राशन कलेले आढळल्यास त्यांच्यावर त्वरित कारवाई करण्यात आली. तसेच, या दिवशी पोलिसांच्या कारवाईपासून अलिप्त राहण्याची फार्म हाऊसमध्ये पार्टी करण्याकडे अनेकांनी पसंती दिली आहे. त्यामुळे सरत्या वर्षाला निरोप देऊन नववर्षाचे स्वागत करण्यासाठी फार्म हाऊसवर डीजेच्या तालावर दंग होताना नागरिकांना त्रास होणार नाही यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## पनवेलकरांकडून नवीन वर्षाचे स्वागत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नववर्षाच्या स्वागतासाठी नवी मुंबई शहरात पोलिसांकडून कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. नवी मुंबई आणि पनवेल परिसरात एकूण २,५०० पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. तसेच, फार्म हाऊसवर होणाऱ्या पार्ट्यांवर विशेष लक्ष ठेवण्यात आले होते. त्यामुळे पनवेलकरांनी नवीन वर्षाचे स्वागत करताना कोणतीही घटना घडली नाही, अशी माहिती नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिली. पनवेल शहरात नवीन वर्षाचे स्वागत शांततेत तसेच कायद्याच्या चौकटीत व्हावे यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा फौज फाटा नवी मुंबई पोलिसांनी उतरवला होता.



● नवीन वर्षाच्या स्वागतासाठी रायगडमध्ये आलेल्या पर्यटकांनी घरीच कुटुंबासोबत पोपटीचा आस्वाद घेत नवीन वर्षाचे स्वागत केले.

## नवीन वर्षाचा सूर्य आभाळाआड



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

अनेक जण नवीन वर्षाचे स्वागत हे उगवत्या सूर्याचे दर्शन घेऊन करतात. मात्र, १ जानेवारी रोजी इंग्रजी नववर्षाचे स्वागत करण्यासाठी सकाळी पूर्वे कडे सूर्य कधी उगवतोय, याकडे नेरळकर नजर लावून बसले होते. परंतु, यावेळी आभाळ दाटल्याने उगवत्या सूर्याचे दर्शन चक्क साडेनऊ वाजता झाले. त्यापूर्वी पावसाने पाण्याचा शिडकावा करून नवीन वर्षाचे स्वागत केले.

२०२५ या वर्षाला निरोप देण्यासाठी पर्यटक थंड हवेचे ठिकाणी, रिसॉर्टवर आणि समुद्रकिनारी गर्दी करून होते. त्यांनी मध्यरात्री बारा वाजेपर्यंत सरत्या वर्षाला निरोप दिला आणि त्यानंतर २०२६ सुरू झाल्याचा आनंद फटाके फोडून व मिठाई वाटून केला. त्यासाठी कर्जमधील रिसॉर्टवर पार्ट्या रंगल्या होत्या. मात्र, २०२६ या इंग्रजी वर्ष सुरू होत असताना या सालाच्या पहिल्या सकाळी बराच काळ सूर्य आकाशात दिसून आला नाही. त्यानंतर अनेक ठिकाणी सकाळी सात ते आठ वाजण्याच्या दरम्यान पावसाचा शिडकाव सुरू होता. यादरम्यान, कर्जत तालुक्यात सर्वत्र सकाळी आभाळात धुक्याची दुलई होती आणि त्यात ढग देखील होते. त्यामुळे गुरूवारच्या सूर्योदयाची वेळ सकाळी ७ वाजून १४ मिनिटे असताना अगदी त्याच वेळी आभाळ दाटले होते.

त्यामुळे नवीन वर्षाचा सूर्य दर्शन कधी देणार? याची वाट नेरळकर पाहत होते. शेवटी पावसाचा लहानसा शिडकावा होऊन गेल्यावर साडेनऊ वाजताच्या सुमारास या वर्षातील पहिले सूर्य दर्शन घडले. त्यामुळे यंदा प्रथमच नवीन वर्षातील पहिला सुर्योदय आणि सुर्य देर्शन नेरळकरांना सकाळी लवकर करता आले नाही.




● 'द दारूचा नव्हे, तर द दुधाचा' याचा प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने ३१ डिसेंबरच्या सायंकाळी अलिबागमधील महावीर चौकातील दारूच्या दुकानासमोर मोफत दूध वाटप करून दारूबंदीबाबत जनजागृती करण्यात आली. (छायाचित्र : समीर मालोदे)

● राजकारणापासून दूर, एकतेच्या धाग्यात बांधलेल्या अलिबाग तालुक्यातील रेवदंडा गावात वर्षाच्या शेवटच्या रात्री बुधवारी (दि.३१) एकता मित्र मंडळ आयोजित 'बीच उत्सव-जल्लोष नवीन वर्षाचा' या कार्यक्रमाने संपूर्ण समुद्रकिनारा आनंदाच्या लाटांनी बहरला.



## 'जश्न ए रोहा'द्वारे नववर्षाचे स्वागत



**। चणेरा । प्रतिनीधी ।**

लीलावती इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, रोहा यांच्यावतीने नववर्षाच्या स्वागतासाठी 'जश्न ए रोहा' या भव्य आणि उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हॉटेल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना इव्हेंट मॅनेजमेंट, गेस्ट हँडलिंग व हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला.

या कार्यक्रमाला शहरातील अनेक मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रोह्याचे पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी कार्यक्रमाला भेट देत विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या नियोजन, शिस्त आणि व्यवस्थापन कौशल्याचे कौतुक केले. या कार्यक्रमाला लीलावती इन्स्टिट्यूट हॉटेल मॅनेजमेंटच्या डायरेक्टर प्रतिभा कोंडे, संस्थेचे अध्यक्ष उदय कोंडे, वाइस प्रिन्सिपल प्रिया पाडवे, प्रोफेसर आशिष कदम व काझी, शुभम दिवेकर यांची उपस्थिती लाभली.



रस्त्याची साईटपट्टी बनतेय कचराकुंडी | ग्रामीण भागातील आरोग्य धोक्यात

## वाटसरूंचा नवीन वर्षाचा प्रवास नाक दाबून

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग-रेवदंडा व अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्यांच्या दुतर्फा ठिकठिकाणी कचरा टाकला जात आहे. त्यामुळे पर्यटकांसह स्थानिकांना नाक दाबून प्रवास करण्याची वेळ आली आहे. सध्या रस्त्याची साईडपट्टी कचराकूंडी बनली आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भिती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे अलिबाग तालुक्यातील आक्षी ते नवेदरबेली दरम्यान रस्त्याच्या दुतर्फा कचऱ्याचा ढिगारा साचला आहे. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांना नवीन वर्षाच्या सुरूवातीचा प्रवासच नाक दाबून करण्याची नामुष्की ओढावली .

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजारहून अधिक आहे. त्यात २ हजारहून अधिक गावे व वाड्यांचा समावेश आहे. तसेच, जिल्ह्यात ८१० ग्रामपंचायती आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहवे, येथील रुग्णांना तात्काळ रुग्ण सेवा मिळावी यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या अखत्यारित ५४ प्राथमिक आरोग्य केंद्र व २८८ उपकेंद्र आहेत. जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता मिशन या विभागामार्फत ग्रामीण भागात स्वच्छता राखण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. वेगवेगळ्या योजना राबवून नागरिकांमध्ये जनजागृती केली जाते. काही ग्रामपंचायतींनी पंधरा वित्त आयोगातून घंटा गाडी खरेदी केल्या आहेत. मात्र, कचरा कुठे टाकायचा, हा प्रश्न गंभीर झाला आहे. घनकचरा व्यवस्थापन ग्रामपातळीवर नाही. त्यामुळे आक्षी ते नवेदरबेली दरम्यान रस्त्याच्या बाजूला ठिकठिकाणी कचरा टाकला जात आहे. रात्रीच्या वेळी काही महाभाग हा प्रकार करीत आहेत. त्यामुळे अनेक रस्त्यांची साईटपट्टी कचरा कुंडीचा अड्डा बनू लागली आहे. रस्त्याच्या बाजूला कचरा पडल्याने त्याचा नाहक त्रास प्रवासी व स्थानिकांसह पर्यटकांना होत आहे. त्यामुळे वर्षाची सुरूवातीलाच नाक दाबून प्रवास करण्याची नामुष्की त्यांच्यावर आली. तसेच, या ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा वावर देखील वाढू लागला आहे. त्यामुळे वाटसरूला चावण्याची तसेच गाडीसमोर येऊन मोठा अपघात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच, रस्त्याच्या बाजूला पडलेल्या कचऱ्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य धोक्यात येण्याची भिती निर्माण झाली आहे. याकडे जिल्हा परिषद प्रशासनाकडून गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली जात आहे.

> आक्षी पुलाजवळ कचरा टाकण्यावर बंदी घालण्यात आली आहे. याआधी त्याठिकाणी जाळी लावण्यात आली. तसेच कचरा टाकू नये, असे सुचना फलकही लावण्यात आले. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करीत काही मंडळी रात्रीच्या वेळी याठिकाणी कचरा टाकतात. हे प्रकार थांबणे गरजेचे आहे. कचऱ्यामुळे आरोग्य धोक्यात येण्याची भिती आहे.
> – रश्मी पाटील, सरपंच, आक्षी

### कंपोस्ट पीट प्रकल्प नावापुरताच

कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील कचऱ्याचे व्यवस्थानपन करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या पुढाकाराने ग्रामपंचायत स्तरावर कंपोस्ट पीटची संकल्पना राबविण्यात आली. ग्रामपंचायतीने पुढाकार घेत अनेक ठिकाणी कंपोस्ट पीट उभारले आहेत. या कंपोस्ट पीटमध्ये कचरा टाकण्याचे काम करण्यात आले. परंतु, या कंपोस्ट पीटवर कचऱ्याचे डोंगर उभे राहत आहे. काही कंपोस्ट पीट रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली तोडण्यातदेखील आले आहेत. त्यामुळे कंपोस्ट पीटची योजनादेखील बारगळी असल्याचे चित्र आहे. खतनिर्मिती करण्यासाठी कंपोस्ट पीट तयार करण्यात आले. परंतु, हे कंपोस्ट पीट कचरा कुंडी झाली आहे. अनेक गावांच्या प्रवेशद्वारासमोरच कचरा टाकला जात असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भिती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कंपोट पीट प्रकल्प फक्त नावापूरता अशी परिस्थिती दिसून येत आहे.

## रेवदंडा जेट्टीवर महिलेचा मृतदेह

**रेवदंडा :** अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथील मोठ्या बंदर खाडीच्या जेट्टीवर एका वृद्ध महिलेचा मृतदेह सापडल्याची घटना घडली. याबाबतची माहिती स्थानिक नागरिकांनी रेवदंडा पोलिसांना दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचत प्राथमिक तपास केला असता, महिलेची ओळख पटविण्यात यश आले नाही. हा मृतदेह रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आला; मात्र, तेथे शवविच्छेदनाची सोय नसल्याने अलिबाग जिल्हा रूग्णालयात नेण्यात आले. या महिलेचे अंदाजे वय ६० ते ७० वर्षे असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. तिच्या कपड्यांवरून ती स्थानिकच असावी, असा संशय व्यक्त होत आहे. जेट्टी परिसरातील मच्छीमार आणि पर्यटकांकडून ती विहंगावत किंवा नैसर्गिक मृत्यू असावा, असे सांगितले. मात्र, पोलिसांनी खाडीत बुडून मृत्यू किंवा इतर संशयास्पद कारण असण्याची शक्यता वर्तविली आहे.

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# जिथे तिथे दगाबाजी

महापालिका निवडणुकांच्या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मंगळवारी राज्यभरात जो काही तमाशा झाला तो मुख्यतः भाजप व शिंदे गटाच्या दगाबाजीच्या धोरणांचा परिणाम आहे. यामध्ये विशेषतः भाजपचे नाक चांगलेच चेचले गेले आहे. आमच्या पक्षात सर्व काही शिस्तशीरपणे होते असे नाकाने कांदे सोलणाऱ्या भाजप नेत्यांची गेल्या दोन दिवसात पळता भुई थोडी झाली आहे. शिंदे गटाचीही हीच स्थिती आहे. संभाजीनगरात नाराजांनी बुधवारीदेखील हैदोस घातला. मंत्री अतुल सावे यांची गाडी रोखून तिला काळे फासण्याचा प्रयत्न झाला. माजी मंत्री भागवत कराड यांच्या गाडीला गराडा घालून शिवीगाळ करण्यात आली. एका नाराजाने तर पेट्रोल ओतून घेऊन स्वतःला पेटवण्याचा प्रयत्न केला. एका महिलेने भाजप पदाधिकाऱ्याचे थोबाड फोडले. भाजप नेत्यांचे फोटो फाडण्यात आले. पैसे घेऊन तिकिटे विकली गेल्याचे आरोप करण्यात आले. काही महिला उपोषणाला बसल्या. नाशिकमध्येही उद्रेकाचा स्फोट झाला. तिथे १२२ जागांसाठी एक हजार अपक्ष रिंगणात आहेत. भाजपने अशोक मुर्तडक यांच्यासारख्या माजी महापौरांसह २२ माजी नगरसेवकांना उमेदवारी दिलेली नाही. याउलट बाहेरून भाजपमध्ये आयात केलेल्या तब्बल ३३ आयारामांना तिकिट देण्यात आले. ठाकरे गटातून परवा पक्षात दाखल झालेल्या सुधाकर बडगुजर यांच्या कुटुंबातल्या तीन तर मनसेचे नेते दिनकर पाटील यांच्या घरातल्या दोघांना उमेदवारी देण्यात आली. त्यापूर्वी मंगळवारी गुप्तपणे एका बंगल्यातून एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले. पण ती बातमी फुटल्याने नंतर इच्छुकांनी या बंगल्यात धुमाकूळ घातला. नंतर एबी फॉर्म घेऊन चाललेल्या आमदार सीमा हिरे यांच्या गाडीचा पाठलाग करून धमकावण्यात आले. सिडको भागात तर एकेका वॉर्डात दोन-दोन उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आले. यापूर्वी सेना व मनसेच्या नेत्यांना आपल्याला न विचारता पक्षात घेतल्याबद्दल भाजपमध्ये राडे झाले होते. गिरीश महाजन यांना पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमासाठी कार्यालयात पोचणेही अशक्य झाले होते. आमदार फरांदेबाईंना अश्रू आवरले नव्हते. तिकडे अमरावतीत भाजपच्या नेत्यांना हिंदुत्ववादी संघटनांच्या कार्यकर्त्यांनी घेराव घालून शिवीगाळ केली. तिकिट वाटपात जाणीवपूर्वक भानगडी किंवा भ्रष्टाचार झाल्याचे आरोप करण्यात आले.

## महिला कार्यकर्त्यांचा संताप

नगरपालिका निवडणुकांमध्ये प्रचंड यश मिळवल्यानंतर भाजप आणि शिंदे गटाचा टेंभा असा होता की, आता विरोधकांचा पालापाचोळाच होऊन जाईल. त्यातून महाविकास आघाडीतील पक्षांचे एकमत होईना. तिघांच्या तीन तऱ्हा अशी स्थिती होती. शिवाय, या पक्षांमधून भाजपमध्ये येणाऱ्यांचा ओघ काही संपतच नव्हता. त्यामुळे आपल्या यशाला आता किनाराच नाही असा भाजपवाल्यांचा आविर्भाव होता. पण त्यांच्या फुग्याला टाचणी लावण्याचे काम बंडखोरांनी केले. कारण, मुळात हा टेंभाच खोटा होता. पैसा व सत्तेच्या जिवावर आपण काय वाटेल ते करू असे भाजपवाल्यांना वाटू लागले होते. भाजपच नव्हे तर विरोधी पक्षदेखील देवेंद्र फडणवीसच चालवतात असा माज भाजप कार्यकर्ते दाखवत होते. प्रत्यक्षात बाकीचे पक्ष तर सोडाच, पण आपला पक्षही यांना धड सांभाळता येत नाही हे मंगळवारी उघड झाले. आता बंडखोरांची समजूत काढू, एका जागेसाठी शंभर जण इच्छुक असले की ९९ जण नाराज होणारच असे फडणवीस आता सांगत आहेत. पण असे होणार याचा अंदाज यांना आधी का आला नाही हा खरा प्रश्न आहे. शिवाय, त्याहूनही महत्वाचे म्हणजे, आपल्याला तिकिट मिळाले नाही यापेक्षाही अपात्र आणि कालपरवा बाहेरच्या पक्षातून आलेल्यांना ते मिळाले याचा संताप बंडखोरांमध्ये अधिक आहे. मुंबईत दहिसरमध्ये दोन दिवसांपूर्वी भाजपमध्ये आलेल्या तेजस्वी घोसाळकरांना उमेदवारी देण्यात आला. त्याबाबत भाजपच्या एका कार्यकर्तीने जाहीर सभेतच नाराजी बोलून दाखवली व नेत्यांना जाब विचारला. पक्षासाठी दिवसरात्र काम केले, पैशांचा विचार केला नाही, मग आम्ही कुठे चुकलो असे त्यांचे म्हणणे होते. अशीच भावना राज्यभरात अनेक ठिकाणच्या कार्यकर्त्यांनी बोलून दाखवली आहे. विशेष म्हणजे यात महिलांचे प्रमाण अधिक आहे. या काळात भाजपचे वरिष्ठ नेते तोंड लपवून बसले होते. आता ते हळूच प्रचाराला बाहेर पडतील आणि बंडखोरांना गुंडाळले जाईल.

## मित्रांनाही फसवले

स्वतःच्या कार्यकर्त्यांशीच नव्हे तर आपल्या मित्र पक्षांशीही भाजपवाल्यांनी अशीच दगाबाजी केली. युती होणार आहे म्हणून झुलवत ठेवत शेवटच्या क्षणापर्यंत लोंबकळत ठेवले. आपल्या पक्षातील लोकांना गुपचूप एबी फॉर्म्स वाटले. यामुळे पुण्यात शिंदे गट गाफील राहिला. त्याने मर्यादित जागांची तयारी केली. शेवटच्या क्षणी युती होत नाही असे दिसल्यावर स्थानिक नेत्यांनी येईल त्याला फॉर्म्स वाटून टाकले. मग घाईघाईने उदय सामंत यांना सारवासारव करण्यासाठी पाठवण्यात आले. युती झालेली आहेच, कोणतीही बंडखोरी नाही असे ते सांगत असतानाच शिंदे गटाचे महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर हे मात्र वेगळीच कहाणी सांगत होते. १६० च्या वर लोकांना अर्ज वाटले गेले आहेत व आता ते परत घेणे कठीण आहे असे ते सांगत होते. तिकडे पिंपरीमध्येही एकीकडे शिंदे गटाला असा धोका देऊन दुसरीकडे शेवटच्या क्षणी अजितदादा गटाचे लोक फोडण्यात आले. भाजप जर स्वतः इतका सामर्थ्यशाली आहे तर त्याला अशी फोडाफोडी का करावी लागते याचे उत्तर कार्यकर्त्यांनी आता नेत्यांना विचारायला हवे. सत्तेच्या जोरावर भाजप कितीही बेटकुळ्या फुगवून दाखवत असला तरी त्याची शक्ती किती पंक्चरलेली आहे याचे दर्शन गेल्या चार दिवसात या सर्व प्रकारांमुळे झाले. संघ परिवारवाले एरवी सदाचार आणि शिस्तीच्या गप्पा मारत असतात. आता त्यांची बोलती यावर बंद आहे. मोहन भागवत किंवा मोदी असल्या गोष्टींवर कधीच बोलणार नसतात. सत्ता मिळवण्यासाठी १९४७ पासून २००० सालापर्यंत हा पक्ष थांबला. पण आता सत्ता हातात ठेवताना त्याची तमाम नैतिकता आणि शुचिता किती खोटी होती हे उघड होऊ लागले आहे. उद्या हे सगळे होऊनही भाजपला कदाचित मोठे यश मिळेलही. पण त्या यशाची किंमत काय असेल? आपल्याच लोकांना जमिनीत गाडून मिळवलेली ही सत्ता भाजपला अधिकाधिक अधोगतीकडे घेऊन जाईल. यातून केवळ भाजपचेच नव्हे तर एकूण लोकशाही प्रक्रियेचेही मोठे नुकसान होते आहे. सत्ता मिळवण्यासाठी कोणत्याही थराला गेले तरी चालते असा संदेश प्रसृत होऊ लागला आहे. मुळात स्थानिक पालिका इत्यादींच्या निवडणुका जर कार्यकर्त्यांच्या असतील तर भाजपने त्या स्थानिक लोकांना लढू द्यायला हव्या होत्या. पण दिल्लीपासून गल्लीपर्यंत कमळ एके कमळच दिसले पाहिजे अशा राक्षसी इच्छेतून सर्व नियम, नैतिकचा यांचा चुराडा चालू आहे. निवडून येण्याची क्षमता लक्षात घेऊनच आम्ही तिकिटे दिली आहेत असे अमित साटम म्हणाले. गुंडपुंड, पैसेवाले असे मिळूनच उद्याच्या महापालिका चालवणार आहेत व त्यांना फडणवीस सरकारचे आशीर्वाद असणार आहेत असा याचा अर्थ आहे.

विचार

# हुतात्मा भाई कोतवाल बलिदान दिवस

***कर्जत तालुक्यात आणि त्यातही माथेरानमध्ये देश पारतंत्र्यात असतांना ब्रिटिशांविरुध चळवळ उभी राहिली. त्यात आझाद दस्ता सारखी देशप्रेमाने पेटून उठलेल्या तरुणांची फळी उभी करण्यात भाई कोतवाल यशस्वी ठरले. या आझाद दस्त्याचे यश इतके मजबूत होते की, त्यांच्या चळवळीमुळे ब्रिटिशांना इनाम लावायची वेळ आली होती. त्या इनामासाठी काही जण प्रसंगी फितूरी झाले आणि भाई कोतवालांसह हिराजी पाटील यांना बिटिशांच्या पुढे आपला देह ठेवावा लागला. या दोन्ही हुतात्म्यांच्या बलिदानाला आज ८३ वर्षे पूर्ण होत आहेत.***



माथेरानमध्ये १ डिसेंबर १९१२ साली एका गरीब नाभिक कुटुंबात जन्माला आलेले विठ्ठलराव लक्ष्मणराव उर्फ भाई कोतवाल यांनी आपले सुरूवातीचे शालेय शिक्षण माथेरानमध्ये घेतल्यावर पुढील शिक्षण पुणे येथील फर्ग्युसन कॉलेज मध्ये पूर्ण केले. पेशाने वकिली जरी केली असली तरी त्यांनी नोकरी करण्याचे कदापि मनाशी ठरविले नाही. कारण देश हा ब्रिटीशांची गुलामगिरी सहन करीत असतांना आपण स्वतःच्या स्वार्थासाठी नोकरी करून कुटुंबासाठी पैसा कमावीने त्यांना रूचले नाही. त्यातच त्यांचा विवाह पुणे येथील इंदिराबाई यांच्याशी झाल्यावर आणखी एक जबाबदारीही वाढली होती. परंतु, देशसेवेने झपाटलेल्या भाई कोतवाल यांचे संसारात मन मुळीच रमले नाही. रायगड जिल्ह्यातील देशसेवक गोळा करून ब्रिटिश सत्ता उलथवुन कशी टाकता येईल, हा एकच ध्यास त्यांच्या मनी होता. त्यामुळे त्यांनी नेरळ, मुरबाड, पुणे तसेच राज्यातील अन्य भागातील तरुणांची फौज गोळा करण्यास सुरुवात केली. भारत देश सुजलाम सुफलाम करण्यासाठी, तसेच समाज समृद्ध असावा, मुलांवर सुयोग्य चांगल्या प्रकारे संस्कार असावेत, शिक्षणाने माणसे घडली पाहिजेत, प्रत्येकाच्या अंगी देशभक्ति रूजवावी, समाजाभिमुख समाजनिष्ठा तरुणांच्या हुदयात बसावी या हेतूने त्यांनी प्रथमतः 'आझाद दस्ता' यासाठीच निर्माण केला. या दस्त्याचा एकमेव हाच उद्देश होता. त्याप्रमाणे त्यांनी आपले मोजकेच शूर, निष्ठावंत, एकनिष्ठ सेवक सोबत ठेवले आणि ते शेवटपर्यंत भाईंच्या सोबत राहिले. यामध्ये हिराजी पाटील हे पितापुत्र शेवटच्या क्षणापर्यंत धैर्यशौर्याने संगती होते.

माथेरानमध्ये भाऊसाहेब राऊत यांनी सुरुवातीपासून गावातील देशप्रेमी तरुणांच्या पाठीशी आपली ताकद लावली होती. त्यामुळे महात्मा गांधी यांनी १९४२ साली ब्रिटिशंविरुद्ध 'चलेजाव'ची हाक देण्यासाठी मुंबईत ग्वालिया टँकवर देशप्रेमी नागरिकांना बोलाविले होते. त्यावेळी माथेरानमधील भाई कोतवाल आणि त्यांचे सहकारी तेथे उपस्थित होते. त्यानंतर त्या सर्वांनी ब्रिटिश सरकारला सळोकी पळो करून सोडण्यासाठी योजना आखाण्याचा निर्णय घेतला. मुंबई ही ब्रिटिशांनी आपली आर्थिक राजधानी केली होती आणि मुंबईला वीज पुरवठा करणाऱ्या काही मार्गिका कर्जत व अंबरनाथ तालुक्यातुन जात होत्या. भिवपुरी येथील टाटा पावर स्टेशनमध्ये तयार झालेली वीज मुंबईला ज्या टॉवरच्या सहाय्याने जाते ते टॉवर म्हणजे त्या काळातील प्रचलित शब्द 'पायलन' पाडले तर मुंबईचा वीज पुरवठा खंडित होईल. त्यामुळे ब्रिटिशांना थोडा त्रास देता येईल, अशी कल्पना भाई कोतवाल यांच्या आझाद दस्त्यातील प्रमुख मानिवलीच्या गोमाजी पाटील यांना सुचली.



त्यानंतर या पथकाने वांगणी जवळील डोणे येथील टाटाची वीज वाहून नेणारे पायलन पडण्याचा निर्णय २२ सप्टेंबर १९४२ रोजी घेतला आझाद दस्त्यामध्ये नेरळ जवळील मानिवली भागातील भगत मास्टर, मुंबई येथील रामलाल श्रीवास्तव, भास्कर तांबट, देशमुख अशी तरुण मंडळी आपल्या वीस ते पंचवीस सहकारी यांच्यासह दिवसा भूमिगत होऊन योजना आखायचे आणि रात्रीच्या सुमारास वीज वाहून नेणारे पायलन तोडण्याचे काम करीत असतांना टेलीफोनच्या तारा वाहून नेणाऱ्या खांबावरून त्या तारा टाकण्याचे काम करायचे. त्यासाठी दिवसा जागा निश्चित करण्याचे काम काही ग्रामस्थ मदत म्हणून करायचे. अनेक लोक आझाद दस्त्यातील तरुणांना मदत म्हणून आर्थिक रसद आणि जेवण पुरावायाचे. पावसाचे दिवस असतांना पायलन तुटून वीज पुरवठा खंडित होत असल्याने ब्रिटिश यंत्रणा हैरान झाली होती. त्यामुळे भाई कोतवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांची माहिती देण्यासाठी रोख इनाम लावले गेले. तरीही काही मदत मिळत नसल्याने अखेर ब्रिटिशांनी जी मंडली आझाद दस्त्यामध्ये आहेत, त्यांच्या घरच्या मंडळींना मारहाण करून त्यांच्याकडून काही माहिती मिळली नाही तर घरातील मोठ्या माणसाला पकडून नेण्याचे काम ब्रिटिश पोलीस करीत असत. त्यात मानिवलीचे गोमाजी पाटील हे दस्त्यातील प्रमुख समजले जात आणि यांचे पुत्र हिराजी हे देखील आपल्या वडिलांची कोणतीही माहिती देत नव्हते. त्यामुळे पोलिसांनी हिराजीला पकडून नेरळ येथून कल्याण येथे नेण्यासाठी आणले. मात्र, हिराजी ब्रिटिश शिपायांच्या तावडीतुन आपली सुटका करून भाई कोतवाल यांच्या आझाद दस्त्यात सामिल झाले.त्यावेळी त्यांचा मुक्काम मुरबाड तालुक्यातील सिद्धगड या जंगल भागात होता. त्या मुक्कामी भाई कोतवाल यांनी दूध आणि भाजी भाकरी घेऊन येणाऱ्या एका आदिवाशी व्यक्तीकडे एक चिठ्ठी भबोरगाव येथील पाटील यांना देण्यासाठी दिली होती. मात्र, ती चिठ्ठी त्या आदिवाशीकडून घेऊन खंडू बोकड थेट ठाणे येथे पोहचला. थोड्याशा पैशांच्या लोभापायी ब्रिटिश अधिकारी होंल पोलीस फोजफाटा घेऊन रात्रभर चालून सिद्धगड येथे पोहचला. त्यावेळी झोपेतुन उठत असलेल्या आझाद दस्त्यावर चोफेर गोलीबार सुरु केला.आणि अचनक झालेल्या गोळीबारात आझाद दस्त्याचे अधवर्यु भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांना हौतात्म्य प्राप्त झाले. भाई कोतवाल यांना गोळी लागताच त्यांनी अन्य सहकाऱ्यांना तेथून पळून जाण्याचा सल्ला दिला होता. त्यामुळे अन्य लोक ब्रिटिशांना सापडले नाहीत. परंतु, आपला सत्तावीस वर्षीय मुलगा गोळी लागुन जखमी झालेला असतांना त्यांना अखेरचे पाणी देण्याचे भाग्य गोमाजी पाटील यांना जमले नव्हते. ब्रिटिशांच्या गोळी मुळे भास्कर तांबट देखिल जखमी झाले होते. त्यांना त्यानंतर चार दिवसांनी मरण आले. त्यामुळे ऐन तारूण्यातच भाई कोतवाल व हिराजी पाटील यांनी आपला देह मायभूमीच्या रक्षणासाठी उपयोगी आणला. तो काळा दिवस होता २ जानेवारी १९४३. नेहमीप्रमाणेच भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या जीवनावर आधारित पोवाडे, देशभक्तिपर गीते गायली जातात. त्याच दिवशी त्यांची आठवण सर्वांनाच येते. माथेरान या जन्मभूमीत सुद्धा नौरोजी उद्यानातील भाई कोतवाल यांच्या अर्ध पुतळ्याला अभिवादन करण्यात येते.परंतु, ज्या माथेरानमध्ये भाई कोतवाल यांनी जन्म घेऊन या इवल्याशा गावाचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवले त्यांच्या बद्दल कृतार्थ अभिमान बाळगण्याऐवजी बहुतांश स्थानिक नागरिक या २ जानेवारीला काही मिनिटे मशाल फेरी आणि अभिवादन करण्यासाठी देखील तत्परता दर्शवित नाहीत. लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी कर्मचारी वर्ग, शिक्षक, शालेय विद्यार्थी आणि जेमतेम बोटावर मोजण्याइतकीच स्थानिक मंडळी पहाटे पाच वाजता मशाल फेरी आणि अभिवादन करण्यासाठी हजर राहते. ही या गावासाठी असलेली शोकांतिका आहे. बदलापूर, मुरबाड आणि अन्य भागांत हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांना अभिवादन करण्यासाठी गर्दी होते. मात्र, माथेरान या बाबींत अपवाद ठरत आहे. या मिळालेल्या स्वातंत्र्यात त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी जसेच त्यांच्या लढ्याच्या व कर्तुत्वाच्या जहाल स्मृती कायमस्वरूपी चिरंतर स्मरणात रहाण्यासाठी माथेरानमधील भाई कोतवाल यांच्या जुन्या घराचे भव्य स्मारक होणे गरजेचे आहे. लोकप्रतिनिधींनी यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

२ जानेवारीला माथेरानचा संपूर्ण परिसर 'भाई कोतवाल अमर रहे' या घोषणांनी दूमदूमतो. देशभक्तिच्या गायनाने अंगावर रोमांच उभा राहून देशभावना जागृत होते.नसानसातून स्फुर्ती उभी राहते. हे केवळ क्षणिक असते.आपण देशासाठी काहीतरी करावे ही सद्भावना राखून निदान आपल्यावर या देशाचे, मातृभूमिचे परोपकार असल्याने गावात स्वच्छता, एकोपा आणि सर्वच समाजाविषयी आपुलकीची भावना तसेच या गावासाठी निःस्वार्थपणे कामे करून राजकारण बाजूलाच सारूनी एकसंघता दाखविली तरी ही आदरांजली या महान विभुतिंसाठी ठरू शकते.

# वणव्यांमुळे वनक्षेत्राची हानी

वैभव पाटील

घटदाट जंगलात झाडांच्या फांद्या एकमेकांवर घासून आग, अर्थात वणवा लागण्याचे दिवस कधीच इतिहास जमा झाले असून शेती, शिकार आदी कारणांसाठी जंगलात वणवे लावण्याच्या घटनांत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. या मानवनिर्मित वणव्यामंध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीचे नुकसान होत आहे. शिवाय दुर्मिळ वन्यजीवांच्या जातीदेखील नष्ट होऊ लागल्या आहेत. अनेक उपाय करूनही वणवे थांबण्याचे नाव घेत नसल्याने हे वणवे रायगड जिल्ह्याच्या वन विभागाची डोकेदुखी ठरू लागली आहे. त्यामुळे अशीच परिस्थिती कायम राहिल्यास जिल्ह्यातील वनांचे अच्छादन नष्ट व्हायला वेळ लागणार नाही, अशी चर्चा सध्या जोर धरत आहे.

दरवर्षी जंगलात वणवे लागतात. त्यात प्रचंड नकसान होत असते. याला आळा घालण्यासाठी अलिबाग वन विभागाने 'फायरब्ला' या यंत्राचा वापर सुरू केला आहे. त्याचबरोबर वणवे विझविण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या 'हॅलो फॉरेस्ट' या शीघ्र प्रतिसात देणार्या हेल्प लाईनचाही नागरिकांडून वापर केला जात आहे. तरीही वणवे लागण्याचे प्रमाण कमी होत नाही. गेल्या महिनाभरात रायगड जिल्ह्यात ३६ ठिकाणी लहान-मोठे वणवे लागले आहेत.

दारूभट्टी लावण्यासाठी जंगल परिसरात वणवे पेटवले जातात. तसेच, जिल्ह्याच्या ग्रामीण शेतकरी शेतात पिके चांगली यावीत, या उद्देशाने दरवर्षी आपल्या शेतात राब भाजतात. शेताच्या जवळच डोंगर असल्याने शेतातील पालापाचोळ्याची ही आग पसरत जाऊन वणव्याचे रूप धारण करते. शेतकरी रब्बी हंगाम संपल्यानंतर शेतातील गवत जाळतात. यामुळेही मोठ्या प्रमाणात वणवे लागतात. वन्य प्राण्यांची शिकार करण्यासाठीही मुद्दाम वणवे लावले जातात. या वणव्यांमुळे औषधी वनस्पती, किटक, जिवाणू, सर्प, पक्षी, सरडे, पाली, ससे, हरणे, कोल्हे, लांडगे आदी वन्य प्राण्याचे जीवन धोक्यात आले आहे. या वणव्यांना आळा घालण्यासाठी स्थानिक वन समितीच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. या बरोबरच वणवे विझविण्यासाठी वन विभागाने अनेक उपाययोजना राबविल्या आहेत. वणव्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वन विभागातर्फे जाळरेषा हा प्रतिबंधात्मक उपाय राबवण्यात येत आहेत. मात्र, प्रत्यक्षात वणवे लागण्याचे प्रमाण कमी होताना दिसत नाही.

जिल्ह्यात ३५ हजार हेक्टर खासगी, १ लाख ७ हजार हेक्टर सरकारी वनक्षेत्र आहे. कर्नाळा, फणसाड ही अभयारण्ये आहेत. यात अत्यंत दुर्मिळ वन्य प्रजातींचे वास्तव्य असते. घुबड, चंडोल, रॉबिन, रानकोंबड्या, मोर, भेकर, बिबटे यांच्यासह काही दुर्मीळ फुलपाखरांच्या जाती रायगडमधील जंगलांमध्ये आढळतात. वणव्यांमुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. दगडफूल, श्वेतांबरी, पानफुटी, टोपली कारवी, रानकेळी, संजीवनी, सर्पगंधा, अश्वगंधा यासारखी वनऔषधी आढळतात. वणव्यांमुळे यांचेही अस्तित्व धोक्यात आले आहे. सातत्याने लागणाऱ्या वणव्यांमुळे जिल्ह्यातील वनसंपदा सध्या धोक्यात आली आहे. पाच वर्षात १ हजार वणवे लागले आहेत. ज्याची ३ हजार ७१ हेक्टरवरील वन क्षेत्राला वणव्यांची झळ बसली आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या वणव्यातील ९० टक्के वणवे हे मानवनिर्मित आहेत. वणव्यांमुळे नैसर्गिक साधन संपत्तींची तर हानी होतेच आहे, त्याचबरोबर जंगलातील पशुपक्ष्यांचे अस्तित्वही धोक्यात येण्यास सुरुवात झाली आहे.

सातत्याने लावल्या जाणाऱ्या या आगींमुळे वनसंपदा अडचणीत आली आहे. वन्यजीवांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. पशुपक्ष्यांचे हकनाक बळी जातात. सुरुवातीला जंगलापुरता मर्यादित असणारा हा प्रश्न आता आसपासच्या परिसरासाठी डोकेदुखी ठरू लागला आहे. अनियंत्रित वणवे आता जंगलालगतच्या गावात शिरण्याच्या घटना मागील काही वर्षात समोर आल्या आहेत. वणव्यांमुळे प्रदेशनिष्ठ वनस्पती धोक्यात येत आहे. यात प्रामुख्याने गवताळ कुरणे, दगडफूल, सोनकी प्रकार, कारवी जाती, पानफुटी, कलारगा झाडी, तेरडा, श्वेतांबरी, रानआले, सोनजाई, गजकर्णिका, रानकेळी, सापकांदा, टोपली कारवी, कुळी कापुरली संजीवनी, सर्पगंधा, अश्वगंधा यांसारख्या वनस्पतींचा समावेश आहे. तर घुबड, चंडोल, रॉबिन रानकोंबडया, मोर, सापांच्या प्रजाती गवतावरील कीटक, उंदीर, भेकरे यांसारख्या पशुपक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पुर्वी मुबलक प्रमाणात आढळणारे वन्यजीव आता दिसेनासे होत चालले आहेत.

कोकणात १८४ प्रकारच्या फुलपाखरांच्या प्रजातीही वणव्यांमुळे अडचणीत सापडल्या आहेत.वणव्यामुळे पशुपक्ष्यांचे अधिवास नष्ट होतो, एकदा अधिवास नष्ट झाला तर वनजीव्यामध्ये असुरक्षितेची भावना निर्माण होते. त्यामुळे वन्यजीव या परिसरातून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत होण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सातत्याने लागणारे वणवे रोखणे गरजेचे आहे. लोकांमधील गैरसमज दूर करण्यासाठी प्रबोधन करणे आणि वणवे रोखण्यासाठी लोकसहभाग वाढवणे, आवश्यक आहे अन्यथा वनांचे अच्छादन नष्ट व्हायला वेळ लागणार नाही, अशी चर्चा सर्वसामान्यांतून होत आहे.

लोकसंसद

## अनेक उपकरणांवर 'स्टार रेटिंग' बंधनकारक

ऊर्जा बचतीच्या बाबतीत कोणतेही घरगुती विद्युत उपकरण किती कार्यक्षम किंवा सक्षम आहे हे 'स्टार रेटिंग'द्वारे दर्शविले जाते. एखाद्या उपकरणावर 'एक स्टार' असेल तर सर्वात कमी कार्यक्षमता म्हणजे विजेचा जास्त वापर, 'तीन स्टार' असतील तर मध्यम कार्यक्षमता आणि विजेचा कमी वापर आणि 'पाच स्टार' असतील तर सर्वाधिक कार्यक्षमता आणि विजेची मोठी बचत. याच संदर्भात देशातील वाढती वीज टंचाई आणि पर्यावरणाचे रक्षण व्हावे या दृष्टीकोनातून केंद्र सरकारने १ जानेवारी २०२६ पासून रेफ्रिजरेटर, टेलिव्हिजन, एलपीजी गॅस स्टोव्ह, कूलिंग टॉवर आणि चिलर्ससह अनेक उपकरणांवर ऊर्जा कार्यक्षमता दर्शवणारे 'स्टार- रेटिंग' अनिवार्य केले आहे. यापूर्वी रूम एअर कंडिशनर, इलेक्ट्रिक सीलिंग प्रकारचे पंखे, स्टेशनरी स्टोरेज प्रकारचे इलेक्ट्रिक वॉटर हीटर, वॉशिंग मशीन आणि ट्युब्युलर फ्लोरोसेंट दिवे तसेच सेल्फ बॅलास्टेड एलईडी दिव्यांवर स्टार रेटिंग अनिवार्य करण्यात आले होते. केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयांतर्गत येणाऱ्या 'ब्युरो ऑफ एनर्जी एफिशिएन्सी (बीईई)'ने यासंदर्भात अधिसूचना जारी केली असून या नवीन नियमांमुळे आता केवळ टीव्ही, फ्रिजच नव्हे, तर डीप फ्रीझर, वितरण ट्रान्सफॉर्मर आणि ग्रिडला जोडलेले सोलर इन्व्हर्टर यांवरही स्टार रेटिंग असणे बंधनकारक करण्यात आले आहे. या उपकरणांसाठीची मसुदा नियमावली जुलै २०२५ मध्ये सार्वजनिक अभिप्रायासाठी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अभिप्रायांचा विचार करून ही नवीन नियमावली लागू करण्यात आली आहे. स्टार रेटिंग बंधनकारक केल्यामुळे ग्राहकांना उपकरणाच्या कार्यक्षमतेविषयी विस्तृत माहिती मिळून उपकरणाविषयीची फसवणूक टळण्यास मदत होईल.



**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

विशेष

# हुतात्मा वीर भाई कोतवाल

विठ्ठल लक्ष्मण तथा हुतात्मा भाई कोतवाल यांचा जन्म १ डिसेंबर १९१२ रोजी माथेरान येथे झाला. अफाट बुध्दीमत्ता, अचाट कर्तुत्व, पराकोटीचे मातृप्रेम, कमालीचे संघटन कौशल्य लाभलेल्या भाई कोतवालांचा जन्म निसर्गरम्य माथेरानमध्ये एका गरीब कुटुंबात झाला. जेमतेम ३१ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या हुतात्मा कोतवाल यांनी आयुष्याचा प्रत्येक क्षण राष्ट्राला समर्पित केला. त्यांचे प्राथमिक शिक्षण माथेरान येथेच झाले. पुढील शिक्षणासाठी ते आपल्या आत्या गौरीताई हळदे यांच्याकडे पुणे येथे गेले. पुण्यात शिक्षण घेताना शि.म. परांजपे यांच्या काळमधील लेखांचा खोल परिणाम त्यांच्या मनावर झाला. वि.दा. सावरकरांचे १८५७ चे स्वातंत्र्य समर, तसेच जोसेफ मॅझिनी, गैरी बोल्डी यांच्या पुस्तकांनी त्यांच्या मनातील स्वातंत्र्याच्या उर्मी जागृत केल्या. आपले पदवी पर्यंतचे शिक्षण त्यांनी पुण्यातील वाडिया महाविद्यालयात पूर्ण केले. त्यानंतर मुंबई येथे शिक्षण घेऊन सन १९४१ साली ते वकील झाले. आपल्या महाविद्यालयीन जीवनापासून ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होते. ९ ऑगस्ट १९४२ च्या महात्मा गांधीजींनी सुरु केलेल्या चले जाव चळवळीतही ते सहभागी होते. ब्रिटिशांनी सदर चळवळीत सामील झालेल्या मोठ्या नेत्यांना अटक केली होती. त्यात भाई कोतवालही होते. त्यानंतर ते भूमिगत झाले. भूमिगत होऊन त्यांनी 'कोतवाल दस्ता नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेत ५० जणांचा सहभाग होता. त्यात शेतकरी आणि शिक्षकांचा सहभाग होता. यात त्यांचे चुलत बंधू आणि आते भाऊ दत्तोबा हळदे ही सामील होते. १९४२ च्या चळवळीत भाई कोतवाल, हिराजी पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी इंग्रज सरकारला अक्षरशः सळो की पळो करून सोडलं होते. ते व त्यांचे सहकारी रेल्वेचे रूळ उखडून टाकायचे, विजेच्या तारा तोडायचे, अन्य घातपाती कारवाई करून जंगलात पसार व्हायचे. या गनिमीकाव्यामुळे सरकार त्रस्त झालं होतं. मात्र जंग जंग पछाडल्यानंतरही भाई आणि त्यांच्या साथीदारांना पकडण्यात सरकारला यश येत नव्हतं.त्यांनी मुंबई शहराला वीज पुरवठा करणारी प्रमुख वीज वाहिनी कापण्याचे काम सप्टेंबर १९४२ ते नोव्हेंबर १९४२ या कालावधीत त्यांनी ११ वेळा केले. त्यांच्या या कृत्यामुळे ब्रिटिश पोलिसांनी भाई कोतवाल यांना पकडण्यासाठी ५०००/- रुपयांचे बक्षीस जाहीर केले. आणि त्यांना पकडण्यासाठी हॉल आणि स्टॅफोर्ड या अधिकाऱ्यांची नेमणूक केली. ज्यावेळी कोतवाल दस्ता मुरबाड तालुक्यातील सिद्धगड च्या घनदाट जंगलात लपलेले असताना त्यांनी मदतीसाठी एक पत्र आपल्या सहकाऱ्यांना पाठवले. परंतु ते पत्र एका जमीनदाराच्या हाती लागले. त्या जमीनदाराने ते पत्र ब्रिटिश अधिकारी हॉल याला दिले. २ जानेवारी १९४३ च्या दिवशी भल्या पहाटे आझाद दस्ता दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याच्या दृष्टीने मदतीची वाट पाहत असताना ब्रिटिश अधिकारी हॉल आणि स्टॅफोर्ड यांच्या पथकाने समूहावर हल्ला चढविला. या हल्ल्यात आझाद दस्त्याच्या गोमाजी पाटील यांचा तरुण मुलगा हिराजी पाटील शहीद झाला. सदर हल्ल्यात भाई कोतवालांच्या मांडीला गोळी लागल्यामुळे त्यांना जागचे हालताही येत नव्हते.

अशातच क्रूर हॉल ची नजर भाईवर पडली त्याने क्षणाचाही विलंब न करता भाईंवर गोळी झाडली, आणि २ जानेवारी १९४३ रोजी अखेर सिध्दगडच्या पावनभूमीत रायगडचा हा सुपूत्र हुतात्मा झाला.

# निकृष्ट कामांचा सुळसुळाट

## इंजिनिअर्स गायब, कंत्राटदारांचे फावले; आयआयटी, शहर अभियंत्याच्या पात्रतेवर प्रश्नचिन्ह

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागात सध्या 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' अशी अवस्था झाली आहे. कोट्यवधी रुपयांच्या रस्ते आणि पायाभूत सुविधांच्या कामांत तांत्रिक नियमांची सर्रास पायमल्ली होत असून, सजग नागरिक मंच, नवी मुंबई यांनी व्हिडिओ पुराव्यासह केलेल्या तक्रारीनंतर प्रशासनाला अखेर झुकून अभियंत्यांच्या अनुपस्थितीत सुरू असलेल्या कामांना स्थगिती देण्याचे निर्देश द्यावे लागले आहेत. हा करदात्या नागरिकांच्या जागरूकतेचा मोठा विजय मानला जात आहे.

बेलापूर प्रभागातील पोलीस आयुक्त कार्यालय परिसरात साचलेल्या पाण्यातच थेट सिमेंट काँक्रीट (आरएमसी) टाकले जात असल्याचा धक्कादायक प्रकार मंचाने उघडकीस आणला. विशेष म्हणजे, अशा महत्त्वपूर्ण कामाच्या वेळी पालिकेचे एकही अभियंता घटनास्थळी उपस्थित नव्हते. अभियंते निवडणूक ड्युटीवर आहेत असे कारण सांगून कंत्राटदारांनी निकृष्ट कामाचा सपाटा लावला होता. मंचाने या संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओ आयुक्तांना सादर करून जाब विचारला आहे.

मंचाने आपल्या निवेदनात दोन तांत्रिक मुद्दे उपस्थित केले. **आयआयटीची विश्वासार्हता:** पालिकेने गुणवत्ता तपासणीसाठी आयआयटीची सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे, मग तरीही पाण्यात काँक्रीट टाकले जातेच कसे? आयआयटी केवळ सर्टिफिकेट देणारा मुखवटा बनली आहे का? आणि दुसरा **शहर अभियंता पदाचा पेच:** पालिकेच्या शहर अभियंतासारख्या महत्त्वपूर्ण तांत्रिक पदावर सिव्हिल इंजिनिअरऐवजी बी.ई. मेकॅनिकल पदवीधारक व्यक्ती कार्यरत आहे. या अपात्र नियुक्तीला नगरविकास विभागाचा आशीर्वाद असल्याचा गंभीर आरोप मंचाने केला आहे.

तसेच, प्रशासनाने तात्पुरती स्थगिती दिली असली, तरी तात्पुरत्या मलमपट्टीवर समाधान न मानता जोपर्यंत ठोस दीर्घकालीन सुधारात्मक बदल होत नाहीत, तोपर्यंत मंचाचा लढा सुरूच राहील, असा निर्धार या प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त करण्यात आला आहे.

### सजग नागरिक मंचाच्या मागण्या

सर्व कामांचे त्रयस्थ संस्थेकडून करण्यात यावे. निकृष्ट कामासाठी जबाबदार अभियंता आणि कंत्राटदारावर फौजदारी गुन्हे दाखल व्हावेत. तसेच, गुणवत्ता तपासणी अहवाल दरमहा पालिकेच्या वेबसाईटवर सार्वजनिक करावेत.

> पाण्यात काँक्रीट टाकणे म्हणजे करदात्या नागरिकांचा पैसा पाण्यात घालण्यासारखेच आहे. जोपर्यंत तांत्रिक पात्रता नसलेले अधिकारी पदावर राहतील, तोपर्यंत कामाचा दर्जा सुधारणार नाही. या प्रकरणाचा पाठपुरावा थेट लोकायुक्त आणि अँटी-करप्शन ब्युरोकडे (एसीबी) करणार आहोत.
> संजय सोनावणे/ कपिल कुलकर्णी, सदस्य, सजग नागरिक मंच, नवी मुंबई

# अनधिकृत वोडाफोन टॉवरविरोधात एल्गार

## • मराठी एकीकरण समितीकडून आयुक्तांना निवेदन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मीरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील राई येथील शिवनेरी नगर परिसरात अनधिकृत वोडाफोन नेटवर्क बूस्टर टॉवर उभारण्यात आला आहे. या टॉवरविरोधात मराठी एकीकरण समितीने परिसरातील महिला व पुरुष नागरिकांना मोठ्या संख्येने एकत्र करत महानगरपालिकेत धडक देत मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे यांची भेट घेऊन संबंधित अनधिकृत टॉवर प्रकरणी त्वरित कारवाई करावी, अशी ठाम मागणी केली.



या टॉवरबाबत यापूर्वी महानगरपालिकेत तसेच स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. त्यानंतर पालिकेने तोडक कारवाई केली असतानाही, पालिका व पोलीस प्रशासनाच्या आदेशाला, कारवाईला न जुमानता 'चौहान' नामक परप्रांतीय व्यक्तीने पुन्हा अनधिकृतपणे टॉवरचे काम सुरू केले. ही बाब अत्यंत गंभीर असून कायद्याची पायमल्ली होत असल्याचा आरोप मराठी एकीकरण समितीकडून करण्यात आला आहे.

या अनधिकृत टॉवरमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य, सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून टॉवर हटवण्याची कारवाई करावी, अशी जोरदार मागणी मराठी एकीकरण समिती व रहिवाशांनी केली.

या मागणीवर सहआयुक्त संभाजी पानपट्टे यांनी पुढील ७ दिवसांत योग्य ती चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. मात्र, दिलेल्या कालावधीत योग्य व ठोस कारवाई न झाल्यास मराठी एकीकरण समितीच्या वतीने महानगरपालिका कार्यालयासमोर जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## दुचाकी अपघातात तरुणाचा मृत्यू

**सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवलीजवळ भीषण अपघात घडला. या अपघातात रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथील दुचाकीस्वराचा मृत्यू झाला. अमान गनी खतीब (२१) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. अमान हा बुधवारी सकाळी कामानिमित्त आपली दुचाकी घेऊन सावंतवाडी येथे गेला होता. सावंतवाडीकडून राजापूरकडे परतत असताना त्याची फोंडा उंबरट फाटा येथे ट्रकला मागून जोरदार धडक बसली. यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

# रांगोळीच्या माध्यमातून मतदान जागृती

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई महापालिकेच्या ३४व्या वर्धापनदिनानिमित्त आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नागरिकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. यानिमित्त नवी मुंबई महापालिका मुख्यालयात वर्धापनदिनाच्या शुभेच्छा देणारी आकर्षक रांगोळी काढण्यात आली. त्यातून प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावावा, असा प्रभावी संदेश नागरिकांना देण्यात आला.

नवी मुंबई महापालिकेची निवडणूक १५ जानेवारीला होत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. रांगोळीसमवेत महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. कैलास शिंदे, मुख्य निवडणूक निरीक्षक तथा महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. भाऊसाहेब दांगडे, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व डॉ. राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, किसनराव पलांडे यांच्यासह विविध विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

# संगमेश्वर बाजारपेठेत बिबट्याचा वावर

**। संगमेश्वर । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर बाजारपेठ परिसरात बिबट्याच्या मुक्त संचारामुळे पुन्हा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या बिबट्या दिसल्याच्या चर्चेला अखेर ठोस दुजोरा मिळाला असून बिबट्याचा वावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाला आहे. त्यामुळे ही बाब केवळ अफवा नसून वास्तव असल्याचे उघड झाले आहे. संगमेश्वर बाजारपेठ ही दिवसभर गजबजलेली असते. बाजारातून जाणारा अंतर्गत रस्ता असल्याने रात्री उशिरापर्यंत वाहनांची सतत ये-जा सुरू असते. अशा वर्दळीच्या, दाट लोकवस्तीच्या परिसरात बिबट्याचा वावर सुरू असल्याचे दृश्य अत्यंत धक्कादायक तसेच भितीदायक ठरत आहे.



संगमेश्वर येथील व्यापारी संतोष खातू यांच्या बाजारपेठेतील घराजवळ रात्रीच्या सुमारास काही काळ बिबट्या बसलेला असल्याचे दृश्य त्यांच्या घराच्या सीसीटीव्हीमध्ये कैद झाले असून, हा व्हिडीओ समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये दहशत अधिकच वाढली आहे. आजूबाजूला घरे, दुकाने आणि रहिवासी वस्ती असताना बिबट्याचा असा निर्भय वावर ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. रात्रीच्या वेळी नागरिक घराबाहेर पडण्यास घाबरत असून वाहनचालकांमध्येही भीतीचे वातावरण पसरले आहे. लहान मुले, वृद्ध नागरिक आणि महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# शहापूरमधील माताभगिनींची पाण्यासाठी पायपीट

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

यावर्षी जास्त काळ पाऊस पडला. सर्वत्र पाणीच पाणी झाले. मात्र, शहापूर तालुक्यातील गावपाड्यांमध्ये राहणाऱ्या माताभगिनींची हंडाभर पाण्यासाठी आतापासूनच वणवण सुरू झाली आहे. ४२४ गावपाडे टंचाईग्रस्त असल्याचे जाहीर झाले असून १७कोटी २९ लाख रुपयांच्या आराखड्यास सरकारने मंजुरी दिली आहे. या पाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार असून विंधन विहिरींची तसेच पाणी योजनांची दुरुस्ती केली जाणार आहे.



प्रत्यक्षात टँकरने पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत तरी आदिवासींना उन्हाचे चटके सहन करत पायपीट करावी लागणार आहे.

गेल्या वर्षी सुमारे दोनशे गावपाड्यांसाठी ४४ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला होता. त्यासाठी सवातीन कोटी खर्च झाला होता. यंदा गावपाड्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असून टंचाई आराखड्यानुसार ८७ गावे व २५१ पाडे अशा एकूण ३३८ गावपाड्यांवर टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी चार कोटी खर्च अपेक्षित आहे. याशिवाय नळ पाणीपुरवठा योजनांच्या विशेष दुरुस्तीमध्ये ३६ गावपाड्यांचा समावेश असून त्यासाठी साडेसात कोटी खर्च होणार आहे.

पूरक नळ पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीमध्ये समाविष्ट असलेल्या २३ गावपाड्यांसाठी किमान साडेपाच कोटी खर्च अपेक्षित आहे. तसेच टंचाई आराखड्यातील २७ गावपाड्यांमध्ये नवीन विंधन विहिरी करण्यासाठी २७ लाख खर्च होणार आहेत. एकूण ४२४ गावपाड्यांसाठी तब्बल १७ कोटी २९ लाख खर्च होणार आहे. धरणांच्या तालुक्यात मंजूर झालेल्या टंचाई आराखड्यातील आकडे कागदावर झळकत असताना ग्रामीण भागातील माताभगिनींना हंडाभर पाण्यासाठी मैलोन्मैल पायपीट करावी लागत आहे.

## गुरांची वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई

**रत्नागिरी :** खेड तालुक्यातील आंबडस बसथांब्याजवळ गुरांची वाहतूक करणाऱ्या बोलेरो व्हॅनसह तिघांना रंगेहाथ पकडले. ही कारवाईत चार लाख रुपये किंमतीच्या व्हॅनसह ४ गुरे असा ४ लाख ९० हजार रुपये किंमतीचा ऐवज जप्त केला. सोमवारी २९ डिसेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास पोलिसांनी ही कारवाई केली. संजू राजू साळुंखे (३१), रोहन अंकुश साळुंखे (२१, दोघे रा. हिंगणगाव बुद्रूक सांगली) संजय गंगाराम चव्हाण (३४, रा. आंबडस-खेड) अशी संशयितांची नावे आहेत.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ जानेवारी

१) श्रीम.मंगला चिंतामण ल्हासे ब्राम्हणआळी,अलिबाग २-१-१९४४

२) श्रीम. हेमांगी चंद्रकांत म्हात्रे गुरवनगर, अलिबाग, २-१-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचाफोटोकृषीवलमध्येछापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**श्री. किशोर मुरजी शाह, वाढदिवस, विद्यानगर, अलिबाग**

## मारुती दहिंबेकर यांचे निधन

**कोलाड :** रोहा तालुक्यातील गोवे गावचे रहिवासी मारुती लक्ष्मण दहिंबेकर यांचे शुक्रवार दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच त्याच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे नातेवाईक तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर व समस्त गोवे ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, दोन मुलगे, तीन मुली, सुना, एक भाऊ, पुतणे, नातवंडे, पतवंडे व मोठा दहिंबेकर परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवार दि.४ जानेवारी तर उत्तर कार्यविधी बुधवार दि.७ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या गोवे येथील निवासस्थानी होणार आहेत.



## हरिश्चंद्र हातनोलकर यांचे निधन

**वावोशी :** वावोशी गावातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व हरिश्चंद्र हातनोलकर (७९) यांचे २५ डिसेंबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे दशक्रिया विधी शनिवार दि.३ जानेवारी २०२६ रोजी साजगाव या ठिकाणी होणार असून उत्तरकार्य व शोकसभा बुधवार दि. ७ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या राहत्या घरी, वावोशी येथे होणार आहे. त्यांच्या निधनाने कुस्तीप्रेमी, बैलशर्यतप्रेमी, ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते व क्रीडाविश्वातून शोक व्यक्त करण्यात येत आहे.



## निवडक

### भवानी मातेचा वार्षिक जत्रोत्सव



**महाड :** ज्या देवीच्या नावावरून भवानी नडगांव गावाचे नामकरण झाले, त्या भवानी देवीचा वार्षिक जत्रोत्सव यंदा पौष पौर्णिमेला म्हणजेच शनिवार दि.३ जानेवारी रोजी महाड तालुक्यातील भवानी नडगांव येथे साजरा होणार आहे. भवानी देवी मातेचा वार्षिक जत्रोत्सव हा परिसरातील मोठा उत्सव मानला जातो. १९७७ साली या जत्रोत्सवाची सुरुवात झाली. या यात्रेचे हे ४९ वे वर्ष असून, यात्राकाळात होम हवन व पूजा, भजन हरिपाठ दिंडी, देवीच्या पालखीची मिरवणूक, देवीची आरती, मान्यवरांचा सत्कार, शक्ती तुरा तमाशाचा जंगी सामना अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री भवानी देवी माता असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मातेचा वार्षिक जत्रोत्सव विभागातील सांस्कृतिक परंपरा जपणारा उत्सव म्हणून प्रसिद्ध आहे. या जत्रोत्सव काळात भवानी देवीचे मंदिर रोषणाईने झळाळून निघते. मंदिर परिसरात मिठाई, फुले, प्रसाद, खेळणी, खाद्यपदार्थ तसेच विविध प्रकारच्या वस्तूंची अनेक दुकाने थाटली जातात. भवानी नडगांव शहरात वास्तव्यास असणारी मंडळी तसेच विविध भागातून भाविकांची गर्दी जत्रोत्सव दिसून येते. भाविकांना मोठ्या संख्येने या जत्रोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन व्यवस्थापकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### ई-केवायसीमध्ये अडकली नुकसानभरपाई

#### शेतकऱ्यांवर कर्ज काढण्याची वेळ

**ठाणे :** अवकाळी पावसामुळे शेती पिकाच्या झालेल्या नुकसानीबाबत तात्काळ पंचनामे करून त्यांना भरपाई देण्याचे आदेश शासनाने दिले होते. मात्र तीन महिने उलटूनही मोखाडा तालुक्यात अनेक शेतकऱ्यांना बँकेत ई-केवायसी नसल्याचे कारण देत पीक नुकसानीचे पैसे दिलेले नाहीत. सरकारच्या जाचक अटीत ही भरपाई अडकली आहे. त्यामुळे सावकारी व्याजाने पैसे घेऊन शेतकरी आपल्या कुटुंबाची गुजराण करीत आहेत. खरीप हंगामात पुरामुळे शेती वाहून गेली. शिवाय करपा, बुरशी, बगळ्या रोगांच्या प्रादुर्भावाने पीक भुईसपाट झाले. बळीराजाला दिलासा देण्यासाठी नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करून भरपाई मिळण्यासाठी राज्य शासनाने प्रशासनाला आदेश दिले. महसूल, कृषी विभागाने पंचनामे करून शासनाला यादी दिली. काही दिवसांतच शासनाकडून रक्कमही मंजूर करण्यात आली. या नुकसानभरपाईत तालुक्यातील १ हजार ४४१ शेतकरी पात्र ठरले. मुळात नुकसानभरपाईत मोठा दुजाभाव असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. शेतकऱ्यांच्या भरपाई रकमेमध्ये मोठी तफावत असल्याने खरा शेतकरी मात्र आपल्या हक्काच्या रकमेपासून वंचित आहे. शिवाय आधार कार्ड अपडेट, मोबाईल नंबर बँक, अकाऊंट लिंक, अर्ज करणे, सातबारावरील अनेक नावे अशा विविध कागदपत्रांमध्ये फेऱ्यात ही भरपाई अडकल्याने तुटपुंजी रक्कमही शेतकऱ्यांच्या हातात मिळालेली नाही. अखेर नाईलाजास्तव परिवाराच्या पालन पोषणासाठी शेतकऱ्यांवर उसनवारी आणि कर्ज काढण्याची वेळ आली आहे.

### जनजागृतीमुळे तळीरामांची संख्या घटली




**ठाणे :** थर्टी फर्स्ट आणि नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी तळीरामांनी वाहन चालवू नये, असे आवाहन करून जनजागृती केली. त्याचा सकारात्मक परिणाम झाला असून गतवर्षीच्या तुलनेत यंदा तळीरामांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. ३१ डिसेंबर या नववर्षाच्या पूर्वसंध्येला २२४ तळीराम चालकांसह १२ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. २२४ जणांवर मोटार वाहन कायदा १८५ नुसार तर, वाहन चालकांसोबतच्या १२ जणांवर मोटार वाहन कायदा १८८ नुसार कारवाई करण्यात आली आहे. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सहपोलीस आयुक्त डॉ ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या निर्देशानुसार वाहतूक शाखेत ५९ अधिकारी आणि ६८० कर्मचारी असे एकूण ७३९ जवानांच्या साथीने एकूण ५४ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. नववर्षाच्या पूर्वसंध्येला केलेल्या तपासणीत तब्बल २२४ तळीराम चालक तावडीत सापडले. तर १२ सहप्रवाश्यांवर कारवाई करण्यात आली. यात वाहन चालकांवर वाहतूक नियमाचं उल्लंघन केल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात आली, अशी माहिती ठाणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी दिली.

### सरस प्रदर्शनमधून लाखोंची उलाढाल



**रत्नागिरी :** गणपतीपुळे येथे शासनाच्या वतीने २४ ते २८ डिसेंबर कालावधीत जिल्हास्तरीय 'सरस' प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र जीवनोन्नती अभियानाच्या पुढाकारातून महिला स्वयंसहायता बचतगटातील उद्योजकांनी तयार केलेल्या हस्तकला, खाद्यपदार्थ व विविध उत्पादनांना या प्रदर्शनाच्या माध्यमातून थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची संधी उपलब्ध झाली. या प्रदर्शनात ६३ लाख ५१ हजार ९७३ रुपयांची विक्री झाली. ५० लाख ४० हजार ६८ रुपये किंमतीची उत्पादन विक्री तर १३ लाख ११ हजार ९०५ रुपयांची खाद्य विक्री स्टॉलवरुन विक्री झाली आहे. सरस प्रदर्शनाला वाढणारा प्रतिसाद बघून यावेळी ८३ स्टॉलची बांधणी करण्यात आली होती. ज्यामध्ये ६४ उत्पादने स्टॉल व १९ फुड स्टॉल समुहांना उपलब्ध करुन देण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये स्वयंसहाय्यता समूहातील महिलांनी उत्पादित केलेल्या विविध प्रकारच्या कलात्मक वस्तू, विविध प्रकारचे घरगुती मसाले, पिठे, पापड, लोणची, कोकणी मेवा, विविध सरबते, कोकणी खाद्यपदार्थ, मध माफक दरात ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आले.

### २८५ निवडणूक कर्मचाऱ्यांना नोटीस

**ठाणे :** भिवंडी निवडणूक यंत्रणेसाठी सर्व शासकीय कार्यालयांतून कर्मचारी वर्ग उपलब्ध करून दिला जातो. परंतु, अनेकवेळा या राष्ट्रीय कर्तव्याच्या कार्यात दांडी मारणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. भिवंडीत निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास अनुपस्थित कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. भिवंडी महानगरपालिका निवडणुकीसाठी कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्यात आले. त्यांच्यासाठी मंगळवारी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यावेळी मतदान केंद्रप्रमुख ७४, मतदान अधिकारी १-६९, मतदान अधिकारी २-५६ मतदान अधिकारी ३-८६ असे तब्बल २८५ अधिकारी, कर्मचारी गैरहजर होते. या सर्वांना पालिका निवडणूक विभागाकडून नोटीस बजावण्यात आली आहे.

परिवहन आयुक्तांनी केली जागेची पाहणी | या निर्णयाचा प्रवाशांना होणार फायदा

# नवी मुंबई विमानतळावर उभारणार रिक्षा स्टॅन्ड

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आता प्रीपेड टॅक्सी आणि रिक्षा स्टॅन्ड सुरू होणार आहे. या स्टॅन्डचे पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाकडून सर्वेक्षण पूर्ण झाले असून राज्याच्या परिवहन आयुक्तांनी या प्रीपेड टॅक्सी थांब्यांची स्थळपाहणी नुकतीच केली. यानंतर पनवेल प्रादेशिक विभागाच्या कार्यालयाने विमानतळ परिसरातील परिवहनचे व्यवस्थापन पाहणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रीपेड स्टॅन्डची तातडीने व्यवस्था करण्याचे तसेच, त्यामधून प्रवाशांना सोय सुरू करा, दरफलक उभारा निर्देश दिले आहेत.



नवी मुंबई विमानतळावरून पहिल्या पाच दिवसांत तब्बल २६ हजार प्रवाशांनी प्रवास केला आहे. येत्या पंधरवड्यात ही संख्या लाखांवर पोहोचणार आहे. पहिल्या टप्प्यात देशांतर्गत उड्डाणे सुरू असून मार्च अखेरपर्यंत आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक सुरू झाल्यानंतर प्रवाशांची संख्या अनेक पटीने वाढणार असल्याने प्रवाशांना विमान प्रवासानंतर माफक दरात निश्चित स्थळी जाण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाने कंबर कसली आहे. पनवेल आरटीओने प्रिपेड थांब्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले असून लवकरच ही सेवा कार्यान्वित होणार आहे.

रिक्षा स्टॅन्ड हे विमानतळापासून काही अंतरावर असल्यामुळे रिक्षा स्टॅन्ड ते विमानतळ अशा मोफत बससेवेचा लाभ प्रवाशांना नवी मुंबई विमानतळावर मिळू शकणार आहे. मात्र रिक्षा थांब्यावरील प्रवाशांची संख्या मोठी असल्यास बसचा प्रयोग यशस्वी होणार आहे.

### तातडीने थांबे उभारण्याच्या सूचना

मुंबई विमानतळाप्रमाणे येथे प्रीपेड टॅक्सी व रिक्षा थांब्यासाठी जागा निश्चित करून प्रीपेड टॅक्सी सेवा सुरू केली. नवी मुंबई विमानतळाच्या टॅक्सी थांब्यातून ही सेवा सुरू करण्याचे नियोजन आखले जात आहे. राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी पाहणीनंतर पनवेलच्या प्रादेशिक परिवहन विभागाला तातडीने थांबे उभारून त्यामधून प्रवाशांना सोय सुरू करा, दरफलक उभारा, अशा विविध सूचना केल्या आहेत.

# थर्टीफर्स्टला चालकांना पोलिसांचा दणका

## मद्यपी चालकावर दंडात्मक कारवाई; वाहनांचे सर्व कागदपत्रे अद्ययावत ठेवणे अनिवार्य



**| माणगाव | प्रतिनिधी |**

नववर्षाच्या स्वागताच्या पूर्वसंध्येला माणगाव शहरात वाढत्या वाहतूक अराजकतेला आळा घालण्यासाठी माणगाव पोलीस व वाहतूक पोलीस विभागाने संयुक्तपणे कडक नाकाबंदी राबवली. थर्टीफर्स्टच्या दिवशी शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, महामार्ग, एसटी बस स्थानक, महाविद्यालय परिसर तसेच गर्दीच्या ठिकाणी अचानक उभारण्यात आलेल्या नाकाबंदीमुळे नियम तोडणाऱ्या वाहनचालकांची चांगलीच धांदल उडाली. वाहन चालकांची चांगलीच झाडाझडती घेत, नववर्षाच्या पूर्वसंख्येला म्हणजे थर्टीफर्स्टच्या दिवशी माणगावात नाकाबंदी केली. या कारवाईत मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्या वाहन चालकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या अनेक वाहनचालकांचे धाबे दणाणले. त्यामुळे अवैद्य वाहतुकदारांनी या कारवाईचा धसका घेतला आहे. गेल्या काही दिवसांपासून माणगाव शहरात वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला होता. हेल्मेट विना दुचाकीस्वार, सीटबेल्ट न लावणारे चालक, अपूर्ण कागदपत्रे, प्रदूषण प्रमाणपत्र नसलेली वाहने, अवैध व तुटलेल्या नंबर प्लेट्स, काळ्या काचा अस-लेली वाहने, परवाना नसलेले चालक, ट्रिपल सीट दुचाकीस्वार, बुलेटच्या कर्कश सायलेंसरचा त्रास, सायरन लावलेली वाहने यामुळे अपघातांची शक्यता वाढत होती. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कठोर भूमिका घेत विशेष तपासणी मोहीम सुरू केली. नाकाबंदी दरम्यान सकाळी व सायंकाळी शेकडो दुचाकी व चारचाकी वाहनांची तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर थेट दंडात्मक कारवाई करण्यात आली असून अनेक वाहनधारकांवर कागदपत्रांच्या अभावामुळे दंड ठोठावण्यात आला. अचानक झालेल्या या कारवाईमुळे बेकायदेशीर वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या आदेशानेतसेचमाणगावउपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे आणि महामार्ग वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक भुजबळ यांच्या नियोजनाखाली पोलीस व वाहतूक विभागाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक लाड, एएसआय पाटील तसेच कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे ही कारवाई यशस्वी केली.

विशेष म्हणजे ही नाकाबंदी केवळ एका दिवसापुरती मर्यादित नसून, शहरात वाहतूक शिस्त पूर्णपणे प्रस्थापित होईपर्यंत अशी कारवाई सातत्याने सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या कारवाईबाबत नागरिकांमध्ये मिश्र प्रतिक्रिया उमटत असल्या तरी बहुतांश नागरिकांनी पोलिसांच्या धडक कारवाईचे स्वागत करत, अशा मोहिमांमुळे शहरात नियमबद्ध वाहतूक आणि सुरक्षितता निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. या तपासणी मोहिमेत शिवराज बांडे, शेरकर, यांनी सक्रिय सहभाग घेतला. नाकाबंदीमुळे अवैध वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, माणगाव शहरात वाहतूक शिस्तीच्या दिशेने पोलिसांचे हे पाऊल निर्णायक ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### कायद्याचे पालन करा

नागरिकांनी वाहनांचे सर्व कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर अनिवार्य करावा आणि कायद्याचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# निवडक

## अवेळी पावसामुळे कडधान्य धोक्यात

**चिरनेर** : उरण तालुक्यात नववर्षाच्या पहिल्याच दिवशी सकाळी सात वाजता अचानक अवेळी पाऊस बरसू लागल्याने, बहरु लागलेले वाल, चवळी, हरभरा, मुगाची कडधान्य व भाजीपाल्याबरोबर आंबा धोक्यात आला आहे. थंडीच्या सुरुवातीला कडधान्य, भाजीपाला पिकांसाठी तसेच आंबा पिकासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाल्यामुळे, आंब्याला मोहर चांगल्या प्रकारे आला होता. कडधान्य पिकेही बहरू लागली होती. तसेच कैऱ्या धरण्याच्या स्थितीत असताना, अचानक वातावरणात बदल होऊन पाऊस बरसल्यामुळे मोहोर काळवंडून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. कैऱ्याही गळून पडतील असा अंदाज येथील शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. आंब्याप्रमाणेच कडधान्य व भाजीपाला पिकांवरही या अवेळी पावसाचा चांगलाच परिणाम होण्याची भीती बागायतदार व शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. शेवग्याच्या झाडांना यावर्षी चांगल्या प्रकारे मोहोर व शेंगाही आलेल्या असताना, ढगाळ वातावरणामुळे हा मोहोर गळू लागला आहे. वाल, चवळी, हरभरा, तुर, मुग, पावटा, घेवडा, वांगी, कलिंगड, व अन्य पिकांवर या अवेळी पावसाचा परिणाम होण्याची शक्यता आहे असे येथील बागायतदार शेतकरी दीपक पाटील, संदेश चिर्लेकर, भास्कर ठाकूर, प्रफुल्ल खारपाटील, दत्तात्रेय म्हात्रे, हिराजी ठाकूर, अस्मित ठाकूर, अविनाश पाटील, कृष्णा म्हात्रे, गोपीनाथ गोंधळी, संतोष गोंधळी, बळीराम म्हात्रे, तसेच येथील अन्य शेतकऱ्यांनी सांगितले.





## रोजगार मेळावा उत्साहात पार

**रोहा** : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड आणि धाटाव येथील एम.बी. मोरे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एम. बी. फाऊंडेशनचे वरदा सुनील तटकरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा यशस्वीपणे पार पडला. मेळाव्यात एकूण १८ नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते आणि १३० हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. विद्यार्थ्यांना थेट मुलाखतीद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. या रोजगार मेळाव्याच्या उदघाटन सोहळ्यास एम. बी. मोरे फाऊंडेशन संस्थापक अध्यक्ष विजय मोरे, सहाय्यक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रच्या अमिता पवार, उत्तम मोरे, महेश वखरे, संकेत मोरे आणि प्रतीक्षा गोळे आदी मान्यवर उपस्थित होते.





## बाळासाहेब म्हात्रे कॉलेजात कवी संमेलन

**चिरनेर** : विद्यार्थ्यांना कवितेची गोडी लागावी, या अनुषंगाने आवरे येथील ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या आयोजनातून व कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सादरीकरणातून कवी संमेलनाचे सादरीकरण करण्यात आले. अध्यक्षस्थान साहित्यरत्न एल. बी. पाटील यांनी भूषविले होते. प्राचार्य सुविद्य गावंड यांनी प्रस्ताविक केले. कविसंमेलनात कवयित्री अक्षता गोसावी (कोलाहल मनातला) लवेंद्र मोकल (दारूबंदी) संजीव पाटील (आगरी पित्रा) रामचंद्र म्हात्रे (जय जय उरण माझा) या या कवितांच्या सादरीकरणाबरोबर प्रेमकाव्य, निसर्गकाव्य, भावकाव्य, विडंबन काव्य अशा विविध प्रकारच्या उस्फूर्त कवितांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी नवोदित कवी विद्यार्थ्यांनी कवींची प्रेरणा घेऊन शीघ्र कवितांचे सादरीकरण केले. माजी प्रा. आर के म्हात्रे, केशव म्हात्रे, संजय केणी, प्रविण चिर्लेकर, शिवप्रताप पंडित, नरेश पाटील, रंजना केणी, एल.बी. पाटील हे सर्व कवी, कवी संमेलनात सहभागी झाले होते.

## धरणाकडील रस्ता दुरुस्तीच्या प्रतीक्षेत

**कोलाड** : मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरुन पुई गावाच्या हद्दीतून डोळवहाळ पाटबंधारे खात्याचा उजवा तिरावरून जाणारा रस्ता गेली ३० वर्षांपासून दुरुस्त झालेला नाही तरी त्या रस्त्याची त्वरित दुरुस्ती व्हावी यासाठी कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे कोलाड विभाग यांच्याकडे श्री क्षेत्रपाल मित्र मंडळ पुई यांच्याकडून लेखी अर्ज केला असून या रस्त्याची त्वरित दुरुस्ती केली नाही तर कोलाड पाटबंधारे खात्याच्या कार्यालयासमोर उपोषण व जनोआंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. सदरचा रस्ता त्वरित दुरुस्त झाला नाही तर कोलाड पाटबंधारे खात्याच्या कार्यालयासमोर उपोषण व जन आंदोलन करण्यात येईल असा इशारा श्री क्षेत्रपाल मित्रमंडळ पुई यांच्याकडून देण्यात आला आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग
- अलिबागमध्ये ऑफिस कामाकरीता Accountant मुलगी व Assistant मुलगा शिक्षण ग्रॅज्युएशन पूर्ण पाहिजे. संपर्क : ७७५७९२८२९२
- ऑफिस कामाकरीता अनुभवी मुलगी/महिला पाहिजे. पात्रता- B.com, Typing, MS-CIT पगार-१२०००-१५००० पत्ता- नांदाईपाडा, झिराड, अलिबाग-रायगड, संपर्क क्र. ९८२२०८३३५३, ८४०७९८२७१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## महिला मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन



**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा येथील मराठा समाज महिला मंडळाचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम म्हाडा कॉलनी परिसरातील मराठा समाज मंदिर येथे महिला मंडळाच्या अध्यक्षा सरोजिनी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

नवनिर्वाचित नगरसेवक रवींद्र चाळके, अजित मोरे, प्रशांत कडू, नगरसेविका स्नेहा आंब्रे, प्रियांका धनावडे तसेच डॉ. स्वप्ना सरदार, डॉ. प्रगती देशमुख, डॉ. तनुजा पवार, ॲड. मयुरा मोरे, ॲड. रिना शिंदे, उद्योजिका राजश्री देसाई, नूतन नलावडे, सानिका सावंत यांचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना नगरसेविका स्नेहा आंब्रे म्हणाल्या की, पूर्वी मराठा समाजातील महिला घराच्या चौकटीतच मर्यादित होत्या. मात्र, आज त्या विविध क्षेत्रांत आत्मविश्वासाने कार्यरत आहेत. ही अभिमानास्पद बाब आहे.

समाजातील सर्व मंडळांनी आपापले अस्तित्व जपत कार्यक्रमांच्या वेळी एकत्र येणे आवश्यक आहे. पदापेक्षा कार्य महत्त्वाचे असून समाज एकजुटीने पुढे गेला तर निश्चितच प्रगती साधता येईल. तर रोहा डाय केम कंपनीचे सीनियर एचआर मॅनेजर विजय पवार यांनी रोहा माणगाव, तळा तालुक्यातील मराठा समाजाचा सुमारे दोन ते अडीच कोटींचा एक भव्य समाज मंदिर बांधण्याच्या प्रयत्न असून शिक्षण, नोकरी व शासकीय योजनांसाठी मार्गदर्शनात्मक उपक्रम राबवण्यावर भर देणार असल्याचे सांगितले. यावेळी सरोजनी शिंदे, रत्नप्रभा काफरे, शैला कदम, राजश्री देसाई, सुप्रिया क्षीरसागर, ॲड. मयुरा मोरे, चेतना पार्टे निशा शिंदे, वृषाली शिंदे, अश्विनी शिंदे, दीपा भिलारे, स्वरांजली शिर्के आदी उपस्थित होते.

## मारहाण करून मंगळसूत्राची चोरी

**पनवेल** : अज्ञात त्रिकुटाने एका विवाहित महिलेस धक्काबुक्की करून तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरी करून मोटार सायकलीवरून पसार झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील डेरवली बस स्टॉप जवळील रस्त्याच्या कडेला घडली आहे. स्वाती पाटील या बहिणीची वाट पाहत बस स्टॉप जवळ थांबल्या असताना २ अज्ञात इसम काळया रंगाच्या मोटारसायकलीवरून येऊन तीला धक्का बुक्की करून जखमी व तिच्या गळ्यातील १ लाख २० हजार रुपये किमतीचे मणी, सोन्याचे मंगळसूत्र खेचून ते पसार झाले आहेत. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## शिपुरकर-शिंदे शाळेचे अबॅकस परीक्षेत यश



**| माणगाव | प्रतिनिधी |**

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला नवी दिशा देणाऱ्या अबॅकस व वैदिक गणिताच्या क्षेत्रात माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर शिपुरकर आणि शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी यंग मास्टर आयोजित १५ वी राष्ट्रीय यंग अबॅकस टॅलेंट सर्च २०२५ या प्रतिष्ठित स्पर्धेत शिपुरकर शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत रितेश तांबट प्रथम क्रमांक शिंदे शाळा, गार्गी मोरे फास्ट राइटिंगमध्ये प्रथम क्रमांक शिपुरकर शाळा, स्वराली पवार ड्रॉ ॲण्ड काउंटमध्ये प्रथम क्रमांक शिपुरकर शाळा, मिहीका शिंदे फास्ट सम्समध्ये द्वितीय क्रमांक शिपुरकर शाळा, प्रभास घेवारे तृतीय क्रमांक शिपुरकर शाळा, प्रार्थना लाड वैदिक गणित विषयात तृतीय क्रमांक शिंदे शाळा. या नेत्रदीपक यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, पल्लवी अबॅकस क्लासेसचे प्रशिक्षक तसेच पालकवर्गाने विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.



## पालीत दूध पिऊन थर्टीफर्स्ट साजरा

### अंकुश आपटे यांचा उपक्रम

**| पाली | प्रतिनिधी |**

आयुष्य व्यसनमुक्ती केंद्र पुणेचे अध्यक्ष अंकुश आपटे यांच्या वतीने महायज्ञ दुधाचा या विशेष सामाजिक उपक्रमाचे अंतर्गत व्यसनमुक्तीचा नारा समाजामध्ये आणखी प्रबळ करण्यासाठी 'दारू सोडा, दूध प्या' या संकल्पनेतून ३५० लिटर दुधाचे मोफत वाटप बुधवार (दि. ३१) डिसेंबरच्या पूर्वसंध्येला करत पाली नगरवासींसाठी एक संस्मरणीय दिवस ठरला.

नववर्षासाठी एक अत्यंत सुंदर आणि सामाजिक संदेश देणारा कार्यक्रम संपन्न झाला. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले, या सुवचनांप्रमाणे अनेकांना आयुष्यामध्ये व्यसनमुक्तीचा परिस स्पर्श देणाऱ्या आपटे यांच्या सामाजिक उपक्रमाला पालीकरांनी प्रतिसाद दिला. कार्यक्रमासाठी शेकडो तरुण, महिला, व लहान मुलांसोबतच अनेक ज्येष्ठांनी आपला सहभाग नोंदवला सदर कार्यक्रमास पराग दादा मेहता, आलाप मेहता, आरिफ मणियार, सुलतान बेंणसेकर, सुशील जी शिंदे, धनंजय गद्रे, ज्ञानेश्वर फोंडे, रंनजीत खोडागळे उपस्थिती होते.

## कर्जतच्या २१ केंद्रातून निघणार क्रांतीज्योत

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचा दोन जानेवारी रोजी ८३ वा स्मृतिदिन साजरा होणार आहे. या स्मृतिदिनाच्या निमित्ताने कर्जत तालुका शिक्षण विभागाकडून हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी शिक्षण विभागाच्या कर्जत तालुक्यातील २१ केंद्र यांच्या वतीने क्रांतीज्योत मानवली येथे नेली जाणार आहे. मानिवली येथील हुतात्मा हिराजी पाटील स्मारक येथे सकाळी पोहचणार आहेत.

तालुक्यातील माथेरान येथील हुतात्मा भाई कोतवाल आणि मानिवली येथील हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांचा २ जानेवारी १९४३ रोजी ब्रिटिशांच्या गोळीबारात मृत्यू झाला होता. त्यामुळे त्यांचा बलिदान दिन रायगड आणि ठाणे जिल्ह्यात दोन जानेवारी रोजी साजरा केला जातो.

सोहळ्याच्या निमित्ताने कर्जत तालुका पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने नवीन उपक्रम हाती घेतला आहे. तालुक्यातील २४० प्राथमिक शाळेत २१ केंद्र असून या केंद्रांच्या माध्यमिक विभागातील शिक्षक यांच्याकडून हि क्रांतीज्योत रॅली त्या-त्या केंद्रातून दोन जानेवारी सकाळी निघणार आहे. नवीन उपक्रम गटविकास अधिकारी सुशांत पाटील आणि गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे यांनी सुरु केला आहे.

शिक्षण विभागाच्या नेरळ, दहिवली माले, वैजनाथ, खांडपे, वाकस, कशेळे, चिंचवली, भिसेगाव, पाथरज, जांभिवली, कर्जत, वारे, कळंब, जामरूख, खांडस, नांदगाव, भोईरवाडी, शेलू, कडाव, बेकरे, दहिवली वरेडी आदी केंद्रातून क्रांतीज्योत निघणार आहे.

## नववर्षानिमित्त भाविक महागणपतीच्या दर्शनास



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

चिरनेरमध्ये नववर्षाच्या पहिल्याच दिवशी गुरुवारी (दि.१) भाविकांनी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच, गर्दी केली होती. उरण, पनवेल, पेण, नवीमुंबईसह मोठ्या संख्येने गणेशभक्त चिरनेर येथे येऊन, श्री महागणपतीचे मनोभावे दर्शन घेतले. सकाळी पाऊस बरसला, तरीही गणेश भक्तांनी श्री महागणपतीचे दर्शन घेतले. यावेळी गणेश भक्तांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. विशेषता छोट्या-मोठ्या व्यवसायिकांचा व्यवसाय, परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली होती. प्रसाद विक्रेते, पेढेवाले सुखावले होते. भाविकांच्या सोयीसाठी देवस्थानतर्फे चोख व्यवस्था करण्यात आली होती.

## महागड्या मोबाईलची चोरी

**पनवेल** : महागड्या मोबाईलची कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केल्याची घटना पनवेल रेल्वे स्टेशनच्या बाहेर एमएमएमटी बस स्टॉपच्या आवारात घडली आहे. मोहित कुमार सूर्यवंशी यांचा ५० हजार रुपये किमतीचा आय फोन १४ हा कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

**मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी** | **पहाटेपासून परिसराला यात्रेचे स्वरुप**

## बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी रांगा

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**

नवीन वर्षातील पहिल्या दिवशी अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी गुरुवारी (दि.१) भाविकांनी मोठी गर्दी केली होती. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. रायगड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून हजारोच्या संख्येने भाविक पालीत दाखल झाले होते.

संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. सध्या नाताळची सुट्टी आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात पालीत भाविक व पर्यटक आले होते. भाविकांची मोठी गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिक यांचा धंदा देखील तेजीत होता. परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजली होते. परिसरातील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार, फुल व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले यांची दुकाने सजली होती. आदिवासी महिला कंदमुळे घेऊन विक्रीसाठी बसल्या होत्या. मंदिर परिसरात मोठी वर्दळ पहायला मिळत होती. परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. देवळात येणारे भाविक आवर्जून येथून खरेदी करत होते. त्यामुळे धंदा चांगला झाला.

मात्र, पालीत दाखल झालेल्या भाविकांच्या गाड्यांमूळे मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी झाली होती. पाली पोलीस व बल्लाळेश्वर देवस्थानचे सुरक्षा रक्षक वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत होते.



> वर्षातील पहिल्या दिवशी मोठ्या प्रमाणात भाविक बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी आले होते. भाविकांची खूप गर्दी असल्याने व्यवसाय देखील चांगला झाला. आलेल्या भाविकांनी मनोभावे बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले.
>
> – राहुल मराठे, व्यावसायिक

> बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. नाममात्र दरात प्रसादालयामध्ये प्रसाद (भोजन) उपलब्ध आहे. भाविकांना राहण्यासाठी दोन सुसज्ज सर्व सोयी सुविधांनी युक्त आधुनिक भक्त निवास आहेत. रांगेत उभे राहण्यासाठी रेलींग व शेड उभारण्यात आली आहे. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंग देखील आहे. तसेच सुसज्ज स्वच्छता गृह देखील उभारण्यात आले आहेत. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही.
>
> –जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली

# वनराई बंधारे ठरताहेत वरदान



| पाताळगंगा | प्रतिनिधी |

वनराई बंधारा बांधून पाण्याची पातळी वाढून काही दिवस पाणी येथेच अडविले तर काही महिने या पाण्यामुळे विविध प्रश्न मार्गी लागतात. ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जाते. गुरांच्या पिण्याच्या पाण्यांचा प्रश्न मार्गी लागतो. यामुळे गाव पातळीवर बंधारा बांधून पाणी अडवा, पाणी जिरवा ही संकल्पना राबविणे काळाची गरज आहे. यामुळे वनराई बंधारे शेतकरी आणी पशू-पक्षांसाठी वरदान ठरत आहे.

पावसाळा संपताच पाण्याचे विविध स्त्रोत्र तळ गाठत असतात. मात्र काही ठिकाणी हेच पाणी आपण अडवू शकतो. उन्हाळा आला की आपल्याला पाण्याचे महत्व समजते कारण विहीर, तलाव, कूपनलिका, ओढे असे पाण्याचे असलेले स्त्रोत्र तळ गाठण्याची स्थिती निर्माण करतात. पाणी हे आपले

**● शेतकरी, पशू-पक्षांना होतो फायदा**

जीवन आहे. कारण जल है, तो हम है अशा पध्दतीचे उच्चार सातत्याने करीत असतो. यामुळे मात्र हे आचरणात कोणीही आणत नाही. तुरळक ठिकाणी बंधारे बांधून पाणी अडविले जाते. मात्र प्रत्येकांनी आपले नैतिक कर्तव्ये म्हणून पाणी अडविले पाहिजे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जिवंत राहू शकत नाही. पशू, पक्षी, झाडे, मानव यासाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असतो. यामुळे बंधारे यांचे महत्व जाणून घेऊन पाणी अडविले पाहिजे. या पाण्याचा वापर गुरांची तहान भागविण्यासाठी तसेच जंगलातील प्राणी यांना पिण्यासाठी होत आहे. शिवाय शेतकरी वर्ग यावरती भाजी पाल्यांचे उत्पन्न घेतले जाते. यामुळे रोजगारांचा प्रश्न मार्गी लागत आहे.

## जाहीर नोटीस

सर्व संबधीताना याद्वारे कळविण्यात येते कि, माझे अशीलांनी मौजे कोर्लई, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील नमूद मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) सुचिता अँतोन वेगस, २) एक्लेसिया जाँव रुझारियो, ३) मार्था राफेल वेगस, ४)मोनिका आगस्तीन मार्तीस, ५) सिमा आगस्तीन मार्तीस, ६) रोशन आगस्तीन मार्तीस, ७) पास्कोल लॅरेन्स मार्तीस, ८) रोजीन लुईस फर्नाडीस, ९) लियोनार्ड ओजवल्ड वेगस,१०)निक्सन ओजवल्ड वेगस यांच्या कडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे.

संदर्भित जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमीची असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशीलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्यात कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा करार, वारस, गहाण, अभिहस्तांतरण, बक्षीस, निर्वाह, कब्जा, विक्री, दान, भाडेपट्टा, धरणाधिकार, भार, वहिवाट, बोजा, न्यास, पोटगी, सुविधाधिकार हस्तांतरण, परवाना, कुळवहिवाट, अदलाबदल, कोणत्याही तंट्यात किंवा अन्य प्रकारे क्षोभीत असल्याने कोणताही दावा असल्यास किंवा कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांका पासून १५ दिवसांचे अवधीत माझेकडे खालील पत्त्यावर लेखी पुराव्यानीशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली हरकत माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| कोर्लई, ता.मुरूड | ३१ | ०-७९-०० | १.४४ |

अलिबाग
दिनांक २९/१२/२०२५

सही /-
**(अँड. प्रशांत एच.वर्तक)**
कार्यालय तथास्तु, गोकुळनगर,
रेवस बायपास रोड, चेंढरे
अलिबाग-रायगड

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड.**

| स. नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| १६५/१ | ०१-८४-००<br>पो.ख. ००-१२-००<br>एकुण - ०१-९६-०० | १-६९ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०२/०१/२०२६

**अॅड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता- बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## नमुना एन. डी.
## (नियम ९२(३) पहा)-
### परवानाधारकाच्या उत्तराधिकाचा वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीशीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/46/cc/Auto/2018/6317 मध्ये समाविष्ट असलेल्या मोदार वाहन क्र. MH46-AZ-6256 मालक श्री./श्रीमती कै. रूपचंद चारू कांबळे यांचे तारीख ३०-०७-२०२३ रोजी निधन झालेले आहे.

मी./श्रीमती रुपाली रूपचंद कांबळे पत्ता घर क्र ९५, सुभाषनगर, खोपोली गणेश मंदिराजवळ,पो, जगदीश नगर, ता. खालापुर जि.रायगड उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वाप करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल, रायगडच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल, रायगड च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

उत्तराधिकाऱ्याचे नाव -श्रीमती रुपाली रूपचंद कांबळे
पत्ता घर क्र.९५ सुभाषनगर, खोपोली गणेश मंदिरा
जवळ पो-जगदीशनगर, ,ता-खालापुर, जि-रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत हि खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे अडनाळे, ता. तळा, जि. रायगड, येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | एकुण क्षेत्र हेआर | आकार रु. पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| सुनिता प्रफुल्ल नायक | ६८/१० | वरकस ०-७७-००<br>पो.ख. ०-११-००<br>०-८८-०० | ०=४७ | खालसा |
| प्रफुल्ल नरहरी नायक | ७०/२ | वरकस ५-५५-००<br>पो.ख. ३-१७-००<br>८-७२-००<br>पैकी प्रफुल्ल नरहरी नायक याचे हिश्श्याचे क्षेत्र | ०=०२<br>०=७७ | खालसा |
| प्रफुल्ल नरहरी नायक | ७८/२ | ४-२२-०० हे आर<br>वरकस ०-१८-५०<br>पो.ख. ०-०२-००<br>०-२०-५० | ०=२५ | खालसा |

वरील मिळकती संबंधात आमचे आशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, अॅटचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कबजा वहिवाट वचनचिठ्ठी दावा दरखास्त वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. ०१/०१/२०२६

सही/-
**अॅड. श्री. पी. जी. दाभाडे,**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग, ४ था मजला.
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजीनगर,
डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ रोहा,
ता. रोहा जि. रायगड ४०२१०९,
मोबा.क्र. ९२७२७९३९५६

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
### खुली - ई-निविदा आमंत्रण सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे वतीने विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांचे द्वारे खालील कार्यासाठी ई-खुल्या निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत. **कामाचे नाव**: कोकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या माणगांव स्थानकावर लिफ्टसाठी वीजपुरवठा व्यवस्थेत सुधारणा आणि प्रकाश व्यवस्था. **निविदा सूचना क्र.: केआर/आरएन/ ईएल/टी/16/2025, दिनांक 02.01.2026. अंदाजित खर्च**: रु. 8,43,131/- (जीएसटी वगळून). **निविदा प्रपत्राची किंमत**: शून्य. **ईएमडी**: रु. 16,900/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्यानुसार). **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ**: 23.01.2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा रेल्वेचे संकेतस्थळ **www.ireps.gov.in** पहावे.

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. रमेश चिंतामण शिंत्रे व इतर | २४/८ | ००-४४-००<br>पो.ख. ००-०३-००<br>एकुण ००-४७-०० | ०-३० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०२/०१/२०२६

**अॅड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता- बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
### निविदा सुचना क्रमांक ४ (२०२५-२६)

मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग हे खाली नमुद केलेली वाहने आहे त्या स्थितीत निविदा मागवून विक्री करणेसाठी मोहरबंद निविदा दि. ०३/०१/२०२६ ते दि. १०/०१/२०२६, दुपारी ३.०० वाजे पर्यंत मागविण्यात येत आहेत.

कोरे निविदा फॉर्म (नियम व अटी आणि शेडयुल बी सह) रक्कम १०००/- भरून दि. ०५/०१/२०२६ ते दि.०८/०१/२०२६ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) रायगड जिल्हा परिषद, अलिबाग कुंटेबाग येथून उपलब्ध होतील.

निश्चित केलेल्या उच्चतम किंमतीच्या (अपसेट प्राईज) च्या अधारावर संबंधित निविदा धारकाने सादर केलेली रक्कम वाहनांची अंतिम किंमत निश्चित करणेत येईल.

| अ. क्र | वाहनाचा प्रकार | वाहनाचा क्रमांक | वाहन निरिक्षणासाठी ठेवण्यात आलेले ठिकाण | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मारूती एस ४ | MH-०६-AA-१००१ | कुंटेबाग, अलिबाग | २०००/- |
| २ | होंडा सिटी | MH-४६-G-०००१ | कुंटेबाग, अलिबाग | २०००/- |
| ३ | महिंद्रा जीप | MH-०६-AA-०२९३ | पंचायत समिती श्रीवर्धन | २०००/- |
| ४ | महिंद्रा जीप | MH-०६-AA-९९६३ | पंचायत समिती माणगांव | २०००/- |
| ५ | महिंद्रा जीप | MH-०६-AA-९९०५ | पंचायत समिती म्हसळा | २०००/- |

कोणतेही कारण न देता एक वा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार खालीता सही करणार यांना राखून ठेवण्यात आलेला आहे.

सही/-
**नेहा भोसले (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**रायगड जिल्हा परिषद अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकविस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं.. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौरस मिटर | रुपये | पैसे |
| चंद्रसेन नामदेव शेटये | ४४२ | ४ | ३२५.०० | ३२ | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- शॉप नं.२, तळमजला,
साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ,
नेरळ पुर्व, ता.कर्जत,
जि.रायगड. ४१०१०१

सही/-
अॅड. **नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक :- ०२/०१/२०२६
मो. नं. ९३७२९६४६६५

### उपविभागीय अधिकारी यांचेपुढे चालू असलेल्या कुळवहिवाट /अधिकार अभिलेख संबंधीच्या दाव्यातील पक्षकारांना द्यावयाची नोटीस

ईक्युजे कोर्ट नं.१८४/२०२५

## जाहीर नोटीस

१) कै. कृष्णा रामजी सावंत (मयत ) **अर्जदार**
२) कै. धर्मा रामजी सावंत ३) कै. सदानंद रामजी सावंत
वारस मुलगा व पुतण्या श्री. शशिकांत कृष्णा सावंत,
रा. कुणबीवाडी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड

**विरुद्ध**

१) श्री. अक्षय भालचंद्र मापुसकर २) श्रीम. निकिता भालचंद्र मापुसकर
३) श्रीम. भावना भालचंद्र मापुसकर
४) श्रीम. मानसी कैलास प्रसाद, अ.क्र. १ ते ४ रा. आदगाव,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड
५) श्री. रमेशचंद्र प्रभाकर सातपुते,
रा. केअर ऑफ संदेश कीर, मु.पो. वडवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
६) श्री. निशांत सुधाकर मोरे, रा. आदगाव, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
७) श्री. श्याम जॉर्ज, रा. आदगाव, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
८) श्री. वैभव चंद्रकात पुलेकर,
रा. ३०२ अविष्कार को. ऑप हौ.सो. बंदर पाखाडी
रोड सहयाद्री नगर चारकोप गौरव गार्डन जवळ
कांदिवली पश्चिम मुंबई ४०००६७
९) श्रीम. अमृता देवाप्पा खोराटे,
१०) श्री. अंकुश देवाप्पा खोराटे अ.क्र. ९ व १०
रा. २०१ आदित्य हाईटस सेक्टर १०
प्लॉट क्र. ५२ कामोठे पनवेल ४१०२०९
११) श्री. रविंद्र दत्तात्रय कासार, रा. १६०१ प्रेस्टोन वन हिरानंदानी पार्क
पाटली पाडा जी बी रोड ठाणे पश्चिम ४०० ६०७
१२) श्रीम. अनुधारा महेंद्र शेलार
१३) श्रीम. राजश्री राहुल सोनवणे
अ.क्र.१२ व १३ रा. कुणबीवाडी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
१४) श्री. नरेंद्र कुमार, रा. २०५ गल्ली नं. ४,
डॉक्टर शर्मा क्लिनिक जवळ, वसंत विहार साऊथ वेस्ट दिल्ली ११००६७
१५) श्री. सुनिल शंकरलाल आस्कनानी
१६) श्रीम.अनिशा सनिल आस्कनानी अ.क्र.१६ व १७
रा. फ्लॅट नं. २६०४, २६ वा मजला, नार्थ साईड,
हिरानंदानी मेडोस ग्लॉडी अलवर्स रोड, चितळसर, मानपाडा ठाणे (प.) ४००६१०
१७) श्री. सुकृत रविंद्र मांजरेकर, रा. मु.पो. वडवली, ता. श्रीवर्धन, जि.रायगड
१८) श्री. विश्वनाथ शंकर कोकाटे
१९) श्री. अजित कमलाकर कोकाटे अ.क्र. १८ व १९
रा. मु.पो. दिवेआगर, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
२०) श्रीम. सचिता अक्षय मापुसकर, मु. पो. आदगाव, ता. श्रीवर्धन, जि. रायगड **सामनेवाला**

सामनेवाला क्र.१५, १६, १७, १८, १९, २० यांस यावरुन कळविणेत येते की, मौजे कुणबीवाडी, ता. श्रीवर्धन येथील गट नं. ९६ बाबत अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण श्रीवर्धन येथील टेनन्सी/अर्ज क्र.१२/२०१५ अपील दाखल केले आहे. सदर प्रकरणी सुनावणी उपविभागीय अधिकारी, श्रीवर्धन यांचे कार्यालयात दिनांक २२/०१/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता करण्याचे ठरविले आहे. तरी तुम्ही अथवा तुमचे प्रतिनिधी यांनी तुमचा कोणताही पुरावा असल्यास त्या पुराव्यानिशी तुमचे म्हणणे मांडण्यासाठी सदरहू दिवशी. सदरहू जागी व वेळी माझ्यापुढे हजर राहिले पाहिजे, उपनिदिष्ट वेळी व जागी अशा तऱ्हेने तुम्ही उपस्थित न राहिल्यास तुमच्या अथवा तुमच्या प्रतिनिधींच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निकाल केला जाईल. सुनावणीची तारीख घेण्याची जबाबदारी सर्वस्वी तुमची राहिल याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०१/०१/२०२६

सही/-
**(महेश पाटील)**
**उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन उपविभाग श्रीवर्धन**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, श्री. सुनील सुरेश उपलाप (खरेदीदार) हे विद्यमान मालक श्री.अनिल हरिश्चंद्र खन्ना (विक्रेता/ मालक) यांच्याकडून मौजे सांगवी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिनीसंदर्भातील हक्क, अधिकार व हितसंबंधांची खरेदी करू इच्छित आहेत व/वा त्या प्रक्रियेत आहेत.

**जमिनीचे विवरण**

| सर्व्हे क्र. | प्लॉट क्र. | क्षेत्र एच-आर-पी | निर्धारण रु. पै | |
|---|---|---|---|---|
| १४ | १/ए | ०-५१-५० | ० | ८७ |

कोणाही व्यक्तीचा सदर जमिनीसंदर्भात वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध, हिस्सा, दावा, मागणी, प्रभार, दावा, धारणाधिकार, गहाण, भाडेकरार, वहिवाट, सुविधाधिकार, उत्तराधिकार, न्यास, दावाखटला, संपादन सूचना, सरकारी थकबाकी वा अन्य कोणत्याही स्वरूपातील कोणतेही भार असल्यास किंवा तसा दावा असल्यास त्यांनी त्यांचे दावे वा हरकती, सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासहित लिखित स्वरूपात खरेदीदारांच्या अधोहस्ताक्षरित वकिलांकडे सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सादर करावेत.

वरील विहित कालावधीत कोणताही दावा वा हरकत प्राप्त न झाल्यास, सदर जमिनीसंदर्भात कोणताही दावा, हरकत, भार वा विपरित हितसंबंध नाहीत असे पूर्णतः गृहीत धरले जाईल व खरेदीदार व्यवहाराची प्रक्रिया करतील. अशा परिस्थितीत असे सर्व दावे, काही असल्यास, ते अधित्यागित समजले जातील आणि त्याकरिता खरेदीदार हे जबाबदार वा बांधील नसतील.

सदर सूचना ही खरेदीदारांचे हक्क व हेतूस बाधा न आणता जारी करण्यात आली आहे.

दिनांक : ०१.०१.२०२६
ठिकाण : कर्जत
खरेदीदारांकरिता व त्यांच्या वतीने
अॅड. करण भन्साली
भन्साली अॅन्ड पालेकर
२०१, हर्लीन हाइट्स, राजे शहाजी मार्ग, लाभ दर्शन बिल्डिंगजवळ, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८.
kbhansaliconsultancy@gmail.com
मोबाईल : ९८१९११६३२१.

## जाहीर नोटीस

सर्व नोटीसीने संबंधितांना असे कळविण्यात येते की. आमच्या अशिलांनी मौजे धोकवडे, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत मालकी हक्काचा शोध घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीमध्ये १. कृष्णा लक्ष्मण माळवी, २. भगवान लक्ष्मण माळवी, ३. वनिता वसंत म्हात्रे, ४. अशोक शंकर धोंडसेकर, ५ यशोदा यशवंत म्हात्रे, ६. किशोर परशुराम माळवी, ७.विलास परशुराम माळवी ८. शर्मिला दत्तात्रेय थळे ९. स्वाती हिरु पाटील, १०. केतन चंद्रकांत चेरकर यांच्या नावाची नोंद अविभक्त सामाईक हक्कांत दिसून येत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार रु. पै |
|---|---|---|---|
| धोकवडे, ता.अलिबाग, जि.रायगड | ७०८ | ०-७२-८०<br>पो.ख. ०-०८-४०<br>एकूण ०-८१-२० | २१-५० |

तरी वरील मिळकतीसंबंधी कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांत खालील सही करणार खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट यांच्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून आमचे अशिलांची खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.०२.०१.२०२६

सही/-
**अॅड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन व घर मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान मालक सुरेखा सुनिल ठाकूर यांच्यामध्ये बोलणी करण्यात आलेली आहेत. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| नागाव, ता.अलिबाग. | ४७८/२ | ०-३१-७० | ९.३८ |

वर वर्णन केलेल्या मिळकती पैकी सुरेखा सुनिल ठाकूर यांचे मालकीचे असलेले क्षेत्र ०-०७-५० हे.आर. आकार २.३३रू. पैसे ही जमीन मिळकत व सदर मिळकतीवर असलेले ग्रुप ग्रामपंचायत नागाव मालमत्ता क्रमांक ३४८१ ही घर मिळकत या नोटीसचा विषय आहे.

संदर्भित मिळकत पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०२/०१/२०२६

**अॅड.शोधन साईनाथ ठाकरे**
बी.ए,एल.एल.बी.
मु. वरसोली, पो.वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड.

## महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
### सा.बां. विभाग, पनवेल
### पिनकोड - ४१० २०६

E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in

**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०**

**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र.४६**
**(ई-निविदा) सन २०२५-२६**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण ३ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०७.०१.२०२६ सकाळी १०.०० ते दिनांक १४.०१.२०२६ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई-निविदाजा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड**
**दिनांक :-**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ५०/४, ५१/९ बिनशेती प्लॉट नं. ४९, व सर्व्हे नं.२२१/१ व २२१/२ बिनशेती प्लॉट नं. ५० या बिनशेती मिळकतीवरील भालचंद्र कॉम्प्लेक्स इमारत क्र.१ मधील, तळ मजल्यावरील व्यापारी गाळा क्र.६ क्षेत्र १६२ चौ.फुट ज्याचा वरसोली ग्रामपंचायत मालमत्ता क्र.११४९/६ असा आहे हा गाळा, या व्यापारी गाळ्याचे विद्यमान मालक करूणा चंद्रशेखर नावलकर रा.११ नवनिधी हौ.सोसायटी, लिबर्टी गार्डन रोड, मालाड, पश्चिम, मुंबई ४०००६४ यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू व्यापारी गाळा निर्वेध असल्याचा भरवसा व्यापारी गाळ्याचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू व्यापारी गाळ्यावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास व्यापारी गाळा निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०१/०१/२०२६

**(अॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चवणे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ९६/१० | एकूण क्षेत्र ०-१७-०० हे.आर. | ०.१६ |
| ९६/९ | एकूण क्षेत्र ०-१६-०० हे.आर. | ०.१२ |
| ९५/२/अ/१ | एकूण क्षेत्र ०-२०-४० हे.आर. | २.०० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०५ (पाच) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ०२/०१/२०२६

**अॅड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण.जि.रायगड पिन नं. ४०२१०७

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# वणवे विझल्यानंतर अभियान



## वन्यजीव गणनेमध्ये वणव्यांचा अडसर

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

**पोलादपूर तालुक्यात वणवेविरोधी अभियान राबविले जात आहे. परंतु, हे अभियान वणवे विझून गेल्यानंतर सुरू होत असल्याने आता तालुकावासियांनी वणवे रोखण्यासाठी अन् विझविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे. गेल्या वर्षाअखेरिस झालेल्या वन्यजीव गणनेमध्ये या वणव्यांचा अडसर निर्माण झाल्याचे वन्यजीवांच्या पावलांच्या ठशांवर तसेच विष्ठेवर जळलेल्या रोपे तसेच झाडांचे अवशेष आल्याने स्पष्ट झाले आहे.**

### पोलादपूरकरांनाच पुढाकार घेण्याची गरज

पोलादपूर तालुक्यात वारंवार लागणाऱ्या वणव्यांमुळे वन्यजीवांनी वनक्षेत्रातून पळ काढल्याचे स्पष्ट झाले असताना वनक्षेत्रात वन्य पक्ष्यांचा वणव्याच्या आगीच्या भक्ष्यस्थानी पडून होरपळून मृत्यू झाल्याच्या तक्रारीदेखील वनक्षेत्राच्या वनपालांकडे गेल्या वर्षी प्राप्त झाल्या आहेत. मात्र, घटनास्थळी पाहणी करेपर्यंत वन्यपक्ष्यांचे विशेषत: मोर लांडोरींचे मृतअवशेष भटक्या कुत्र्यांनी भक्ष्य केल्याने दिसून आले नाहीत. पोलादपूर नगरपंचायतीकडे अग्निशमन यंत्रणा नसल्याने आतापर्यंत अनेकदा महाड नगरपरिषद आणि महाड एमआयडीसीतील अग्निशमन यंत्रणांना पाचारण करून वणवे विझविण्यात आले आहेत. त्यामुळे पोलादपूर तालुक्यात अग्निशमन यंत्रणेची गरज ध्वनित झाली असली तरी सध्यातरी पोलादपूरकरांनाच वणवे प्रतिबंधासाठी तसेच विझविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

पोलादपूर तालुक्यात मार्गशीर्ष महिन्यापासून सुरू झालेले वणवे वैशाख महिन्याच्या मध्यापर्यंत म्हणजे तब्बल साडेपाच महिने सुरू राहणार आहेत. त्यानंतरही पारंपरिक शेतीचा एक अविभाज्य भाग म्हणून शेतात जाळले जाणारे तरवे उन्हाची झळ अनुभविण्यास लावणार आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये सवाद येथे एका गवताची उडवी जळण्याचा तर कापडे फौजदारवाडीसह धामणदिवी, सडे, सवाद, कोतवाल बुद्रुक आणि कोंढवी येथे वाडा जळून गुरे होरपळल्याच्या दूर्घटना घडल्या आहेत. दरम्यान, तालुक्यात संध्याकाळी उंच डोंगरावर विद्युत रोषणाई केल्यासारखे दृश्य मनोहारी दिसत असले तरी हे वणवे मोठ्या प्रमाणात वन संपदेचे नुकसान करतात. हे वणवे भर दुपारी जेव्हा पेटतात तेव्हा पाणी टंचाई असलेल्या या तालुक्यात शेतकऱ्यांना त्यावर नियंत्रण ठेवणे अशक्य होते. पोलादपूर तालुक्यातील माळरानावरील गवताचे प्रमाण पाहता ते तालुक्याला पशुधन संगोपनासाठी दुधदुभता तालुका अशी ओळख देण्यास उपयुक्त आहे. मात्र, दरवर्षी लागणाऱ्या वणव्यांमुळे दाहक अनुभव शेतकऱ्यांना घ्यावा लागत आहे. दोन वर्षांपूर्वी येथील डोंगरावर पेटते कापडी बोळे फेकून वणवे लावणाऱ्या दोघा मोटारसायकलस्वारांचा व्हिडीओ सोशलमिडीयावरून व्हायरल झाला होता. तेव्हा हे वणवे कोळसानिर्मितीसाठी लावले जाऊन वणवे विझल्यानंतर मोठ्या प्रमाणात कोळसा गोळा करण्यात येत असल्याचे लक्षात आले. मात्र, हे दोघे निसटण्यात यशस्वी झाले होते. गतवर्षी डिसेंबर महिन्यात पोलादपूरच्या ४ हजार हेक्टर वनक्षेत्रामध्ये वन्यजीवगणना सुरू असताना केवळ कोल्हे, साळींदर आणि भेकरीचे अस्तित्वाचे पुसट संकेत प्राप्त झाले आहेत. मात्र, बिबट्यासह अन्य वन्यपशूंचे वनातील वास्तव्य दर्शविणारे विष्ठा, पावलांचे ठसे, अन्य पाळीव प्राण्यांना व झाडांना नखांनी ओरबाडणे असे संकेत वणव्यांमुळे दिसून आले नसल्याचे वनरक्षक आणि वनपालांचे म्हणणे आहे.

वनवणा प्रतिबंधक सप्ताहाचे आयोजन हे फेब्रुवारी महिन्याच्या १ ते ७ तारखेपर्यंत केले जात असले तरी तत्पूर्वीच वणव्यांची तीव्रता अधिक असल्याने तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांनी आता वणवे विझविण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

# परप्रांतीयाकडून वृद्ध दाम्पत्याला मारहाण



**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

गेट समोर वाहन उभ करू नका आणि येथे मद्यपान करू नका, असे सांगितल्याने मराठी दांपत्याला परप्रांतीय वाहन चालकाने आणि त्याच्या सहकार्यांनी मारहाण केल्याची घटना कळंबोली येथील रोडपाली परिसरात घडली आहे. घटनेनंतर परिसरात गर्दी जमल्याने मारहाण करणारा वाहन चालक वाहन तिथेच सोडून पसार झाला असून कळंबोली पोलीस ठाण्यात या बाबत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

रोडपाली परिसरात अवजड वाहने उभी करून तेथेच चालक मद्यपान करतात. मद्यपान करून झालेल्या वादातून हत्या झाल्याची घटना या पूर्वी या परिसरात घडली आहे. तसेच, अपघातामुळे लहान वाहन चालकांना जीव गमावण्याची घटना देखील या पूर्वी घडली आहे. नागरिकांनी या विरोधात पंतप्रधान कार्यालयाशी पत्रव्यवहार केला आहे. सेक्टर १४ ते २० या परिसरातील रहिवाशी या अवजड वाहनांच्या पार्किंगमुळे हैराण आहेत. सिडको प्रशासनाच्या मोकळ्या भूखंडावर आणि रस्त्यालगत अवजड वाहने उभी केलेली असतात. पोलीस दिखाव्यापुरती तात्पुरती कारवाई करतात. दरम्यान, रणचिर सहारे (६७) हे आपल्या पत्नी सोबत रोडपाली येथे छोटासा व्यवसाय करतात. बुधवारी (दि.३१) हे दाम्पत्य व्यवसाय बंद करून सामानाची आवरा आवर करत असताना समोर उभ्या असलेल्या अवजड वाहनाचा चालक सहकाऱ्यासह वाहनात बसून मद्यपान करत होतते. यावेळी मद्यपान करून बाटल्या येथे टाकू नका, असा जाब सहारे यांच्या पत्नीने विचारला. त्याचा राग येऊन चालक आणि त्याच्या सहकार्याने लाथा बुक्याने त्यांना मारहाण केली असून घटना स्थळावरून पसार झाले आहेत.

# निवडणूक प्रशिक्षणाला कर्मचाऱ्यांची दांडी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमहापालिकेचीसार्वत्रिक निवडणूक पारदर्शक आणि सुरळीत पार पाडण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या निवडणूक प्रशिक्षणाला मोठ्या प्रमाणावर दांडी मारण्याचे प्रकार घडत आहेत. प्रशिक्षणाचे दोन दिवस पूर्ण झाल्यानंतर सुमारे २,३०० कर्मचाऱ्यांपैकी तब्बल ५७४ सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणास गैरहजेरी लावल्याची माहिती समोर आली असून, यामुळे महापालिका प्रशासनाची चिंता वाढली आहे. पनवेल महापालिकेने निवडणुकीत सहभागी होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय प्रशिक्षण शहरातील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित केले होते. सोमवार व मंगळवारी २,२९४ कर्मचाऱ्यांना दिलेल्या प्रशिक्षणात तब्बल ५७४ कर्मचारी व अधिकारी गैरहजर राहिले. महापालिकेला एकूण ४,२०५ कर्मचारी व अधिकाऱ्यांना निवडणुकीसाठी प्रशिक्षित करायचे आहे. गैरहजर राहणाऱ्यांपैकी केवळ २० ते २२ कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणास उपस्थित राहण्यात अडचणी असल्याबाबत लेखी अर्ज महापालिकेकडे सादर केले आहेत.

## निवडक



### पोलादपूर विद्यामंदिराचा स्नेहमेळावा

**पोलादपूर :** रयत शिक्षण संस्थेच्या विद्यामंदिरामध्ये २०००-०१ या शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता दहावित शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी गेल्या ७-८ वर्षांपासून स्नेह मेळावा आयोजित करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला होता. अखेरीस सर्वांच्या प्रयत्नांमधून रविवारी (दि.२९) मोरगिरी रोड मैत्री गार्डन येथे स्नेहमेळावा यशस्वी झाला. या शाळेचे शिक्षक बी.जी. पाटील यांनी स्नेहमेळाव्यास प्रेरित केल्यामुळे सर्व माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे मनापासून आभार व्यक्त केले. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका अस्मिता तलाठी व मुख्याध्यापक शेठ यांनी या स्नेहमेळाव्यास उपस्थित राहून विद्यार्थ्यांसोबत मनोगत व्यक्त करत मराठी माध्यमिक शाळेचे महत्त्व आणि आजची बदलत चाललेली जीवनशैली याविषयी मार्गदर्शन केले. हा स्नेह मेळावा यशस्वी करण्याकरिता सुहास कळमकर, हरीश मोरे, सारिका बोरकर-महाडिक, स्वाती दीक्षित-महामुनी या सर्व विद्यार्थ्यांनी संपर्क साधत नियोजनात पोलादपूरमधील स्थानिक माजी विद्यार्थी प्रसाद शहा, निलेश आंबेतकर, निहाल कुडाळकर आणि चिंचवड-पुणे येथील विजयेंद्र कोळसकर या सर्वांना सोबत घेतले.

### खारघरमध्ये बेकायदा मद्यविक्री सुरूच

**नवीन पनवेल :** खारघर शहरातील प्रभाग क्रमांक ३० ओवे गाव या ठिकाणी बेकायदा मद्य विक्री प्रकरणी संगीता पांचाळ यांच्यावर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा यांनी केली. खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदा मद्यविक्री होत असताना अन्य ठिकाणच्या पोलिसांनी कारवाई केल्याने खारघर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर संशय व्यक्त केला जात आहे. खारघर शहरातील प्रभाग क्रमांक ३० मधील ओवे गावातील विठाबाई निवास इमारतीच्या जिन्याखाली एक महिला मद्य विक्री करत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक कक्षाला मिळाली. त्यानुसार त्यांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी १० हजार ६९० रुपयांचे मद्य जप्त करण्यात आले. इतर ठिकाणच्या पोलिसांनी कारवाई केल्याने बेकायदा मद्य विक्री खारघर पोलिसांना माहिती नव्हती का? असा सवाल या कारवाईमुळे उपस्थित झाला आहे.

### कामोठ्यात लाखो रुपयांचा अपहार

**नवीन पनवेल :** १ लाख ९३ हजार रुपयांची बिले डिलीट करून ते पैसे स्वतःच्या फायद्यासाठी घेऊन दुकानात अपहार करून फसवणूक केल्या प्रकरणी संदीप सरोज याच्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कामोठे प्रभाग क्रमांक १० येथे हरीश वैध यांचे फूड बास्केट नावाचे शॉप येथे आहे. त्यांच्या दुकानात संदीप सरोज हा काम करतो. त्यांनी युजर आयडी चालू केले. यावेळी युजर आयडीचा वापर दुसऱ्या कोणीतरी केला असल्याचे त्यांच्या लक्षात आले. तसेच, युजर आयडी आणि पासवर्डचा वापर करून बिल डिलीट केले असल्याचे दिसून आले. त्यांनी सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता संदीप सरोज हा कॅश काऊंटरवर उभा होता आणि त्याने दुकानातील बिलाचे पैसे कॅशमध्ये घेतलेले दिसत होते. आणि ते पुडित बांधून खिशात ठेवत असताना दिसून आले. त्याने एकूण १ लाख ९३ हजार ८० रुपयांची बिले त्याने डिलीट मारली आहेत.

### लेन बदलल्याने अपघात; दोघांचा मृत्यू

**नवीन पनवेल :** कंटेनरने लेन बदलल्याने कंटेनरने इनोव्हा कारला धडक दिली. त्यामुळे या अपघातात अरुण विश्वनाथ कचरे आणि तुळसा मनोहर पवार यांचा मृत्यू झाला. या अपघात प्रकरणी कंटेनर चालकाविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.विशाल भोडगे हे दि.२९ डिसेंबर रोजी त्यांच्यासोबत पाच जणांना घेऊन ईनोवा कारने सांगलीवरून कळंबोली येथे पहाटे अडीचच्या सुमारास पुणे-मुंबई मार्गावरील आदई पुलाजवळ आले. यावेळी कंटेनरवरील चालक चंदू प्रकाश चौधरी यांनी रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून गाडीची लेन बदलली आणि इनोव्हा गाडीला धडक देऊन अपघात झाला. या अपघातात इनोव्हा कारच्या टायरवरील बॉडी दाबून चेपून नुकसान झाले आणि अरुण कचरे, तुळसा पवार यांचा मृत्यू झाला.

# पनवेल बांधकाम व्यवसायिकांची बैठक




- **धुळ प्रदुषणामुळे नागरिक त्रस्त**
- **सुचनांचे पालन न केल्यास कारवाईचा इशारा**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल मनपा हद्दीतील बांधकाम व्यावसायिकांसाठी महानगरपालिकेने दिलेल्या सुचनांचे पुर्णत: पालन करावे अन्यथा महानगरपालिकेच्यावतीने कठोर कारवाई करणार असल्याचे आयुक्त मंगेश चितळे यांनी नमुद केले आहे. पनवेल मनपा कार्यक्षेत्रात बांधकामांच्या ठिकाणी धूळ प्रदूषणामुळे नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी मनपा क्षेत्रातील बांधकाम व्यवसायिकांची महापालिका मुख्यालयात बैठक घेण्यात आली. त्यावेळी आयुक्त बोलत होते.

वायु प्रदूषण नियंत्रणासाठी उच्च न्यायालयाने दिलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक काटेकोरपणे राबविण्यावर महापालिका भर देत आहे. हवा प्रदूषण, स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था या संदर्भात महापालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम विकासकांनी योग्य ती काळजी घ्यावी. यासाठीच्या उपाययोजना विहीत काळात केल्या नाही तर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट सूचना या बैठकित आयुक्तांनी दिल्या आहेत. यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, सहाय्यक नगररचनाकार केशव शिंदे, उपायुक्त स्वरूप खारगे, रचना सहाय्यक अनिकेत दुर्गावळे, मुख्य आरेखक नितीन हुद्दार यांच्यासह बांधकाम क्षेत्राशी निगडीत क्रिडाई, एमसीएचआय, बीएनएएम संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण मंडळ व एमआयडीसीचे अधिकारी अनुपस्थितीत होते. याबाबत आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली.

# नागोठणे पोलिसांची दमदार कामगिरी



- **घरफोडीतील आरोपीच्या मुसक्या आवळल्या**
- **गुन्ह्यातील आणखी आरोपींची नावे उकळण्याची शक्यता**

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणे शहरामध्ये गेल्या काही दिवसांत घरफोडीच्या घटना घडल्या आहेत. या घरफोडी संदर्भात तपासाची चक्रे वेगाने फिरवून याप्रकरणी एका आरोपीच्या मुसक्या आवळण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण व नागोठणे पोलिसांना यश आले आहे. पोलिसांच्या या दमदार कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून या आरोपीला न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे त्याच्याकडून नागोठण्यातील घरफोडीच्या गुन्ह्यातील इतर आरोपींची नावे समजण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

नागोठणे पोलीस ठाण्यात दि.२ व ३ डिसेंबर रोजी घरफोडीचे दोन गुन्हे दाखल झाले होते. याबाबत पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांचे तात्काळ कारवाईचे आदेश अलिबाग येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व नागोठण्याचे प्रभारी अधिकारी यांना देण्यात आले होते. त्यानुसार रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व नागोठणे पोलीस ठाणे यांनी संयुक्तरीत्या या गुन्ह्यातील आरोपींचा तांत्रिक विश्लेषण व वैज्ञानिक धागेद्वारे तपास केला. त्यानुसार या घरफोडीतील आरोपी हा मध्यप्रदेश येथे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार मध्यप्रदेश येथे दि.३१ डिसेंबर रोजी पोलिसांनी दुपरच्या सुमारास सापळा लावून त्या आरोपीला अटक करण्यात आली. कुलदीप राधेश्याम डोडवे (२२) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. यानंतर कुलदीप याच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस केली असता त्याने हे दोन्ही गुन्हे केल्याची कबुली दिलेली आहे. या दोन्ही गुन्ह्यांचा पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस करीत आहेत.

## नाकाबंदी दरम्यान पोलिसांना मारहाण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहरात नाकाबंदी करीत असणाऱ्या पोलीस अंमलदाराला हुज्जत घालुन धक्काबुक्की केल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नवीन वर्षाच्या आगमनावेळी शिवशंभो नाका येथील पोलीस वाहतुक शाखेसमोरील रस्त्यावर पोलीस हवालदार ज्ञानेश्वर पवार नाकाबंदी करीत होते. त्यावेळी कल्पेश जुगे, प्रणय पाटील, तुळशीराम पवार यांनी या पोलीस अंमलदारांशी हुज्जत घालुन भांडण काढुन शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. या धक्काबुक्कीत ज्ञानेश्वर पवार यांच्या उजव्या हाताला दुखापत झाली. याप्रकरणी आरोपींवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अनधिकृत बांधकामांवर सिडकोची कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सिडकोच्या नवी मुंबई अनधिकृत बांधकाम विभागातर्फे काही महिन्यांपासून अनधिकृत बांधकामांसह अतिक्रमणांवरील कारवाईची मोहिम तीव्र करण्यात आली. नुकतीच या पथकाने कामोठे नोडमधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली आहे. या कारवाईत अनधिकृत झोपड्यांसह पत्रा व बांबूशेडयुक्त ढाबा हटविण्यात आला आहे.

सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेल्या या कारवाईत, कामोठे नोड प्रभाग क्रमांक २५ येथे सामाजिक सुविधांकरिता राखीव असणाऱ्या भूखंड क्र. १२, १३ येथे निष्कासन मोहिम राबबिली. सिडकोच्या जागेवरील अंदाजे क्षेत्रफळ १६०० चौ.मी.वरील अनधिकृत बांधकामाचा १




बांबूशेडचा ढाबा व भूखंड क्र. १४, १५ येथील अंदाजे क्षेत्रफळ १७०० चौ.मी. जागेवरील अनधिकृत बांधकामाचे कच्च्या बांबूशेडचे १५ स्टॉल्स जेसीबीच्या साहाय्याने निष्कासित केले. तसेच, भूखंड क्र. ३१ येथील अंदाजे क्षेत्रफळ ६२८३ चौ.मी. येथे निष्कासन मोहिम राबवून सिडकोच्या स्टार हॉटेल वापराकरिता राखीव असलेल्या भूखंडावरील बांधलेले अनधिकृत शेड व पत्राशेडच्या २५ झोपड्या जेसीबीच्या साहाय्याने हटविण्यात आल्या. सिडकोतर्फे कारवाई केलेल्या नमूद अतिक्रमणे ही सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून व सिडको महामंडळाकडून कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आल्यामुळे निष्कासित करण्यात आल्याची माहिती सिडकोने दिली. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार व मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको अतिक्रमण विभागाचे अधिकारी, स्थानिक पोलीस अधिकारी व सिडको पोलीस पथक, महावितरण विभागाचे अधिकारी, सिडको सुरक्षा रक्षक आणि महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्या सहभागाने यशस्वीपणे ही कारवाईची मोहिम राबविण्यात आली. या कारवाईसाठी ४ लेबर, १ जेसीबी, २ जीप असा लवाजमा तैनात ठेवण्यात आला होता.

**खाऱ्या पाण्यातील माशांना पसंती | खवय्यांचा ताज्या मासळीवर ताव**

# पर्यटकांमुळे मासळीचे भाव वधारले

**। पाली । प्रतिनिधी ।**

थर्टी फर्स्ट निमित्त जिल्ह्यात पर्यटकांची मोठी रेलचेल सुरू असून ते खाऱ्या पाण्यातील माशांना पसंती देत आहेत. त्यामुळे मासळीचे भाव वधारले आहेत.

रायगड जिल्ह्याला तब्बल २४० किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. त्यामुळे येथे समुद्रातील ताजी मासळी सहज उपलब्ध होते. नाताळ व नव वर्षाच्या सुट्टी निमित्त पर्यटकांची येथे मोठी गर्दी आहे. रायगड जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात फार्म हाऊस आहेत. नाताळच्या सुट्ट्यांमुळे हे फार्म हाऊस मालक मुंबई, पुणे या शहरातून आपल्या फार्महाऊसवर मित्रमंडळी किंवा कुटुंबासमवेत दाखल झाले आहेत. तसेच, या ठिकाणी अनेक कॉटेजेस देखील आहेत. त्यामुळे पर्यटक देखील या ठिकणी येऊन विसावले आहेत. अनेक पर्यटक खास ताजी मासळी खाण्यासाठी येथे येत असतात. त्यामुळे या ठिकाणी मासळीला अधिक मागणी असून नियमित मासळीवर ताव मारला जात आहे. तसेच, येथील मासळी मोठ्या प्रमाणात मुंबई व इतर शहरात देखील जाते.



### ताज्या मासळीला पसंती

नाताळच्या सुट्ट्यांमध्ये व नवीन वर्षाच्या स्वागतासाठी समुद्रकिनारी व इतरत्र फिरण्यासाठी पर्यटक सहकुटुंब येत आहेत. बहुतांश जण मासळी खाण्याला पसंती देतात. काहीजण थेट बाजारात जाऊन ताजी मासळी विकत आणून बनवण्यास देतात, असे दिवेआगर येथील माऊ रेस्टॉरंटचे चालक गणेश सावंत यांनी सांगितले.

### मासळी दर (प्रति किलो)

- बोंबील- ४०० ते ६०० रु.
- पापलेट- १००० ते १६०० रु.
- सुरमई, घोळ व रावस- १००० ते १२०० रु.
- मांदेली- २०० ते ३०० रुपये
- मध्यम कोळंबी- ४०० ते ६०० रु.
- बांगडा मालवणी- ४०० ते ५०० रु.
- हलवा- ७०० ते ८०० रु.
- टोळ- ५०० ते ६०० रु.

दरम्यान, नाताळ सुट्यांमुळे सध्या पर्यटक मोठ्या प्रमाणात दाखल होत आहेत. तसेच, सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी त्यांचा कल मासळी खाण्यावर अधिक होता. जिल्ह्यात मासळी देखील मुबलक व ताजी भेटत आहे. त्यामुळे खवय्ये खुश आहेत. परिणामी विक्री सुद्धा चांगली होत असली तरी मासळींचे भाव देखील वधारले आहेत.

# टेम्पोची दुचाकीला धडक

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

टेम्पोने दुचाकीला धडक देऊन अपघात झाला. या अपघातात ७२ वर्षीय महिला जखमी झाली. या अपघाताप्रकरणी टेम्पोचालका विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वैशाली करपे आणि त्यांची आई सुलोचना करपे या दि.३० डिसेंबर रोजी मॉर्निंग वॉकसाठी निघाल्या होत्या. त्या प्रभाग क्रमांक ११ येथील भाजी मार्केटच्या बाजूने चालत जात असताना चारचाकी टेम्पोने एका दूचाकीला धडक दिली. आणि ती दुचाकी सुलोचना करपे यांना पाठीमागून येऊन जोरात धडकली. त्यात सुलोचना करपे गंभीर जखमी झाल्या.




## राशीभविष्य

- **मेष** : नव्या कामांबाबत उत्साह राहील. महत्त्वाच्या भेटीतून अपेक्षित साध्य करू शकाल. बाकी चिंता नको.
- **वृषभ** : जुनी येणी सहज वसूल होतील. व्यवसायात बदलाला अनुकूलता राहील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **मिथुन** : अंगभूत कलागुणांचा विकास होईल. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील. हितसंबंध आणखी दृढ होतील.
- **कर्क** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. व्यवसायात अधिक लक्ष द्यावं लागेल. धावपळ, दगदग होणार आहे.
- **सिंह** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे होतील. पती-पत्नीत सामंजस्य रहायला हवं. कारकिर्दीत नवी संधी लाभेल.
- **कन्या** : कौटुंबिक ताण कमी होईल. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. विद्यार्थ्यांना उत्तम यश मिळेल.
- **तूळ** : हाती घेतलेली कामं पूर्ण करावी. ज्ञानदानाच्या क्षेत्रात नव्या संधी लाभतील. अपत्याची चिंता राहील.
- **वृश्चिक** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. आर्थिक करार लांबणीवर पडतील. कौटुंबिक प्रश्न उद्भवतील.
- **धनु** : सरकारी कामांना गती येईल. इतरांच्या सहकार्याची जाणीव ठेवावी. प्रलंबित कामांना गती येणार आहे.
- **मकर** : नोकरीत सहकाऱ्यांशी मतभेद संभवतात. नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक स्वीकारा. विचारानं रहावं.
- **कुंभ** : परिपूर्ण ज्ञानासाठी प्रयत्न करावे. जुन्या आठवणींमध्ये फार रमू नका. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.
- **मीन** : प्रलंबित कामांना गती येईल. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. आर्थिक आवक उत्तम राहील.

स्किल डेव्हलपमेंट

## कलेला वाव द्या

बऱ्याच महिलांना चित्रकला, हस्तकला, मूर्तीकला अवगत असते. डिझायनिंग, ॲनिमेशन, गेमिंगमध्येही रस असतो. हौस म्हणून काहीजणी चित्र काढतात. छान छान वस्तू बनवतात. पण या गोष्टी आवडीपुरत्या मर्यादित राहतात. या छंदांना, कलागुणांना विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून वाव देता येतो. हे अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही आपल्या छंदांना, आवडींना उत्पन्नाचं साधन बनवू शकता. नोकरीसोबत छोटेखानी व्यवसाय करू शकता. कलात्मकता अंगी असलेल्या महिलांना नेमकं काय करता येईल याविषयी...

चित्रकला, हस्तकला, डिझायनिंगसारख्या कलांना एकत्रितपणे 'फाईन आर्टस' म्हटलं जातं. यात बॅचलर, मास्टर्स किंवा पीएचडी करता येतं. यासोबतच वर्षभराचे डिप्लोमा अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. 'बॅचलर इन फाईन आर्टस'साठी चार वर्षं द्यावी लागतात. दोन वर्षाचा मास्टर्स अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर फाईन आर्टसमध्ये पीएचडी करता येते. दूरस्थ शिक्षण पद्धतीनेही फाईन आर्टची पदवी मिळवता येते. **(क्रमश:)**

दिनविशेष

## २ जानेवारी

**१९५४ :** राष्ट्रपतीपदी विराजमान असताना डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी 'भारतरत्न' या सर्वोच्च किताबाची सुरूवात केली.
**१९४४ :** महाराष्ट्रातील थोर सुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचं निधन.
**२०१५ :** पाकिस्तानी सैन्याने शस्त्रसंधीचा भंग करत जम्मू-काश्मीरमधील आंतरराष्ट्रीय सीमेवरील १३ भारतीय चौक्यांवर गोळीबार केला.
**२०१८ :** महिलांसाठी हज यात्रा सुकर. पुरुष पालक बरोबर असण्याची 'महरम' ची प्रथा संपुष्टात

व्हॉट्स न्यू?

## पिटुकला रोबो

हार्वर्ड विद्यापीठ आणि रोल्स रॉईसच्या इंजिनिअर्सनी अनोखा रोबो तयार केला आहे. तो भिंतीवर चिकटून चालू शकतो. गंमत म्हणजे त्याचं वजन फक्त १.४८ ग्रॅम आणि लांबी ४.५ सेंटीमीटर आहे. एचएएमआर-ई असं या पिटुकल्या रोबोचं नाव आहे. पायांवर इलेक्ट्रोॲढेजन तंत्रज्ञानाचा वापर केल्याने भिंत किंवा कोणत्याही पृष्ठभागावर तो चालू शकतो. माणसाच्या आवाक्याबाहेरची कामं करण्यासाठी तो तयार करण्यात आला. तो अगदी चिंचोळ्या जागेतही तो जाऊ शकतो. विमान किंवा जेटचं इंजिन स्वच्छ करण्यासाठीही हा मायक्रो रोबो वापरता येतो. इंजिनिअर्सनी या रोबोसाठी खास प्रकारचे सांधे बनवले आहेत. त्यामुळे त्याचे हात आणि पाय सहजपणे वळतात. सांध्यांसाठी फायबर ग्लास आणि पॉलिमाइडचा वापर करण्यात आला आहे. तो तीन पायांच्या मदतीने कोणत्याही पृष्ठभागावर चिकटून राहू शकतो तसंच एक पाय उचलून मागे-पुढे करू शकतो. मोठ्या उपकरणांची स्वच्छता करण्यासाठी अशा रोबोंचा वापर करता येऊ शकतो, असं इंजिनिअर्सचं म्हणणं आहे. याचे पाय सहजपणे भिंतीला चिकटतात तसंच सांधे थ्री डायमेंशनमध्ये फिरू शकतात. तर असा हा रोबो भविष्यात खूप उपयोगी पडू शकतो.

### पंचांग

**शुक्रवार, २ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, पौष शु. १४, चंद्रराशी : वृषभ, नक्षत्र : मृगशीर्ष, योग : शुक्ल, सूर्योदय ६.५३, सूर्यास्त ५.४२

### फॉरवर्डस

**ये क़िरदार क़े खोखले वादें ना करों ज़नाब...**

**राज़ अग़र हमनें खोलें तो बदनाम हो जाओगे...!**

आरोग्यमंत्र

## पाळावी ही पथ्ये

ॲलर्जी असल्यास अनेक प्रकारचा त्रास सहन करावा लागतो, हे आपण पाहिलं. ही चर्चा पुढे नेताना आता ॲलर्जीच्या दुष्परिणामांबद्दल जाणून घेऊ या. दीर्घकालीन अनियमित उपचाराने ॲलर्जीचे रुपांतर दम्यात म्हणजेच अस्थम्यामध्ये होऊ शकते. यामध्ये रोगप्रतिकार शक्ती कमी होते, पंच ज्ञानेंद्रियांची कार्यक्षमता हळूहळू कमी होत असल्याचे जाणवते. याच्या परिणामस्वरुप बौद्धिक कार्य मंदावते आणि जास्त दिवस औषधांचा वापर केल्यामुळे दुष्परिणामांमध्ये भर पडते. एकदा कशाची ॲलर्जी आहे हे समजल्यास उपचार घेता येतात मात्र उपचाराचा कालावधी साधारणत: व्यक्तीच्या प्रकृती, वय, किती दिवसापासून आजार आहे यावर अवलंबून असतो. ॲलर्जीवरील औषधं दोन्ही वेळा म्हणजेच सकाळी आणि संध्याकाळी घ्यावी लागतात.



उपचारादरम्यान गॅसेस बाहेर पडतात, ढेकर येतात आणि संडास साफ होते. औषधी सेवनामुळे मल, मूत्र, वायू विसर्जन उत्तम प्रकारे होते. व्यवस्थित भूक लागते आणि थकवाही कमी होतो. मात्र ही वेळ येऊ द्यायची नसेल तर आहार, विहार आणि काही पथ्य पाळणं आवश्यक आहे. उदाहरणार्थ, रात्रीचं जागरण आणि दिवसाची झोप टाळावी. अति थंड वातावरणात राहणं टाळावं. तसंच धूळ, उग्र गंध, सुगंधी द्रव्यांचा निकटचा सहवास टाळावा. विशेषत: रात्री पंख्यांचा वापर टाळावा. त्याचबरोबर मलमूत्र विसर्जनासाठी टाळाटाळ करू नये.

### फॅशन पॅशन

* भटकंतीला गेल्यावर शॉर्टसवर डेनिम शर्ट घाला. न्यूट्रल रंगांमधल्या शॉर्टस घ्या. डेनिम शर्ट आणि क्लासी टॅन ब्राउन लोफर्सनी लूक खुलवा.

* गडद निळ्या जीन्सवर लाईट ब्लू डेनिम शर्ट घाला. वीकेंड पार्टी तसंच डिनरला हा लूक मस्त दिसेल.

* पांढरा टी शर्ट, त्यावर डेनिम शर्ट आणि ब्लॅक जीन्स हादेखील भन्नाट पर्याय आहे. ही स्टाईल कधीच दगा देणार नाही. तुम्ही यात उठून दिसणारच. कॉलेजमध्ये, मॉलमध्ये जाताना किंवा बर्थ डे पार्टीला हा लूक कॅरी करता येईल. **(क्रमश:)**

भटकंती

## मणीपूरचं मनोहारी सौंदर्य

दोस्तांनो, नववर्षाच्या प्रारंभी भटकंतीसाठी एखाद्या ऑफबीट ठिकाणाच्या शोधात असाल तर उत्तर-पूर्वेकडच्या मणीपूरची निवड करायला हवी. निसर्गसौंदर्य, वन्यजीवन, तरंगणारी बेटं यामुळे मणीपूर पर्यटकांचं आवडतं स्थान बनून गेलं आहे. उत्तर-पूर्वेकडच्या राज्यांमध्ये देशाच्या इतर भागांच्या तुलनेत लवकर सूर्योदय होतो. त्यामुळे उगवत्या सूर्याचं दर्शन घेण्यासाठी आणि उगवतीच्या असंख्य छटा टिपण्यासाठी मणीपूरला भेट द्यायलाच हवी. इंफाळ ही मणीपूरची राजधानी. इंफाळ हे उत्तर-पूर्वेकडच्या सुनियोजित शहरांपैकी एक. मणीपूर विकासाबाबत थोडं मागे असलं तरी इथल्या निसर्गसौंदर्याची सर कशालाही नाही. इंफाळपासून ४६ किलोमीटर अंतरावर 'सेंड्रा' नावाचं एक बेट आहे. इथल्या 'लोकतक' नावाच्या तलावात मोटरबोटने विहार करता येतो. निळ्याशार पाण्याच्या या तलावात बोटीतून विहार करण्याचा आनंद निराळाच! याच तलावात तरंगती बेटंही आहेत. इंफाळला विमानाने जाता येईल. इथलं विमानतळ शहरापासून आठ किलोमीटर लांब आहे. इथून इंफाळला जाण्यासाठी टॅक्सी मिळते. इंफाळ रेल्वेमार्गाने जोडलेलं नाही. दिमापूर हे स्थानक इंफाळपासून २६० किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे इथे विमानाने जाणं योग्य ठरतं.



खेचाखेची

## मोठी ध्येयं

दरवर्षी नवी... मोठी आव्हानं घेण्यात, मोठी ध्येयं ठेवण्यात मजा असते!

.

.

.

गेल्या वर्षी वजन ७५ किलोचं ६८ किलो करायचं आव्हान होतं...

.

.

.

यंदा ८० चं ६८ !!!

वेगळं काही

ओठांमध्ये काही दशलक्ष नसा असल्यामुळे ते खूप संवेदनशील बनले आहेत. ओठांचं संरक्षण करणारे कोणतेही टिश्यू नसल्यामुळे बाहेरच्या तापमानाला ते सहज बळी पडतात. ओठांच्या आसपासच्या भागात घामाच्या ग्रंथी नसल्यामुळे ते लवकर फुटतात. ओठांना कोरडेपणा जाणवण्याचं हेच कारण आहे. बोटांच्या ठश्यांप्रमाणे प्रत्येकाच्या ओठांचे ठसेही वेगळे असतात. ओठांवर त्वचेचे ३ ते ६ थरच असतात. इतर इतर भागांवरची त्वचा १६ वेगवेगळ्या थरांनी बनलेली असते. त्यामुळे ते गुलाबी दिसतात. लिप बाममुळे ओठांचं सूर्याच्या अतिनील किरणांपासून संरक्षण होतं. कोलाजन या घटकाची शरीर निर्मिती करतं. यामुळे शरीरातल्या पेशी, टिश्यूंची नवनिर्मिती होते.

फॅशन पॅशन

## ट्रेंडी लूकसाठी...

मैत्रिणींनो, जीन्स असो वा लेहंगा, प्रत्येक पेहराव इंडो-वेस्टर्न पद्धतीने कॅरी करण्याचा ट्रेंड सध्या लोकप्रिय ठरतो आहे. यासाठी लेअरिंगचा फंडा वापरला जातो. बॉलिवूडमधल्या अभिनेत्रींकडून हा लूक कॅरी करण्याचे धडे घेता येतील.



✽ अंकिता लोखंडेने फॅशन डिझायनर कनिका कपूरने डिझाइन केलेला चिकनकारी कलेक्शनमधला पिवळ्या रंगाचा केप घातला होता. व्हाईट टॉप आणि ब्लू जीन्सवर लेअरिंग म्हणून हा केप कॅरी केला. अशा प्रकारचा केप लेहंगा, साडी, स्कर्ट यापैकी कशावरही घालता येईल. ✽ अनामिका खन्नाने डिझाईन केलेला श्रग सोहा अली खानने लुंगी स्टाईल स्कर्ट, लॉंग स्लीव्ह जॅकेटवर कॅरी केला. यामुळे ती आणखी स्टायलिश दिसली. तुम्ही स्कर्ट आणि जॅकेट अशा लूकवर ट्रेंडी श्रग घालू शकता. ✽ करिश्मा तन्नाने साईड प्लेट लुंगी स्कर्टवर क्रॉप टॉप आणि पायघोळ श्रग घातला. यामुळे लूकला चार चाँद लागले. असा श्रग तुम्ही कशावरही घालू शकता. ✽ डेझी शाहने डिझायनर शमिताशाने डिझाईन केलेला लेहंगा-चोली कॅरी केला होता. त्यावर पायघोळ जॅकेट घातल्यामुळे इंडो-वेस्टर्न लूक मिळाला.

## सुडोकू ४८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | | | | | | |
| | १ | ५ | | | | | ३ | |
| | | ६ | १ | ३ | | | ९ | |
| १ | | २ | ३ | | | ९ | | ८ |
| | | | २ | ८ | ७ | | | |
| ३ | | ८ | | | ९ | ७ | | ४ |
| | ३ | | | ७ | २ | ४ | | |
| | ८ | | | | | ५ | १ | |
| | | | | | | | | ६ |

**टीप -**
✽ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ द्व ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✽ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✽ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ४७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ७ | ६ | ५ | ९ | १ | ८ | ३ | ४ |
| ५ | १ | ८ | ७ | ४ | ३ | ९ | २ | ६ |
| ३ | ४ | ९ | ८ | २ | ६ | १ | ७ | ५ |
| १ | ९ | ३ | २ | ६ | ७ | ४ | ५ | ८ |
| ४ | ८ | ५ | ३ | १ | ९ | २ | ६ | ७ |
| ६ | २ | ७ | ४ | ८ | ५ | ३ | ९ | १ |
| ९ | ५ | ४ | १ | ७ | २ | ६ | ८ | ३ |
| ७ | ६ | १ | ९ | ३ | ८ | ५ | ४ | २ |
| ८ | ३ | २ | ६ | ५ | ४ | ७ | १ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ४८

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ■ | ४ | | ५ | ६ | ७ | ■ | ८ | | ९ |
| | ■ | १० | | ११ | | ■ | ११अ) | | | | ■ | ■ | |
| १२ | १३ | | ■ | | ■ | १४ | | ■ | | ■ | १५ | १६ | |
| ■ | | ■ | १७ | | १८ | ■ | १९ | | ■ | २० | | | |
| २१ | | २२ | | ■ | २३ | | | ■ | २४ | | | ■ | ■ |
| | ■ | २५ | | | | ■ | २६ | २७ | | ■ | २८ | | २९ |
| ३० | | ■ | | ■ | ३१ | ३२ | ■ | ३३ | | ३४ | ■ | ■ | |
| | ■ | ३५ | | | ■ | | ■ | ३६ | | | ३७ | ३८ | |
| ३९ | ४० | ■ | | ■ | ४१ | | | | ■ | ४२ | | | |
| ४३ | | ४४ | ■ | ४५ | | | ■ | | ■ | ४६ | | ■ | ■ |
| ■ | ४७ | | ४८ | | ■ | ४९ | ५० | | ५१ | ■ | ५२ | ५३ | ५४ |
| ५५ | | ■ | | ■ | ५६ | ■ | | ■ | ५७ | ५८ | ■ | ५९ | |
| | ■ | ६० | | ६१ | | ■ | ६२ | | | | | | ■ |
| ६३ | | | ■ | ६४ | | | | ■ | ६५ | | ■ | ६६ | |

**आडवे शब्द :-**
१) खुद्द, स्वत:
४) जाणकार
८) आकाशयान
१०) मुळाक्षरे
११अ) वाघ-सिंहाची आरोळी
१२) तर्क, अंदाज
१४) हट्ट
१५) ललाट
१७) आक्रोश, रडणे
१९) चीर, भेग
२०) व्यायाम
२१) गणपतीचे एक नाव
२३) फुरसत
२४) सेवा करणारा
२५) मत नोंदविणारा
२६) वराह
२८) कसदार
३०) नदीचा किनारा, बाण
३१) एकाग्र नजर
३३)सूर्य ग्रहणाचा एक प्रकार
३५) आराम
३६) श्रीविष्णूचे पाचवे रुप
३९) नाग, शिल्लक राहिलेले
४१) व्याज दर पद्धतीतील द.सा.
४२) नासाडी, धूळधाण
४३) सहाचा समुदाय
४५) सरस्वतीचे एक नाव
४६) नूतन, नवीन
४७) प्रत्यक्ष कृती
४९) साहित्यातील नऊ भावना
५२) पं. बिस्मिल्लाखान यांचे वाद्य
५५) थुईथुई नाचणारा
५७) मत्स्य
५९) टिंगल, चेष्टा
६०) पायाला भेगा पडण्याचा आजार
६२) हालचाल
६३) दया कीव
६४) शासनकर्ते
६५) थाळी
६६) प्रतिकूल मत, समीक्षा.

**उभे शब्द :-**
१) पुष्कळ
२) दिन, वासर
३) कान
४) हिंदीत माळ
५) तात्काळ
६) थंड
७) वर्तमानपत्रातील कप्पा
९) अजाणता
११) नमुना, चुणूक
१३) मागणी, विनंती
१५) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
१६) ओटा, चबुतरा
१७) ओढवून घेतलेले संकट
१८) उथळ आकार
२०) मिठी, विळखा
२१) पत्रातील वि. वि.
२२) काळपुरुष
२४) म. गांधीजींचा वर्ध्याजवळील आश्रमाचे गाव
२७) पहारेकरी
२९) तादाम्य पावणे
३२) गुणांची कदर करणारा
३४) शाश्वत, चिरकाल
३७) हावरटपणा
३८)संगीतातील लकेर
४०) सहा धावांचा फटका
४१) किंमत
४४) हस्त
४५) पेनातील द्रव
४८) मुंग्यांचे घर
५०) जंगलात राहणारे प्राणी
५१) समता, सारखेपणा
५३) अभिनेता-अभिनेत्री
५४) ईर्षा, बळ
५५)आकर्षक, भुरळ पाडणारे
५६) तफावत
५८) सावली
६०) एक बारीक धान्य
६१) गंध

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मं | जू | र | ■ | रा | ज | धा | नी | ■ | गु | ट | गु | टी | त |
| द | ■ | वा | सि | त | ■ | म | र | वा | ■ | वा | ■ | का | ळ |
| वा | चा | ळ | ■ | बि | रा | ण | ■ | ड | हा | ळी | ■ | का | त |
| स | ळ | ■ | आ | रा | स | ■ | आ | व | क | ■ | वि | र | ळा |
| र | क | म | पा | त | ■ | प | र | डी | ■ | पौ | ष | ■ | ट |
| ■ | री | ■ | द | ■ | सा | ■ | मा | ल | दा | र | ■ | ज | ■ |
| घ | ■ | वा | म | ना | व | ता | र | ■ | मो | ■ | दा | न | व |
| र | वा | रा | स्त | ■ | का | व | ■ | क | द | र | दा | न | ■ |
| ■ | ह | ■ | क | ल | श | ■ | स | म | र | स | ■ | म | र्थ |
| ज | न | न | ■ | सू | ■ | प | र | त | ■ | ना | ग | र | ■ |
| न | त | ■ | म | ण | का | ■ | की | र | वा | ■ | वा | ण | णे |
| क | ळ | क | ळ | ■ | सा | य | ■ | ता | रं | ता | र | ■ | ■ |
| क | ■ | सा | व | का | र | ■ | पा | ■ | वा | ■ | ■ | क्ष | मा |
| न्या | स | ■ | ट | का | ■ | स | मा | चा | र | प | त्र | ■ | या |

# रायगडच्या पुण्यावर एकतर्फी विजय

## ■ एकदिवसीय मालिकेत विजयी सलामी ■ माणगावची स्वरा बामगुडे 'सामनावीर'

। माणगाव । प्रतिनिधी ।

**रायगड जिल्ह्याच्या महिला क्रिकेटच्या इतिहासात अभिमानाचा नवा अध्याय लिहिला गेला असून, १९ वर्षांखालील रायगड जिल्हा संघाने एकदिवसीय मालिकेतील पहिल्याच सामन्यात पुणे संघावर एकतर्फी विजय मिळवत विजयी सलामी दिली. या ऐतिहासिक विजयाची नायिका ठरली माणगाव शहरातील कन्या स्वरा नितीन बामगुडे, हिने पहिल्याच सामन्यात आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.**

पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यात स्वराने अत्यंत आत्मविश्वासपूर्ण आणि आक्रमक फलंदाजी करत मोलाच्या ३४ धावा केल्या. केवळ फलंदाजीतच नव्हे तर क्षेत्ररक्षणातही स्वराने आपली छाप पाडत २ यष्टिचीत आणि १ फलंदाजाला धावबाद केले. तिच्या या अष्टपैलू कामगिरीमुळे रायगड संघाच्या विजयाला भक्कम पाया मिळाला. स्वराने आपल्या खेळीत संयम आणि आक्रमकतेचा उत्तम समतोल साधत ६० मिनिटे मैदानावर ठाम उभी राहत दोन सुरेख चौकारांच्या साहाय्याने ६६.६७ च्या सर्वाधिक सरासरीने धावा




केल्या. तिच्या या धडाकेबाज आणि जबाबदार खेळीमुळे सामनाधिकारी यांनी तिला या एकदिवसीय सामन्याची 'सामनावीर' म्हणून गौरविले. या सामन्यात रायगड संघाकडून भ्रताती रॉय (३६), स्वरा बामगुडे (३४) आणि संस्कृती पालकर (२८) यांनी फलंदाजीत उल्लेखनीय योगदान देत संघाची धावसंख्या ६ गडी गमावून १९८ धावांपर्यंत नेली.

प्रत्युत्तरात पुणे येथील बास क्रिकेट अकॅडमी संघाला रायगडच्या गोलंदाजांनी जबरदस्त धक्के देत केवळ ८३ धावांत गुंडाळले. गोलंदाजीत रायगड संघाकडून गार्गी साळुंखे आणि समिधा तांडेल यांनी प्रत्येकी ४-४ फलंदाज बाद करत पुणे संघाचा ११५ धावांनी दारुण पराभव केला. हा सामना पूर्णतः एकतर्फी ठरला आणि रायगड संघाने आपल्या ताकदीचे जोरदार प्रदर्शन घडवले. या एकदिवसीय मालिकेत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनसह सातारा, सिंधुदुर्ग, पुणे, ज्युडिशियल अकॅडमी, चंद्रोस क्रिकेट क्लब अशा एकूण सहा संघांचा सहभाग आहे. पहिल्याच सामन्यातील या दणदणीत विजयामुळे रायगड संघाचा आत्मविश्वास प्रचंड वाढला आहे. सामन्यानंतर पेण येथील स्टेडियमवर क्रिकेट रसिकांनी एकच जल्लोष करत रायगडच्या मुलींना भरभरून दाद दिली. यावेळी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, अरुण शिंदे, मालती म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी रायगड संघाचे मनापासून अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. माणगावच्या स्वरा बामगुडे हिच्या या यशामुळे केवळ कुटुंबच नव्हे तर संपूर्ण माणगाव व रायगड जिल्ह्याचा अभिमान उंचावला असून, भविष्यात तिच्याकडून आणखी मोठ्या कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### प्रेक्षकांचा एकच जल्लोष

पहिल्याच सामन्यातील या दणदणीत विजयामुळे रायगड संघाचा आत्मविश्वास प्रचंड वाढला आहे. सामन्यानंतर पेण येथील स्टेडियमवर क्रिकेट रसिकांनी एकच जल्लोष करत रायगडच्या मुलींना भरभरून दाद दिली. तसेच पुढील सामन्यासाठी भरभरुन शुभेच्छा दिल्या.

## अर्जुन एरिगेसीचा कार्लसनला धक्का



**दोहा :** भारताचा अव्वल ग्रँडमास्टर अर्जुन एरिगेसीने जागतिक ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत अचूक 'एंडगेम'च्या जोरावर जागतिक विजेता मॅग्नस कार्लसन आणि नोदिरबेक अब्दुसत्तोरोव या दिग्गजांना पराभवाचा धक्का दिला. या सरस विजयासह अर्जुन फिडे ११ व्या फेरीअखेर ९ गुणांसह संयुक्तपणे अव्वल स्थानी पोहोचला आहे. संयुक्तपणे अव्वल स्थानी असलेल्या अर्जुन एरिगेसी आणि मॅक्सिम वाशियर-लाग्राव्ह यांच्यानंतर डॅनिल ड्युबोव्ह, अमेरिकेचा फॅबियानो कारुआना आणि चीनचा यू यांगी ८.५ गुणांसह दुसर्या स्थानी आहेत. कार्लसन, अव्वल मानांकित अलीरेझा फिरोझा आणि भारताचा सुनीलदत्त नारायणन यांच्यासह आठ खेळाडू ८ गुणांसह सहाव्या स्थानावर आहेत. आर. प्रज्ञानंद क्लासिकल, डी. गुकेश ७.५ गुणांसह १४ व्या स्थानी असलेल्या २१ खेळाडूंच्या गटात आहेत.

# निवड चाचणीत सिंधुदुर्गावर विजय

। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकोणीस वर्षाखालील मुलींच्या एकदिवसीय ५० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धा सध्या रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यातील विविध मैदानांवर उत्साहाच्या वातावरणात सुरू आहे.



पेण येथे छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर रायगडच्या मुलींच्या संघाचा सामना सिंधुदुर्ग जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मुलींच्या संघाबरोबर खेळला गेल्या, अतिशय अटीतटीच्या झालेल्या सामन्यात रायगडच्या संघानी सिंधुदुर्गच्या संघावर ८ धावांनी विजय मिळवत विजयाचा प्रवास सुरू ठेवला आहे. रायगडच्या मुलींच्या संघानी साखळी फेरीत सलग दुसरा विजय मिळवला असून संघाचे मनोबल उंचावले आहे. प्रथम फलंदाजी करताना रायगडच्या संघानी २८.३ षटकांमध्ये सर्व गडी बाद १२३ धावाच धावफळकावर नोंदवल्या त्यामध्ये रायगडच्या संघाची सलामीवीर तंत्रशुद्ध तडाखेबाज फलंदाज ब्रतती राय हिने चौफेर टोलेबाजी करत ५३ धावांची दमदार खेळी केली तिला काव्या धावडे हिने बहुमूल्य २५ धावा करून साथ दिली.

सिंधुदुर्ग कडून समृद्धी जोशीलकर हिने सर्वाधिक ५ तर श्रेया पाटील व कृत्तिका सोने ह्यांनी प्रत्येकी २ फलंदाज बाद केले. सिंधुदुर्गच्या संघाला जिंकण्यासाठी ५० षटकांमध्ये अवघ्या १२४ धावांची गरज असताना संघाचा संपूर्ण डाव ११५ धावसंखेवर गडगडला, रायगडच्या भेदक गोलंदाजी समोर सिंधुदुर्गच्या संघानी अक्षरशः नांगी टाकली समृद्धी कांबळे हिने ४ तर समिधा तांडेल हिने २ फलंदाज बाद करत संघाला अटीतटीच्या झालेल्या सामन्यात विजय मिळवून दिला, रायगडच्या संघाने अप्रतिम क्षेत्ररक्षण करत तीन फलंदाज धावबाद केले,परिणामी रायगडच्या मुलींच्या संघाने सामना ८ धावांनी जिंकला. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदीप नाईक यांच्यासह आरडीसीए सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी संघाचे व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले असून पुढील सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## श्री स्वामी समर्थ, सिद्धार्थ मंडळ उपांत्यपूर्व फेरीत

। मुंबई । प्रतिनिधी ।

श्री स्वामी समर्थ, सिद्धार्थ मंडळ यांनी अमरहिंद मंडळ आयोजित स्व. उमेश शेणॉय चषक राज्यस्तरीय कुमार कबड्डी स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरी गाठली. दादर (प.) येथील अमर हिंद मंडळाच्या मैदानावर सुरु असलेल्या कुमारांच्या उपउपांत्यपूर्व फेरीत ठाण्याच्या श्री स्वामी समर्थ मंडळाने अतितटीच्या लढतीत पालघरच्या इच्छाशक्ती मंडळाला ४०-३८ असे चकवीत आगेकूच केली.

दुसऱ्या उपउपांत्यपूर्व सामन्यात उपनगरच्या सिद्धार्थ मंडळाने मुंबईच्या जय भारत या बलाढ्य संघाला ४४-३५ असे नमवत आपली घोडदौड कायम राखली. विश्रांतीला १९-१३



अशी आघाडी घेणाऱ्या सिद्धार्थने विश्रांतीनंतर देखील आपले वर्चस्व कायम राखत ९ गुणांनी विजय मिळविला.

नरेश चौहान, संकेत यादव यांच्या नेत्रदीपक चढायांना अमित ब्रीद, करण मरानो यांची मिळालेली पकडीची साथ यामुळे त्यांनी ही किमया साधली. आर्यन बावडेकर, अथर्व कदम, श्रेयस मटकर यांनी जय भारतचा पराभव टाळण्याचा निकराचा प्रयत्न केला. पण त्यात ते अपयशी ठरले.

## दुहेरीत वैष्णवी व अंकिताला जेतेपद

**पुणे :** सोलापूर येथे महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना व सोलापूर जिल्हा टेनिस संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिलांच्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत दुहेरीचे विजेतेपद भारताच्या वैष्णवी आडकर व अंकिता रैना या जोडीने संपादिले. तर एकेरीतून भारताच्या वैदेही चौधरीने अंतिम फेरी गाठली आहे. एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत दुहेरीच्या अंतिम फेरीत दुसऱ्या मानांकित भारताच्या अंकिता रैनाने युवा खेळाडू वैष्णवी आडकरच्या साथीत भारताच्या झील देसाई व रशियाच्या एलिना नेपली या जोडीचा पराभव करून विजेतेपद संपादिले. अंकिता रैनाचे आयटीएफमधील दुहेरीतील अठरावे तर वैष्णवी आडकरचे तिसरे विजेतेपद आहे.

## भारताचा श्रीलंकेला 'व्हॉईटवॉश'

। तिरुवनंतपूरम । वृत्तसंस्था ।

भारत आणि श्रीलंका यांच्यातील पाचसामन्यांच्याटी-२०मालिकेतील अखेरचा सामना १५ धावांनी जिंकत भारताने श्रीलंकेला क्लीन स्वीप दिला. भारताने पहिल्यांदा फलंदाजी करताना श्रीलंकेपुढे १७५ धावांचे आव्हान ठेवले होते. श्रीलंकेला ते पूर्ण करता आले नाही. त्यांना २० षटकांत ७ बाद १६० धावा करता आल्या. परिणामी भारताने श्रीलंकेचा १५ धावंणि पराभव केला आणि मालिकेत ५-० असे निर्भेळ यश मिळवले.

भारतीय संघाने श्रीलंकेविरूद्ध मालिकेतील सुरूवातीचे चार सामने जिंकत मालिका विजय मिळवला आहे. संपूर्ण मालिकेत भारताने वर्चस्व गाजवत सामन्यांमध्ये एकतर्फी विजय मिळवले आहेत. लंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचे निमंत्रण दिल्यानंतर भारताची अगदीच खराब सुरुवात झाली. शफाली वर्मा, पदार्पणवीर कमलिनी व हरलीन या आघाडीच्या पहिल्या तिन्ही फलंदाजांना स्वस्तात बाद होत परतावे लागले होते.

यानंतर स्मृती मानधना व जेमिमा रॉड्रीग्जच्या अनुपस्थितीत भारताला, सुरूवातीला एकामागून एक धक्के बसले. भारताची अवस्था ५ बाद ७७ झाली होती. पण, कर्णधार हरमनप्रीत कौरने अमनज्योत कौरच्या साथीने भारताचा डाव सावरला. हरमनप्रीतने ६८ धावा केल्या. तर अमनज्योतने २१, अरुंधती रेड्डीने २७ धावांचे योगदान दिले. त्यामुळे भारताचा १७५ हा सन्मानजनक आकडा गाठता आला. श्रीलंकेची सुरूवात चांगली राहिली. कर्णधार अटापट्टू २ धावांवर बाद झाल्यानंतर हसिनी परेरा आणि इमेशा दुलानी यांनी श्रीलंकेचे आव्हान जिवंत ठेवले. पण, या दोघी बाद झाल्यावर श्रीलंकेचा डाव कोसळला. त्यांचे एका मागून एक फलंदाज बाद होत गेले. भारताकडून दीप्तीने १ विकेट मिळवत महिलांच्या टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारी जगातील पहिली गोलंदाजी होण्याचा मान पटकावला.

## महिला उद्योग मंडळाच्या शाळेस यश



। रसायनी । प्रतिनिधी ।

अल्काईल अमाईन्स आणि चावणे हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने चावणे हायस्कूल येथे आयोजित अल्काईल अमाईन्स अंतर शालेय क्रिडा महोत्सव २०२५ मध्ये महिला उद्योग मंडळाची प्राथमिक शाळा पराडे या शाळेने ११ सांघिक तर ८ वैयक्तिक क्रिडा प्रकारात बक्षिसे मिळवून दुसरा क्रमांक पटकावला. या यशाबद्दल सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांचे शाळा आणि संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

१२ वर्षाखालील लंगडी, मुले प्रथम क्रमांक मुली द्वितीय क्रमांक, १४ वर्षाखालील लंगडी मुले द्वितीय क्रमांक मुली प्रथम क्रमांक, १४ वर्षाखालील व्हॉलीबॉल मुले प्रथम क्रमांक, १४ वर्षाखालील खोखो मुले द्वितीय क्रमांक, मुली प्रथम क्रमांक, १४ वर्षाखालील रस्सीखेच,मुले प्रथम क्रमांक,मुली द्वितीय क्रमांक, १४ वर्षाखालील डॉजबॉल, मुले द्वितीय क्रमांक, १२ वर्षाखालील डॉजबॉल, मुले प्रथम क्रमांक, १२ वर्षाखालील ८० मी. धावणे मुली निधी म्हात्रे द्वितीय, १२ वर्षाखालील १५० मी. धावणे मुली श्रीशा दहिफळे तृतीय, १२ वर्षाखालील ८० मी. धावणे मुले मयांक वाघे द्वितीय, १२ वर्षाखालील १५० मी. धावणे मुले आरव गायकवाड प्रथम, १४ वर्षाखालील २०० मी. धावणे मुली सान्वी शिर्के प्रथम, १४ वर्षाखालील १०० मी. धावणे मुले श्रीयोग नांगडे द्वितीय, १४ वर्षाखालील २०० मी. धावणे मुले जय गायकवाड द्वितीय, १४ वर्षाखालील थाळी फेक मुले कुंदन दरडे द्वितीय यांनी सूयश संपादन करुन शाळेचे मोहोपाडा महिला उद्योग मंडळाच्या शाळेचे नावलौकीक केले.

## दिव्या देशमुख बुद्धिबळ विश्वविजेती ठरली | भारताचे वनडे-टी-२० मध्ये वर्चस्व

# महिला खेळाडूंनी गाजवले वर्ष

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

सरत्या २०२५ या वर्षात भारतीय क्रीडा क्षेत्रात अनेक चढ-उतार झाले असले तरी हे वर्ष महिला खेळाडूंसाठी सर्वात यशासाठी लक्षात ठेवले जाईल. महिलाशक्तीचा प्रभावी ठसा म्हणूनही हे वर्ष ओळखले जाईल.क्रिकेटपासून बुद्धिबळापर्यंत विविध खेळांत भारतीय महिलांनी विश्वविजेतेपद मिळवले. नागपूरची मराठमोठी १९ वर्षीय दिव्या देशमुख बुद्धिबळ विश्वविजेती ठरली. तसेच हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली महिला संघाने प्रथमच क्रिकेटमधील विश्वविजेतेपद मिळवले.



नेमबाजीत १९ वर्षीय सुरुची सिंग हिने १० मीटर एल पिस्तूल प्रकारात तब्बल चार विश्वकरंडक सुवर्णपदे मिळवली, त्यात तीन सुवर्णपदके वैयक्तिक आ-हेत. १० मीटरचा हा प्रकार मनू भाकरने गाजवला आहे. त्यात तिने ऑलिंपिक पदकही जिंकलेले आहे; परंतु मनू भाकरलाही मागे टाकत सुरुची सिंग अचूक लक्ष्यवेध करीत आहे.

वनडे-टी-२०मध्ये वर्चस्व, पण कसोटीत घोर निराशा.एकीकडे भारतात आलेल्या फुटबॉल सुपरस्टार लियोनेल मेस्सीचा उदो उदो होत असताना भारतीय फुटबॉल संघाची मात्र फारच निराशाजनक पिछेहाट झाली आहे.

एएफसी आशिया करंडक स्पर्धेसाठी मात्रता मिळवता आलेली नाही; मात्र महिलांनी हीच पात्रता मिळवली आणि २०२५ मधील इतर महिला खेळाडूंच्या खांद्याला खांदा लावून प्रगती केली. दोन्ही हात नसताना केवळ पायाच्या साहाय्याने तिरंदाजी करणारी शीतल देवी कमालीची झेप घेत आहे. १८ वर्षीय शीतल पॅरा तिरंदाजीत विश्वविजेती ठरली आता तर ती सक्षम खेळाडूंच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळणार आहे.

इतर खेळांतील यश बॉक्सिंग : जैसमिन लांबोरिया, मीनाक्षी हुडा यांची जागतिक सुवर्णपदकेवेटलिफ्टिंग : मीराबाई चानू : राष्ट्रकुल सुवर्ण, जागतिक रौप्यकुस्ती: अंतिम पंघाल : जागतिक ब्राँझ. सांघिक स्पर्धांतील चित्र फुटबॉल महिला फुटबॉल संघ एएफसी आशिया करंडकासाठी पात्र ठरला आहे.

### भारतीय महिला शक्तीचा प्रभाव

**दिव्या देशमुख (२०) : भारताची पहिली महिला बुद्धिबळ विश्वविजेतीहरमनप्रीत कौर (३६) : महिला क्रिकेट संघाला एकदिवसीय विजेतेपदसुरुची सिंग (१९) : १० मी. एअर पिस्तूलमध्ये चार वर्ल्ड करंडक सुवर्णपदकेशीतल देवी (१८) : हात नसलेली पहिली पॅरा वर्ल्ड चॅम्पियन, सक्षम खेळाडूंच्या राष्ट्रीय संघात निवडदीपिका टीसी : अंध महिला क्रिकेट संघाला विश्वविजेतेपद**

## मुंबई संघाचा धावांचा डोंगर

**जयपूर :** विजय हजारे राष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत मुंबईने आपली विजयी घोडदौड कायम राखताना गोवा संघाचा ८७ धावांनी पराभव केला आणि सलग चौथा विजय मिळवला. मुंबईने प्रथम फलंदाजीत ५० षटकांत ४४४ धावांचा मोठा डोंगर उभा केला; परंतु गोवा संघानेही प्रतिकार करून नऊ बाद ३५७ धावांपर्यंत मजल मारली. मुंबईकडून सर्फराझ खानने तुफानी दीडशतकी खेळी केली. ७५ चेंडूत १५७ धावा करताना त्याने तब्बल १४ षटकार मारले. याव्यतिरिक्त नऊ चौकारांचीही पेरणी केली. मुशीर खानने ६० तर हार्दिक तामोरेने २८ चेंडूतच ५३ धावांचा तडाखा दिला. देशांतर्गत क्रिकेटमध्ये ४४५ धावांचे लक्ष्य पार झालेले नाही.

## निवडक

### मंडणगडात रंगणार चॅलेंजर कुडूक चषक

**महाड :** मंडणगड तालुक्यातील कुडूक येथील चॅलेंजर कुडूक मित्र मंडळ गेली १२ वर्ष सातत्याने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करत आहे. यंदाचे १३ वे वर्ष असून सदर




स्पर्धा भेलोशी पंचक्रोशी माध्यमिक विद्यालय भेलोशी या ठिकाणी दिनांक ३ व ४ जानेवारी २०२६ रोजी एक गाव एक संघ तसेच खुला गट स्वरुपात दोन दिवसांत एकूण ४८ संघांदरम्यान खेळवण्यात येणार आहे. सदर स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय विजेत्या संघाला पारितोषिकांसोबत एक आकर्षक चषक देखील देण्यात येणार असल्याचे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या व्यतिरिक्त, सामन्यांमध्ये मालिकवीर, उकृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज यांची देखील निवड करून त्यांना देखील आकर्षक चषक देण्यात येणार असल्याचे कर्णधार किशोर नाकते यांनी सांगितले.

### कॅरम स्पर्धेमध्ये साक्षी उपविजेती

**सावंतवाडी :** मुक्ताई कॅडमीच्या चौदा वर्षीय साक्षी रामदूरकर हिने शालेय राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेचे उपविजेतेपद पटकावले. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि रत्नागिरी जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त आयोजनाखाली रत्नागिरीतील डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्टच्या क्रीडा संकुल येथे या स्पर्धेचे आयोजन



करण्यात आले. स्पर्धेत मुलींच्या सतरा वर्षे वयोगटात साक्षी उपविजेती ठरली. तिने सलग चौथ्या वर्षी राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेत सहभाग घेऊन उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. साक्षीला सन्मानचिन्ह, रौप्यपदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. येथील मुक्ताई कॅडमीचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ कॅरम प्रशिक्षक कौस्तुभ पेडणेकर यांच्या मार्गदर्शखाली साक्षीने हे यश मिळविले. मागील चार वर्षे ती कॅरम आणि बुद्धिबळ या दोन्ही खेळांत विभाग आणि राज्यस्तरावर उल्लेखनीय यश मिळवत आहे. सर्व स्तरातून तिचे कौतुक करण्यात येत आहे.

### पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत हेमांगीला सुवर्ण

**सावंतवाडी :** चराठे येथील हेमांगी मेस्त्री हिने मध्यप्रदेश येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. तिच्या या यशाबद्दल शिवसेना सिंधुदुर्ग जिल्हाप्रमुख संजू परब यांनी तिचे अभिनंदन करत दिल्ली येथे होणाऱ्या आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी चराठे गावच्या सरपंच प्रचिती कुबल, बाळू वाळके, राजू कुबल, गजानन मेस्त्री यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. हेमांगीच्या या उल्लेखनीय यशामुळे चराठे गावासह सावंतवाडी तालुक्यातून तिचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### विराट-रोहित हजारे ट्रॉफीतून बाहेर

**नवी दिल्ली :** विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ मध्ये तिसऱ्या फेरीचे सामने खेळले गेले. मात्र, या फेरीत विराट कोहली आणि रोहित शर्मा अनुक्रमे दिल्ली आणि मुंबईकडून मैदानात दिसले नाहीत. दिल्लीचा सामना अलूर येथील केएससीए स्टेडियमवर सौराष्ट्रविरुद्ध झाला, तर मुंबईचा संघ जयपूरच्या जयपूरिया विद्यालय मैदानावर छत्तीसगडविरुद्ध खेळायला उतरला. विराट कोहलीने दिल्लीसाठी खेळलेल्या दोन सामन्यांत शानदार



कामगिरी केली. त्याने आंध्र प्रदेशविरुद्ध १३१ आणि गुजरातविरुद्ध ७७ धावांचे योगदान दिले. दुसरीकडे, रोहित शर्माने सिक्कीमविरुद्ध १५५ धावांची धडाकेबाज खेळी केली, पण उत्तराखंडविरुद्धच्या सामन्यात तो पहिल्याच चेंडूवर बाद झाला. कोहली ६ जानेवारीचा सामना खेळणार का? आता विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना या स्पर्धेत आणखी सामने खेळायचे आहेत की नाही, हे पूर्णपणे त्यांच्यावर अवलंबून आहे. ११ जानेवारीपासून भारताला न्यूझीलंडविरुद्ध मायदेशात ३ सामन्यांची वनडे मालिका खेळायची आहे, त्यामुळे या दोन्ही खेळाडूंचे लक्ष त्या आंतरराष्ट्रीय मालिकेवर असणार आहे.

### प्रशिक्षकपदासाठी लक्ष्मणला विचारणा

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यासाठी २०२५ हे वर्ष विरोधाभासाचे ठरले. एकीकडे भारतीय संघाने आशिया चषक (टी-२०) आणि चॅम्पियन्स ट्रॉफी (वनडे) जिंकून मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले. तर दुसरीकडे मायदेशात झालेल्या कसोटी मालिकेत मानहानीकारक पराभव झाला. यामुळे आता गौतम गंभीर यांच्या कसोटी प्रशिक्षकपदाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित



केले जात आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पराभवानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळातील एका वरिष्ठ व्यक्तीने माजी क्रिकेटपटू व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली. दक्षिण आफ्रिकेने तर भारताचा मायदेशात २-० असा 'क्लीन स्वीप' केला. २०२४ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर झालेल्या ३-० अशा पराभवानंतर या ताज्या पराभवांमुळे गंभीर यांच्या कसोटी प्रशिक्षकपदाबाबत चर्चा सुरू आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पराभवानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळातील एका वरिष्ठ व्यक्तीने माजी क्रिकेटपटू लक्ष्मण यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली. त्यांना कसोटी संघाचे प्रशिक्षकपद स्वीकारण्यास रस आहे का, अशी विचारणा केली होती.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)